DEVGAD
COLLEGE

सन २०१८-१९

# रसराज

''श्री. स. ह. केळकर वरिष्ठ महाविद्यालय, देवगड''

''श्रीमती. न. शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय, देवगड''



# ● संपादक मंडळ ●

१) प्रा.ए.व्ही.बापट.(कार्यकारी संपादक)

२) प्रा.पी.ए.राऊत.

३) प्रा.पी.एन्.कांबळे.

४) प्रा.ए.ए.कोयंडे

## संपादक मंडळ (कनिष्ठ महाविद्यालय)

१) श्री. एम्.व्ही.भिडे

२) सौ. एम्.जी.गावकर

३) सौ. व्ही.जी.परुळेकर

४) कु. एच्.के.मांजरेकर

## विद्यार्थी संपादक मंडळ

१) प्रियांका बळवंत पाटील. - प्रथम वर्ष विज्ञान

२) मधुरा बळवंत पाटील. - द्वितीय वर्ष विज्ञान

३) सृष्टी सुधाकर राणे. - द्वितीय वर्ष विज्ञान

### मुखपृष्ठ संकल्पना

प्रा. अविनाश विनायक बापट

श्री. विकास बाळकृष्ण येरम **(संचालक:-यश इन्फोटेक,देवगड)**

# संपादकीय....

सस्नेह नमस्कार,

रसराजचा २०१८ चा नाविन्यतेनं नटलेला व अधिक आकर्षक असा डिजिटल स्वरूपाचा वार्षिक विशेषांक आपल्या सारख्या रसिक वाचकाच्या हाती देताना खूप आनंद होत आहे साहित्य कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, संशोधनपर विविध क्षेत्रात श्री. स.ह.केळकर महाविद्यालयाने घेतलेल्या नेत्रदीपक व उत्तुंग यशाचं यथार्थ प्रतिबिंब म्हणजे रसराज होय !

रसराजने गेल्या ४२ वर्षात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिलं आहे. विविध उपक्रमांची रेलचेल होती. अविष्कार, आजीवन अध्ययन व विद्यापीठाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याची संधी गेल्या दोन-तीन वर्षात आम्हाला विद्यापीठाने देऊन आमचा एक प्रकारे सन्मानच केला आहे.

या डिजिटल रसराजमध्ये यंदा प्रथमच प्राध्यापक वर्गाचं साहित्य समाविष्ट करण्यात आलं आहे.

विद्यार्थी केंद्रित शिक्षण देत असताना जवळ जवळ सर्वच कार्यक्रमात आमच्या विद्यार्थ्यांनी तन,मनझोकून आयोजन केलं. ते आदर्शवत होतं. त्यासाठी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावीशी वाटते.

कॉलेजच्या नाट्यशाखेमार्फत रवींद्र करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचं यशस्वी आयोजन करण्यात आलं.

गेल्या दोन वर्षापासून सुरु झालेला अनोखा उपक्रम म्हणजे **DYF 2017**व**DYF 2018** देवगड युथ फेस्टीव्हल. या निमित्ताने आखलेल्या तीन दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमात या महाविद्यालयाने एकूणच या जिल्ह्यात पहिल्यांदा अशा उपक्रमांचेयशस्वी आयोजन केलं होते.

वक्तृत्व, सांस्कृतिक स्पर्धा, निबंध, एकांकिका यांतील यशाबरोबरच भावनेश धुरीचं स्पर्धा परीक्षेतील यश इथल्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे.

एकंदर आजची तरुण पिढी काही अपवाद वगळता फेसबुक, व्हॉट्सअॅप इ.च्यानादी लागून वाट चुकली असताना आमच्या महाविद्यालयातील विविध उपक्रम तरुणाईला प्रकाशमार्गावर खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. हे अभिमानाने सांगावेसे वाटते.

महाविद्यालयाने वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमांतून विद्यार्थीवर्गाला प्रकाशाकडे नेण्याचे तीव्र इच्छाशक्ती मार्ग निर्माण केले आहेत. म्हणून मला खात्री आहे की कवी गुरु ठाकूर त्यांच्या ओळींप्रमाणे आमचा विद्यार्थी भविष्यातील कुठलीही आव्हाने पेलू शकतो. त्या ओळी अशा आहेत.

‘असे जगावे छाताडावर
आव्हानाचे लावून अत्तर
नजररोखूनी नजरेमध्ये
आयुष्याला द्यावे उत्तर!’

रसराजने लेखक कवी घडवले व ते लिहिते झाले. लेख, कविता, ललित गद्य, कथा, चित्रे, इतर साहित्य, वैज्ञानिक लेख इ. चा अक्षरश: वर्षाव झाला. यातून निवड करणे हे आव्हान होते. आजच्या विद्यार्थी वर्गाची सामाजिक जाणीव, भावनांचाहळूवारपणा, वैज्ञानिकदृष्टिकोन, आशय घनता, विधायक दृष्टिकोनअशा अनेक गोष्टींच्या मनातील प्रतिमेला आपल्या प्रतिभेनं दिलेला सुंदर आकार म्हणजे ‘रसराज’ होय.

हा रसराजचा अंक इथून शिकून जाणाऱ्या व शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना एक अनमोल ठेवा ठरावा, यासाठी एकच प्रार्थना-

“तू बुद्धी दे, तू तेज दे,
नवचेतना विश्वास दे,
जे सत्य सुंदर सर्वथा
आजन्म त्याचा ध्यास दे!”

महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, संपादक मंडळातील प्राध्यापक व विद्यार्थी संपादक या सर्वांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

**प्रा. अविनाश वि. बापट**
**सहयोगी प्राध्यापक**
**कार्यकारी संपादक, ‘डिजिटल रसराज’**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| 1.संपादकीय | प्रा.अविनाश बापट |
| २.स्त्री जन्मा; तुझी कहाणी | चेतना तानवडे (T.Y.B.Sc.I.T.) |
| 3. नासाची हनुमान झेप | राखी वाडेकर (F.Y.B.Sc.) |
| 4. बायोडिझेलचे युग | धनश्री सारंग (S.Y.BSc.) |
| 5. एकगुढ नातं- विज्ञान आणि अध्यात्माचं | मानसी करंदीकर (12वीScience B) |
| 6. कुष्ठरोग...! | अमित वळंजू (११वी Science A) |
| 7. जगण्याची कला | विनायकअपराज(T.Y.B.Com.) |
| 8. प्लॅस्टिकचा निरोप.... | सर्वेश राणे (११ वी Commerce A) |
| 9. पर्यावरणव मानव | साधनावारीक(१२ वीScience B) |
| 10. माझो बाप | पूनम विश्वकर्मा (११वीCommerce A) |
| 11. आई | पूनम विश्वकर्मा (११वीCommerce A) |
| 12. आम्ही मुली | कादंबरी कणेरकर |
| 13. जगणं किती सुंदर असतं | सुरभी ओगले (T.Y.B.Com.) |
| 14. गुलाम | प्रणित दळवी(T.Y.B.Sc.I.T.) |
| 15.”आयुष्य” | विनया बावकर (T.Y.BSc.) |
| 16. पण विचार का करायच्या त्या... | माधुरी बोडेकर (T.Y.B.Com.) |
| 17. नाती हरवली कुठं.... | प्राची देवगडकर(T.Y.B.Com.) |
| 18. पहीलं पान | नितेश कासले (T.Y.B.B.I.) |
| 19. आई | विनया बावकर (T.Y.BSc.) |
| 20. आई-बाबा | अक्षता देवधर (T.Y.B.B.I.) |
| 21. आला श्रावण श्रावण | कोमल शेळके (S.Y.B.Sc.) |
| 22. फुलपाखराची व्यथा | वैष्णवी कदम (T.Y.B.Com.) |
| 23. मित्रा! तुला वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.....! | गायत्री शिर्के (११ वीCommerce A) |
| 24. .....आठवण....... | उत्कर्ष दळवी (T.Y.B.Sc.) |
| 25. शब्द मात्र दूरराहिले | पूजा नारिंग्रेकर (F.Y.B.A.) |
| 26. आई | पूजा नारिंग्रेकर (F.Y.B.A.) |
| 27. जुन्या आठवणी | सृष्टीराणे (S.Y.B.Sc.) |

| | |
|---|---|
| 28. तो आणि ती | चेतन तिर्लोटकर (T.Y.B.Com.) |
| 29. Rural development in India | Sayujya Hindlekar(११ Arts A) |
| 30.टेबलटेनिसचे जमदग्नी सर! | अखिलेश मोंडकर (११ वीCommerce) |
| 31. सोशल मिडिया | दिक्षिता चांदोस्कर (१२ वीMCVC MLT) |
| 32. अजिंठा लेण्यांच्या गवाक्षातून | चेतन राऊत (११ वीCommerce) |
| 33. नागपूर भ्रमंती | धनश्री जाधव (१२ वी Science) |
| 34. अशी आमुची मैत्री | पूजा काळे (१२ वी Science) |
| 35. निमित्त | तन्वी गोगटे (१२ वी Science) |
| 36. स्पर्धेचे युग | नेहा कांदळगावकर |
| 37. सुवर्णस्मृती | कृपा ठाकूर (११ वीCommerce) |
| 38. 'नातं नाळेचं'(विज्ञान कथा) | प्रा.अविनाश बापट |
| 39. मालवणी मेवो | प्रा.अविनाश बापट |
| 40. नामो कुळकार | प्रा.अविनाश बापट |
| 41. मालवणिका | प्रा.अविनाश बापट |
| 42. तू माझा सांगती\|\| | प्रा.पल्लवी मराठे |
| 43. बँकांचा उगमआणि विकास | प्रा.रश्मीहिर्लेकर |
| 46. शोषण | डॉ.सुरवसे.एल्.एस्. |

# स्त्री जन्माही तुझी कहाणी

चेतना तानवडे

(T.Y.B.Sc.I.T.)

स्त्रिये....! काय आहेस तू.....
'जिवाश्मांची वसुंधरा तू, यौवनाची कामिनी तू,
हिंमतीचीवाघिण तू, कुळाची स्वामिनी तू,
आकाशी धगधगती दामिनी तू, ओलावून बरसणारा श्रावण तू,
उन्हात गारव्याची झुळुक तू, थंडीच्याशहाऱ्यात उबेची दुलई तू,
पतीची अर्धांगिनी तू, लेकरांची माऊली तू,
भावाची पाठराखीण बहीण तू, मैत्री जपणारी सखी तू,
शिवबाची जिजाऊ तू, राणी झाशीचे बळकट बाहू तू,
पेशव्यांची आवड मस्तानी तू, ताजमहालाची प्रेमळ निशाणी तू.

या विषयावर काही लिहायला घेतले की, द्विधा मन:स्थिती होते. पुरुषांच्या जोडीने पुढे जाणारी की, हे जग बघण्याआधीच अंधारात जाणारी यांपैकी कोणाचे नक्की उदाहरण द्यायचेयाचा विचार करावा लागतो. स्त्रियांची बुद्धिमत्ता ही निसर्गतःच असते असे खुद्द महाकवी कालिदास यांनी म्हटलेआहे. असे असूनही "बायकांना काय कळते?" असे बोलून मोकळे होणारे लोक समाजात वावरताना दिसतात. एकेकाळी पुरुषांच्या बरोबरीने समाजात स्थान घेणारी स्त्री आज स्वतःच्या जन्मासाठीच लढतानादिसते. प्राचीन काळातस्त्रिला अनन्य साधारण महत्त्व होते, पण आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी झाली आहे. बदल घडवून आणण्यासाठी शिवराय, लोकमान्य, भगतसिंग सारखे युगपुरुष जन्माला यावेत असे ओरडून सांगणारा समाज मात्र, त्यांना जन्म देणारी हीएक स्त्री होती, हे मात्र विसरत आहेत.

आजच्या युगामध्ये स्त्री ही पुरुषाएवढीच आघाडीवर असलेली आपल्याला पहावयास मिळते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात ती पुरुषांच्या बरोबरीने काम करताना प्रगतीपथावर आहे. साहजिकचपुर्वीपेक्षा आताच्या युगात स्त्रिला समाजात मोठे स्थान प्राप्त झाले आहे.ते तिने स्वतःच्या कर्तृत्वाने, कष्टाने, बुद्धिमत्तेने मिळवलेले आहे, यात शंकाच नाही. एकूण सर्वच बाबतीत स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने आघाडीवर आहेत, हे जरी खरं असलं तरी तिच्यावर अन्याय होताना आजही दिसून येतो. आजही वर्तमानपत्र उघडले की जास्तीत जास्त बातम्या या स्त्रियांबाबतच्या अन्यायाच्याच असतात. नवविवाहितांच्या आत्महत्या, सुनेचा छळ करून मारले, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या अश्या बातम्याच जास्त असतात.

आजची स्त्री या पुरुषप्रधानसमाजात वावरणारी,हुंडाबळी,विनयभंग, अत्याचार, छेडछाड, बलात्कार, स्त्री-भृण हत्या, अशा अनेक समस्यांशी झुंजणारी, सहनशिलतेचा अंत होईपर्यंत सहन करणारी व शेवटी स्वतःला

संपविणारी.पण याला जबाबदार कोण ? या कोल्हया-लांडग्यांच्या गावगुंड पातळीवर उतरलेला समाज की स्वतः स्त्री?

सुशिक्षित वर्गातही पहिली पत्नी सुगरण, सुस्वभावी, समजूतदार असली व तिला जर मुलीच झाल्या तर तो तिचाच दोष समजून पतीचा दुसरा विवाह लावला जातो. पण मुलगा किंवा मुलगी होणे हे स्त्रिच्या हातात नसते हे न कळण्याइतपत हा समाज मागासलेला तर आता नाही ना?तरीपण या ठिकाणी काही गुन्हा नसताना स्त्रिला अन्याय सहन करावा लागतो. साधारणपणेलग्नालापाच-सहा वर्षे झाली आणि घरात पाळणा हालण्याची चिन्हे दिसली नाहीत की, योगीबाबा, डॉक्टर तपासण्या चालू होतात. त्यात प्रथम स्त्रिच्याच केल्या जातात. मुलं जन्माला येण्यासाठी दोघेही तेवढेच जबाबदार असतात, पण स्त्रिला प्रथम दोष लावण्यात येतो...असे का?

ऐन तारुण्यात पतीच्या अपघाती निधनाने विधवा झालेल्या मुली आपण पाहतो. मुल-बाळ नसेल तर ठीक, किमान दुसऱ्याविवाहाचा तरी विचार केला जातो. पण पदरी लहान एक दोन मुले असतील तर तिला आपले उभे आयुष्य एकटीने काढावे लागते. तरीती कच्च्या-बच्च्यांना सांभाळत त्यांचे सगळे करते.
मुलांना व्यवस्थित वाढवून त्यांचे शिक्षण वगैरे करून त्यांना मोठ्या हुद्द्यावर बसवणाऱ्या मातांची अनेक उदाहरणे आपण पाहतो.

आपला समाजही त्यास तेवढाच जबाबदार आहे. एखाद्याची पहिली पत्नी तरुण-वयात गेली की;लगेच त्याला वर्षाच्या आत लग्नासाठी प्रस्ताव येतात. मुलांना सांभाळायला घरात लक्ष्मी हवी, एकटी किती दिवस राहणार? असा प्रस्ताव तरुण विधवांकडे क्वचितच अपवादाने पहायला मिळतो, नाहीतर तिला 'तूच पांढऱ्या पायाची' म्हणून नवऱ्याला घालवून बसली असे बोल लावले जातात. स्त्री ही लग्न करून तुमच्या घरी आपले माहेर, बहीण, भाऊ, आई, वडील यांना सोडून येते. तुमच्या घरची जबाबदारी उचलते. तुमच्या मुलांना जन्म देते. त्यांना मोठे करते, वेळप्रसंगी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. एकटा पुरुष किंवा स्त्री ही फारसा पराक्रम नाही गाजवू शकत.दोघांनाही एकमेकांची साथ सारखीच हवी असते. हा संसाररुपी रथ एका चाकाच्या सहाय्याने चालवता येत नाही, तरीसुद्धा कायम स्त्रीवरच अन्याय का? आपला समाज कितीही बदलला तरी स्त्रीवर होणारे अन्याय कधी संपणारच नाहीत का?

गौतम बुद्धांनी स्त्री मुक्तीसाठी पहिले पाऊल उचलले, त्यानंतर ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, यांनीस्त्रीच्या शिक्षणासाठी व स्त्री मुक्तीसाठी आशेचे किरण दाखवले आणि पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात स्त्रियांना समानतेने वागविले जात नाही म्हणून त्यांना कायदेशीर हक्क व अधिकार मिळवून दिला. पण या सगळ्याने आजची स्त्री सुरक्षित आहे का? हाप्रश्न मनात येतच असतो. स्त्री एक मुलगी, बहीण, सून, आई, वहिनी, मैत्रिण, काकी, मावशी, आजीया भूमिका सहजरित्या पार पाडते. ती शिक्षित असो किंवा अशिक्षित पणती संसारातले वा व्यवहारातले प्रश्न चुटकीसरशी सोडवते. आयुष्यभर पूर्ण घर सांभाळणारी 'गृहिणी', सगळ्यांसाठीरुचकर जेवण बनविणारी'अन्नपूर्णा',शिक्षणाचेधडे देणारी'सरस्वती', चालायला बोलायला

शिकवणारी आणि संस्कार देणारी'आई' सगळ्यांची काळजी घेणारी 'देवी', पतीला साथ देणारी 'अर्धांगिनी', घरावरीलआलेल्या संकटाला सामोरी जाणारी 'रक्षिका' अशी ही स्त्री जी नि:स्वार्थमनाने या भूमिका पार पाडते.

आजची स्त्री म्हणजे सुंदर आवाज असणारी गानकोकिळा 'लता मंगेशकर', पंतप्रधान'इंदिरा गांधी',I. P. S. ऑफिसर'किरण बेदी', आणि अंतराळात पोहोचलेली 'कल्पना चावला' यांनी दाखवून दिले आहे की, कोणत्याही क्षेत्रात स्त्रिया मागे नाहीत. तरी पण स्त्रियांना पाहिजे असलेला मान, सन्मान, प्रतिष्ठा त्यांना मिळत नाही, त्यांच्या वाटेला येतो तो फक्त अपमान, अपमान आणि अपमान.....

पूर्वी स्त्रिला वयात येण्याच्या आधीच तिचा विवाह करण्यात यायचा, बाहुलीचा खेळ मांडण्याऐवजी आयुष्याचा खेळ मांडावा लागायचा, तिला जिवंतपणीच मरणयातना भोगाव्या लागायच्या, आता जग जरी बदलले असेल तरी पण या गोष्टी बदलल्या आहेत का?बालविवाह, हुंडा यासारख्या गोष्टी अजून थांबल्या नाहीत. कित्येक स्त्रिया या त्रासाला अजूनही बळी पडत आहेत. एक संस्कृतमधले वचन आहे.

"यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता"

याचाअर्थ जिथे स्त्रियांना आदर मिळतो आणि पुजले जाते तिथे देवाचे स्थान असते. पण या समाजात अजूनसुद्धा स्त्रियांना मान, आदर दिला जात नाही. मंदिरात जसे कालीमाता, दुर्गा, लक्ष्मी, यांनापुजले जाते पण यांचे रूप घेऊन आलेली स्त्री फक्त विटंबना सहन करते याला कारण कोण, समाज की स्त्री?

आजमहिलांनीआपलीवेगळीओळखपटवूनदिलेलीअसूनसुद्धायाकोल्हया लांडग्यांच्यासमाजातस्त्रियांनाहिणवलेजाते तेका? स्त्रियांचीपात्रताअसूनदेखीलत्यांनीचूलआणिमूलचसांभाळावेंहिचअपेक्षाकेली जाते. पण असे खालच्या पातळीचे विचार करणारे हे किती सहजरित्या विसरतात, आपल्याच जुन्या लोकांची ही म्हण आहे-

"जिच्या हाती पाळण्याची दोरी
ती जगास उद्धारी ||"

मुलगा घराचा कुलदीपक आणि मुलगी हे ओझं समजलं जातं, असं का?

वंशाचा दिवा हवा, पण मुलगी नको म्हणून जन्माच्या आधी तिचा घाला घोटाळा केला जातो, असं का?वयात येण्याआधीच घरच्यांचं ओझं कमी करण्याच्या अट्टाहासापायी बाहुलीशी खेळण्याच्या वयात तिच्या आयुष्याचा खेळ मांडला जातो, असं का?

हुंडाबळीच्या रूपानेस्त्रिलाजिवंतपणी मरणयातना भोगाव्या लागतात, असं का?

बलात्कार या शब्दालाही घाबरणाऱ्या फुलांना फुलण्याआधीच कुस्करून टाकले जाते, असं का? शारीरिकसुखासाठी पिसाटलेल्या कुत्र्यांकडून देहाचे लचके तोडले जातात, असं का?हे आणि असे असंख्य प्रश्न मनाला वेड लावतात, खिन्न करून सोडतात. पण याला कारणीभूत कोण? समाज की स्वतः स्त्री?

एका स्त्रिच्यापोटी जन्म घेतलेले हे नराधम, जे पुरुषप्रधान समाजाचा झेंडा मिरवतात तेच हे लांच्छनास्पद कृत्य करतात. जिच्यामुळे जगात आले तिलाच कलंकित करतात. आजची स्त्री कितीही शिक्षित असली तरी सुरक्षित नाही हे खरंच आपलं दुर्दैव आहे.

१६ डिसेंबर २०१२ रोजी दिल्लीत एका धावत्या बसमध्ये कॉलेज तरुणीवर सहा नराधमांनी तिच्या मित्रांसमोर अत्याचार केला. बातमी वाचून काळजामध्ये धस्स झाले आणि मन सुन्न झाले. मनात विचार आला की, खरोखरचआजची स्त्री मुक्त, स्वतंत्र आहे का?

२१ व्या शतकात स्त्रिने पाऊल टाकले काय, अन् उंबरठा ओलांडला काय, स्त्रिचे एक नवीनच रूप बघायला मिळू लागले आहे. आज स्त्री खूप प्रगतअवस्थेत दिसू लागली आहे. जी पूर्वी चूल आणि मूल सांभाळत होती, ती आता अंतराळात साता समुद्रापलीकडे एकटी विहार करू लागली आहे. संसदेत बसू लागली आहे.एकटीच देश सांभाळू लागली, मेरिटमध्ये तीच पुढे, मॅनेजर पदापर्यंत पोहोचत सरकारी तिजोऱ्यांशी खेळू लागली. महिलांचे प्रश्न सोडवता सोडवता न्यायासनावर विराजमान झाली. रिक्षा, ट्रक, ट्रॅक्टरच नव्हे तर रेल्वेसुद्धा चालवू लागली. ड्रायव्हिंग क्लासेसही घेऊ लागली. घरचे-बाहेरचे सांभाळता सांभाळता संस्कारितमुलेही घडवू लागली. भारताचीआदर्शपिढीघडवू लागली. कुठे दडली होती इतके दिवस ही स्त्री? दडवून, घुसमटवूनठेवलेली वाफ अखेर अशाप्रकारे बाहेर आली. कोंडलेली वाफच ती; स्फोट बनून उफाळून आली.

एखाद्या पुरुषाची पत्नी अकाली निधन पावली आणि तिच्या पश्चात जर तिची मुलं असतील तर मुलांच्यासाठी तो पुरुष दुसरं लग्न करतो पण अगदी याउलट घडलं तर तिला कोणी सांगत नाही की; मुलांसाठी तुला दुसरं लग्न करावं लागेल, उलट तिला असं सांगण्यात येत की तुला आता पतीच्या आठवणीवर आणि मुलांच्या संगोपनात पूर्ण आयुष्य व्यतित करणं लागेल. हा विरोधाभास का? ती स्त्री आहेम्हणून का? स्त्री ही फक्त उपभोगाची वस्तू आहे का? तिच्या भावनांना, अस्तित्वाला काहीच महत्त्व नाही का? ती दान करण्याची वस्तू आहे का? स्त्रीवर अत्याचार का होतात? आरोपींना शिक्षा का होत नाही? ते मोकाट का सुटतात? पैशासाठीस्त्रिला जिवंत जाळले जाते, एकतर्फी प्रेमात तिच्यावर खुनी हल्ला होतो. दारूसारख्या व्यसनापाई तिला मारहाण होते असं का? मानिनी, स्वामिनी, सांगिनी, जगत् जननीअसणाऱ्या दामिनीला कलंकिनी का बनवलं जातं? ही वृत्ती अशीच चालू राहील काय? स्त्री जन्मा.....! ही तुझी कहाणी.....! एवढंच म्हणून आपण गप्प बसणार का? कधीतरी स्त्री प्रधान संस्कृती उदयास येईल का? स्त्री ही उपभोगाची वस्तू नसून ती एक शक्ती आहे हे मान्य होईल का?

आजचीस्त्री मनातील कल्पना वास्तवात आणणारी, पुरुषप्रधान समाजात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारी, जगातील असो वा घरातील समस्यांशी चार हात करणारी आणि घराचा, कुटुंबाचा गड राखणारी आहे. पण आकाशाला गवसणी घालू पाहणारी आजची स्त्री सुरक्षित आहे का? तिचे पंख छाटू पाहणाऱ्या या समाजात ती तग धरू शकेल का? याचे उत्तर आपल्यालाच शोधायचे आहे. अन्यायकरण्यापेक्षा सहन करणारा अधिक दोषी असतो असे म्हणतात, तेव्हा आता सहन न करता शक्ती दाखवा, माझ्या गुन्हेगाराला मी धडा शिकवल्याशिवायशांत बसणार नाही, अशी शपथ घ्या. एका स्त्रीवर होणारे अन्याय व अत्याचार थांबवा, मुख्य म्हणजे आपल्याला बाळगायचाय अभिमान स्त्री असल्याचा. आता वेळ आली आहे सहनशक्तीपेक्षा स्त्रीशक्ती दाखविण्याची आणि अंमलात आणलं तरच आजच्या स्त्रिया या समाजात उभ्या राहू शकतील आणि आपला मान, आपलं स्थान मिळवू शकतील.

स्त्रियांनीही इतिहास रचलाय, माँ साहेब जिजाऊंनी संस्काराचं बाळकडू पाजून स्वराज्याचे स्वप्न साकारण्यासाठी घडवला उभ्या महाराष्ट्राचा जाणता राजा!

झाशीच्याराणीने मुलाला पाठीशी बांधून गाजवलेरणांगण.! आणिसावित्रीबाईंनी दाखवली शिक्षणाची वाट! याचा विसर पडलेल्या या पुरुषप्रधान समाजाला याची आठवण करून देण्याची खरंच वेळ आली आहे.

माझ्यासर्व सखींना हीच विनंती आहे, आपल्याला रचायचाय एक नवा इतिहास, आपल्यासाठी आणि उद्या जन्माला येणाऱ्या प्रत्येक चिमुरडीसाठी. उठा अभिमान बाळगा स्त्री असल्याचा आणि दाखवून द्या या जगाला आणि समाजाला की बांगड्याचे वजन पेलणारे आमचे हे मनगट वेळ पडल्यास समशेरही पेलू शकते!!!

‘ना संपणार तुझे अस्तित्व,
ना तू विरळ होणार,
तुजवाचून हे विश्व आपुले,
किती काळ टिकणार||’

**संदर्भ:- दै.लोकसत्ता, सा.सकाळ, गुगल**

# “नासाची हनुमान झेप”

**कु. राखी वाडेकर**

**F.Y.B.Sc.**

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था ‘नासा’ ने सूर्याच्या अभ्यासासाठीच्या आपल्या पहिल्या मोहिमेला प्रारंभ केला. अमेरिकेच्या स्थानिक प्रमाणवेळेनुसार
‘पार्कर सोलर प्रोब’ हे यान पहाटे ३.३० वाजता प्रवासास निघाले. या यानाद्वारे सोडण्यात आलेल्या उपग्रहाच्या माध्यमांतून सूर्याच्या अधिक जवळून अभ्यास करणार आहे. नासाने सूर्याला स्पर्श करण्याच्या आपल्या ऐतिहासिक मोहिमेअंतर्गत १२ ऑगस्ट २०१८ रोजीलाँच केले. शनिवारी हेलियमअलार्म वाजल्याने लाँचिंग टाळण्यात आले.

‘पार्कर सोलर प्रोब’ हे यानाचे नाव अमेरिकी वैज्ञानिक ‘युजिन पार्कर’ यांच्या नावावर ठेवण्यात आले आहे. त्यांनीच १९५८ मध्ये पहिल्यांदा सौर वादळे असल्याचा अनुमान व्यक्त केला होता. अविशित कण आणि चुंबकीय क्षेत्रांची धारा असते, जी सूर्यापासून निघत राहते जेव्हा या धारा वेगाने निघतात, तेव्हा पृथ्वीवर उपग्रह लिंक प्रभावित होते असे का होते? हे या मोहिमेअंतर्गत स्पष्ट होणार आहे.

अमेरिकेचे खगोलशास्त्रज्ञ युजिन नेवॅमन पार्कर यांचं नाव यानाला देण्यात आले आहे. याअंतराळयानाचा वेग ४ लाख ३ हजार कि.मी. प्रतितास राहणार असून २,५०० अंश सेल्सियस तापमान झेलण्याची यात क्षमता आहे. ‘पार्कर सोलर प्रोब’ हेयान ८५ दिवसांनी ५ नोव्हेंबर रोजी सूर्याच्या कक्षेत दाखल होईल सूर्य पृथ्वीपासून सुमारे१५ कोटी कि.मी. अंतरावर आहे. यानाला सूर्यापासून ६१ लाख कि.मी. अंतरावर स्थापित केले जाईल. हे यान सूर्याच्या सर्वात नजिक पोहोचण्याचा मान मिळविणार आहे. या अगोदर सूर्याच्या नजिक १९७६ मध्ये ‘हिलीयोस-२’ नावाचेयान पोहोचले होते. परंतु ते देखील सूर्यापासून सुमारे ४.३ कोटी कि.मी. अंतरापर्यंतच गेले होते. हिलीयोसच्या तुलनेत ‘पार्कर सोलर प्रोब’ सूर्याच्या ७ पट जवळ असेल.

सूर्य यानाचे वैशिष्ट्य हे त्याच्या वेगातही आहे. नासाचे हे अंतराळयान सूर्यापर्यंत सुमारे ७ लाख कि.मी. प्रतितासाच्या७ सेकंदांमध्ये दिल्ली ते मुंबई अंतर गाठता येणार आहे नासा या मोहिमेकरिता १.५ अब्ज डॉलर्स सुमारे १० हजार कोटी खर्च करणार आहे.

सूर्य यानामार्फत सौरवादळांचा अभ्यास केला जाणार आहे. सूर्यातून बाहेर पडणारी किरणे आणि सौरवादळांचे संशोधन करण्याचा वैज्ञानिकांचा प्रयत्न आहे. या दोन्ही गोष्टींचा पृथ्वीवर मोठा प्रभाव पडतो. तंत्रज्ञान, अंतराळयानाला सौरवादळांचा फटका बसल्याने दूरसंचार सेवा बंद पडते. पॉवर ग्रिडच्या कामकाजात अडथळा निर्माण होतो. तसेच प्रभाव क्षेत्रअधिक उष्ण आहे, या अशा रहस्यांचे उत्तर या मोहिमेअंतर्गत मिळणार आहे.

सूर्ययान मोहिमेमागे भारतीयांचेप्रयत्न कारणीभूत आहेत. मानवी इतिहासात पहिल्यांदाच सूर्याच्या कक्षेनजिक पोहोचण्याचा नासा प्रयत्न करत आहे. भारतीय वंशाचे अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ सुब्रमण्यम चंद्रशेखर यांनी ६० वर्षापूर्वी सौरवादळांच्या अस्तित्वाशी संबंधित संशोधन प्रकाशित करण्यात मोठी भूमिका पार पाडली होती.

पुढील ७ वर्षे हा उपग्रह सूर्याचे वातावरण समजावून घेण्याचा प्रयत्न करणार आहे या प्रकल्पावर नासाने सुमारे १०३ अब्ज रुपये खर्च केला आहे. या यानाला सक्षम अशा हिट शोल्डने सुरक्षित करण्यात आले आहे. कारण सूर्याजवळ जाताना त्याचे तापमान पृथ्वीपेक्षा ५००पट जास्त रेडीएशनही रोखू शकेल. हे हिट शोल्ड ११.५५ सेंटीमिटर  जाड आहे.

नासाच्याया सूर्ययान मोहिमेमार्फत जगालानवीन रहस्यांच्या उलगडा होणार आहे.

सूर्याच्या अभ्यासासाठी नासानेलाँच केलेले हे 'पार्कर सोलर प्रोब' यान २०२४ सालापर्यंत ६.४ मिलियन कि.मी.चे अंतर पार करून सूर्याला एकूण ७ प्रदक्षिणा घालणार आहे. या यानाची वैशिष्ट्ये खूप आहेत. या यानाला थर्मल प्रोटेक्शन सिस्टिमचे आवरण देण्यात आले आहे. हे यान पृथ्वीपेक्षा तब्बल ३००० इतके उष्णता सहन करू शकते. या महान यानात एक वॉटर कुलिंग सिस्टम स्थापितकरण्यातआली आहे, जेणेकरूनसौर उर्जा पासूनयानाचे संरक्षण होते व यानातील तापमान २९°c पर्यंत राखण्याचे काम करते.

**संदर्भ :- दै.प्रहार व दै.तरुण भारत**

# बायोडिझेलचे युग

धनश्री गोविंद सारंग

S.Y.B.Sc.

बायोडिझेलचे रासायनिक नाव फॅटिॲसिड मिथाईल ईस्टर (F.M.E.) असे आहे. सध्या ते बरेचप्रसिद्धीच्याझोतात आहे. जगभर भरमसाट वापर होत असलेल्या पेट्रोलियम डिझेल इंधनातील गंधकाचा अंश कमी-कमी केला गेला तेव्हा आढळले की, त्याचीवाहनाच्याइंजिनातीलआवश्यकवंगणीयता (lubricity) कमी होत आहे.'गरज ही शोधाची जननी', या तत्त्वानुसार संशोधकांनी 'फेम' या रासायनिक पुरकाचा (additive) शोध लावला. हेच ते बायोडिझेल होय. हे रसायन उर्फ बायोडिझेल एरंड, करंज, नागचाफा, रबर या वनस्पतींच्या बियांपासून मिळवितात. तसेच ते पाम तेल, सोयाबीन, शिरसांच्या बियांतूनदेखील निर्माण केले जाते.

सध्या जगभरात दोन प्रकारच्या जैवइंधनाचा वापर वाढत आहे. अन्न-धान्ये, ऊस, मका व बीट यासारख्या पिष्टमय पदार्थापासून तयार होणारे अल्कोहोल जे पेट्रोलसारख्या इंधनात मिसळून त्याचे मिश्रइंधन तयार केले जाते. तर दुसरा प्रकार तेलबियांपासून मिळणारे 'फेम' हे रसायन जे डिझेल इंधनात मिसळून वापरात येत आहे.

या जैविक इंधनाच्या निर्मितीमागे पुढील हेतू आहेत:

- वाहतूकप्रदूषणातून होणाऱ्या कार्बनडाय ऑक्साईड या पृथ्वीचे वातावरण तापविणाऱ्या हरितगृह वायूचे प्रमाण कमी करणे.
- गर्दीच्या भागातील हवेची गुणवत्ता टिकवून ठेवणे.
- उत्पन्नाचे साधन वाढविणे व रोजगारासाठी संधी उपलब्ध करून देणे.
- उर्जेच्या बचतीसाठी हातभार लावणे.
- उपलब्ध नैसर्गिक उर्जास्त्रोतातून गरज भागविणे.

आपल्या देशात विविध पेट्रोलियम गरज भागविण्यासाठी ७० टक्के आयात केले जाते, त्यात एकट्या डिझेल तेलाचा खप एकूण पेट्रोलियम पदार्थाच्या वापराच्या ४० टक्के असतो. तेव्हा दिवसेंदिवस आकाशाला भिडणाऱ्या इंधनाच्या किंमती लक्षात घेता जैविक इंधनाचा वापर एक उत्तम पर्याय ठरतो.

जैविक डिझेल अपायकारक नसते. त्यात गंधक किंवाएरोमॅटिक्ससारखी सेंद्रिय रसायने नसतात. त्यामुळे प्रदुषणाला आळा बसतो. तसेच पेट्रोलियम डिझेल इंधनापेक्षा सरस ठरते. कारण, इंधनाची ज्वलनक्षमता ठरविणारा त्याचा 'सीटेन' क्रमांक एरव्हीच्या पेट्रोलियम डिझेलपेक्षा जास्त असतो. त्याच्या वंगणीय क्षमतेमुळे इंजिनातील इंजेक्शन पंपाचे घर्षणाने होणारे नुकसान वाचते. त्यातील ऑक्सिजेनेटेड रासायनिक अंशामुळे, ज्वलनानंतर कमी प्रमाणात कार्बन मोनोऑक्साईड वायू उत्सर्जित होतो व धुराला आळा

बसतो. या इंधनाचे जैविक विघटन होत असल्याने, ते पर्यावरणमित्र ठरते ते वेगळेच. जैविक डिझेलचे उत्पादन 'ट्रान्सईस्टरिफिकेशन' या प्रक्रियेद्वारे करण्यात येते. अल्कली उत्प्रेरकांचा वापर करून वनस्पतीजन्य तेलाची मेथोनॉलसारख्याअल्कोहोलशीसंयोग घडवून आणला जातो. या प्रक्रियेत दोन महत्त्वपूर्ण पदार्थांचीनिर्मितीहोते. मिथाईल ईस्टरच्या रुपात जैवइंधन व साबणासारखा उपयुक्त पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे ग्लिसरिन होय. बायोडिझेल या इंधनाची लोकप्रियता कमालीची वाढते आहे. त्याच्या निर्मिती व वापरासाठी अमेरिकेत $STM^2$ D6751, तर युरोपियन देशांतEN14214 ही गुणवत्ता मानके लागू करण्यात आली आहेत. 'फेम' हे एक किंवा निव्वळ १०० टक्के इंधन म्हणून वापरले जाऊ शकते. मात्र, त्यासाठी डिझेल इंजिनात काही बदल करावे लागतात. साधारणपणे ही मिश्रइंधने इ.५, इ.१०, इ.२० या नावाने ओळखली जातात व त्यातले जैविक इंधनाचे प्रमाण हे त्यातील आकड्यांवरून निर्देशित होते. या मिश्रइंधनाचे वाटप सध्या अस्तित्वात असलेल्या यंत्रणेद्वारे करता येते.

आशिया-पॅसिफिक विभागातील तेलसाठे हळूहळू कोरडे होऊ लागल्यामुळे येत्या काही वर्षात तिथले तेल उत्पादनाचे प्रमाण कमी होत जाणार आहे. तिथे नवे साठे मिळण्याची शक्यतादेखील कमी आहे. एकेकाळी खनिजतेल निर्यात करणाऱ्या मलेशियावर सध्या पेट्रोलियम पदार्थ आयात करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. इथल्या देशांत जैविक डिझेलचे मिश्रइंधन वापरण्यावर भर दिला जातअसून, काही ठराविक देशांतील मोजक्या पेट्रोल पंपावर त्याचे वाटपदेखीलहोत आहे. युरोपियन देशांच्या तुलनेने आशिया खंडात या जैविक इंधनाची वाटचाल अजूनही बाल्यावस्थेत आहे.

तेल देणाऱ्या अनेक झाडा-रोपट्यांची जगभरातलागवड केली जात असून, जैविक डिझेलचे उत्पादन करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील व्यवसाय खचितच वाढणार आहे. परंतु शेतीचा व्यवसाय निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असल्यामुळे इंधनप्राप्तीचे प्रमाण व त्याची गुणवत्तायात विविधता येण्याचा धोका संभवतो. तसेचविशिष्ट पिकाची एकाच ठिकाणी भरमसाट लागवड झाल्यास त्या ठिकाणचे जैविक वैविध्य धोक्यात येऊ शकते. त्याचप्रमाणे, खते आणि जंतुनाशकांमुळे त्या भागात होणारे पाण्याचे प्रदूषण टाळणे कठीण होऊ शकते.

त्यामुळे या क्षेत्रात सारेच काही आलबेल होत आहेअसेही नाही. जैविक डिझेलच्या निर्मितीचा खर्च, इंधनाची एकजिनसी गुणवत्ता, त्याचे उच्च तापमानाला विघटन होण्याचे अंगीकृत गुणधर्म, त्याच्यावापराला उत्तेजन देण्यास मिळायला हव्या असलेल्या सरकारी सवलती, वाहनांच्या इंजिनात बदल करण्याची वाहन उत्पादकांची नाखुशी, असेकाहीमुद्देउपस्थितहोत आहेत.

आपल्याकडे एरंडापासून जैविक डिझेल उत्पादन करण्यासंबंधी यश मिळाले, तरी या जैविक इंधनाचा आपल्या गरजेला पाच टक्के इतका हातभारलागण्यासाठी २३.००० चौ.कि.मी. क्षेत्रावर जट्रोफाची लागवड करावी लागेल. वाढत्याइंधनखर्चावरआळा घालण्यासाठी आणि गंधकाच्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतीय रेल्वे बायोडिझेलचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करत आहे. प्रारंभी इ.५ डिझेलचा वापर झाला आणि आता इ.२० प्रकारच्या ब्लेंडचा वापर होत आहे. यापुढे शुद्ध जैविक डिझेलचा वापर करण्याचा मानस आहे. भारत

सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण खात्याच्या निरीक्षणानुसार आपल्या देशात १.७५० लक्ष हेक्टर जमीन पडिक आहे. तिच्यात तेलबिया उत्पादन करणाऱ्या झाडारोपट्यांची लागवड करता येईल. दिल्लीतील आय.आय.टी.आणि इंडियन कौन्सिल फॉर ॲग्रीकल्चरल रिसर्च (शेतकी परिषद) या संस्थांनी याबाबतच्यासंशोधनासाठी पुढाकार घेतलेला आहे. पेट्रोलियम कंपन्यांची संशोधन केंद्रे व मोटार उत्पादक शास्त्रशुद्ध ट्रायल्सद्वारा या जैविक इंधनाची उपयुक्तता पडताळून पाहात आहेत.

**संदर्भ:- दै.सकाळ**

# एक गुढ नातं

# विज्ञान आणि अध्यात्माचं.

मानसी सुहास करंदीकर
१२ वी सायन्स ब

विश्वाचं ज्ञान म्हणजे वि-ज्ञान. विज्ञान आणि अध्यात्माचं फार आगळंच नातं आहे. विज्ञान ज्योत आहे तर अध्यात्म समई! अध्यात्म सूर्य आहे तर विज्ञान प्रकाश! अध्यात्म पृथ्वी आहे तर विज्ञान गुरुत्वाकर्षण! अध्यात्म एखादा खंबीर वृक्ष आहे तर विज्ञान त्यावर झुलणारं, फुलणारं कोमल फुल आहे! विज्ञानाचीपाळं-मुळं खणली तर त्याच्या तळाशी अध्यात्माचा अनंतापर्यंत विस्तारलेला गाभा मिळेल आणि अध्यात्माच्या तळाशी डोकावलं तर विज्ञानाची अनेक कवाडं उघडी होतील. त्यातून असा तेजोमय, प्रसन्न प्रकाश उमटेल, जो आपल्याला प्रगतीचा मार्ग खुला करेल!.

खरचं, विज्ञान आणि अध्यात्म ही एकाच गाड्याची दोन चाकं आहेत. विज्ञान भगवंतापेक्षा श्रेष्ठ नाही तर त्याचंच एक रूप आहे. आपल्या अनेक पूर्वापार प्रथा या विज्ञान शास्त्रावरच आधारित आहेत, फक्त त्यांचीकारणं शोधायलाहवीत.

बरं का!.....

आतातुम्हीच बघा. आपल्याला सांगितलं जातं की, "सायंकाळी वा रात्री वडा-पिंपळाच्या झाडांकडे जाऊ नये तिथे भूतं असतात." यामागचं शास्त्र कधी जाणून घेतलंय?...... कारण, विज्ञान सांगतं वड, पिंपळ, चिंच यांसारखे बरेचसे वृक्ष दिवसा ऑक्सिजन मुक्त करतात कारण दिवसा त्यांच्यात प्रकाशसंश्लेषणासोबतच श्वसनाची क्रिया चालू असते. या क्रियेत जास्त प्रमाणात ऑक्सिजन मुक्त होतो परंतु रात्री यांत फक्त श्वसनाची क्रिया चालू असते व त्यामुळे कार्बन डायऑक्साईड मोठ्या प्रमाणावर मुक्त होतो व या वायूत सजिवांचा जीव धोक्यात असतो, म्हणूनअध्यात्मसांगतं की रात्रीच्या वेळी वडा-पिंपळावर जाऊ नये!

आपल्याकडे"ग्रहणात जेवण बनवू नये, काही खाऊ नये" अशी प्रथा आहे. याचा पायाही विज्ञानच आहे. ग्रहणात वातावरण दमट असतं. हवेत बाष्पाचं प्रमाण जास्त असतं. आणिअशा या दमट हवेत सूक्ष्मजिवांची(microorganisms) वाढ जास्त प्रमाणात होते. जे अन्न खराब करतात असे भोजन जेवल्याने आरोग्य खालाऊ शकते म्हणून अध्यात्म सांगतं की ग्रहण लागण्यापूर्वी वा ग्रहणाच्या समाप्तीनंतर जेवावं. वा स्वच्छ स्नान करून जेवावं.

दुसरं म्हणजे आपल्याकडे जेवण जेवण्यापूर्वी श्लोक म्हणण्याची प्रथा आहे. कारण जेवणात गोड-धोड पदार्थांनी सजलेली मेजवानी असते. तिखट, गोड, आंबट असे रुचकर पदार्थ असतात. असे भरलेले ताट बघितल्यावर श्लोक म्हणण्यातील वेळामुळे जेवण प्रत्यक्ष जेवायला थोडा वेळ लागतो, या वेळात जठरातील

जठररस, स्वादुपिंडातील स्वादुरस पित्ताशयातील पित्त, तोंडातील लाळ यांना गाडी आल्याची समजते व ते घरातून बाहेर पडून जठराच्या स्टँडवर जमा होतात. आणि त्यामुळे पचन सुरळीत होते. म्हणून म्हणतात. “जेवणात मन असेल तरच त्याचा तनाला(Body) उपयोग होतो.”

आपण देवाचं नामस्मरण करतो, तेव्हा आपण एकाच वाक्याची, वा शब्दाची पुनरावृत्ती (repetation)करतो. त्यामुळे आपलं मन एकाग्र होते. सतत पुनरावृत्ती झाल्याने मेंदू एकाग्र होतो आणि आपल्या सैरभैर झालेल्या विचारांना योग्य दिशा व गती मिळते. म्हणून अध्यात्म म्हणतं, दिवसातून पाच मिनिटे तरी देवाचे नामस्मरण करावे.

अशा अनेक रूढी, परंपरा आहेत ज्यांच्या मागे फार मोठं विज्ञान आहे. भगवंत हा मानवी मनाच्या जिव्हाळ्याचा व आदरयुक्त भीतीचा विषय आहे. त्यांच्यापर्यंत पोहोचतं ते अध्यात्म! आता अशा वैज्ञानिक कारणांचे पाढे वाचले तर लोक मानणार आहेत का?.... नाहीत. म्हणून त्याला अध्यात्माची पर्यायाने भगवंताची जोड दिलेली आहे.

प्रथा पाळण्यात, देव मानण्यात काहीच हरकत नाही. कारण, आस्तिक लोक म्हणतात की, “देवाचं सतत नाव घ्या, त्याला लोटांगण घाला.” अन् नास्तिक लोक म्हणतात, “देव”असं काहीही नाही. पण सत्य हे आहे की, देवहा माणूस नाही, जनावर नाही, दगड नाही तरतेएक‘शक्ती स्थान’ आहे. Every Scienceis based on‘ASSUMITION’हेच तर गुढ आहे. आईनस्टाईन म्हणतो, “वीज ही निर्मिती असेल तर कोणीतरी निर्माता असणारच. पण तो मी नाही!” म्हणजेचकाय, की आपण फक्त त्या शक्तीने घडवलेल्या असंख्य गोष्टी शोधून काढू शकतो......
पण त्याचा निर्माता?.....! झाडाची, फुलाचीरचना, प्रजननाची क्रिया कशी होते हे सांगता येतं. पण, योग्य वेळी, योग्यत्या फुलावर नैसर्गिकरित्या परागकण कसे काय जाऊन पडतात? नियमित घडणारे सृष्टीबद्दल पाऊस, थंडी, वारा, उन्हाळा यांचा समन्वय साधणारा कोण? प्रकाश माध्यमाशिवायहीवाहू शकतो पण, ध्वनीमात्र माध्यमावर अवलंबून हे कोणी ठरवलं? सजिवाचं जीवन विज्ञान सांगते, पणत्यांत असणाऱ्या प्राणाचं अस्तितत्व टिकवणारा तो महान निर्माण कोणी वेगळाच आहे. म्हणूनच विज्ञान म्हणतं, “There is Super natural Power which is controlling all this universe.”

देव ही पाहण्याची नाही, ती अनुभवण्याची गोष्ट आहे. वायू दिसत नाही, पण तो असतो म्हणजेच ते दिसत नाहीत म्हणून त्यांचं अस्तितत्वच नाही असं आपणम्हणतनाही! तसंच देवाचं आहे. तोच एक कर्ता-धर्ता आहे.

म्हणूनच, मी म्हटलं की,विज्ञान हे भगवंताचंच एक रूप आहे. म्हणून आपण विज्ञानाची कास धरूया प्रत्येक प्रथेमागच्या वैज्ञानिक शास्त्रापर्यंत पोहोचूया की, मनुष्यसेवा, पशुसेवा, वृक्षसेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून आपल्याला मिळालेल्या मनुष्य जन्माचंसार्थक करूया.
शेवटी एकच-
“विज्ञान हे जग कसं निर्माण झालं सांगत असेल, तर अध्यात्म हे जग का निर्माण झालं याची साक्ष देतं”

# कुष्ठरोग !

अमित वळंजू,
११वी सायन्स

कुष्ठरोग.....! दचकलात ना हा शब्द वाचून! प्रत्येकाची अवस्था अशीच होते. जेव्हा हा शब्द कानावर पडतो. एक अनामिक भीती मनामनात दाटून राहिलेली आपल्याला दिसून येते. काय आहे कुष्ठरोग?

शरीर दोषणांदोष: मलिनी करुणान्मला
धारणाद्धात वश्चस्थुर्वातपित्त कफास्त्रय:||

याकाव्यपंक्तीआहेत'विनोबाभावे' यांच्याआचार्यविनोबाभावेयांनीकुष्ठरोगाबाबतचे आपले विचार या काव्यपंक्तीतून व्यक्त केलेले आहेत. कुष्ठरोगाचे शरीरावर होणारे परिणाम, वरील काव्यपंक्तीत व्यक्त झाले आहेत.

मित्रांनो, आपल्या आरोग्यावर परिणाम करणारे अनेक आजार आहेत. मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, लेप्टोस्पायरोसिस, हिंवताप, क्षयरोगअसे एक ना अनेक आजार आपल्या देशात विशेषतः मोठ्या शहरात मुक्काम ठोकून असतात. कुष्ठरोग हाही एक आजारच आहे.

साधारणत: कुष्ठरोग हा जिवाणुंमुळे होणारा सौम्य संसर्गजन्य आजार आहे. याची वाढ अत्यंत हळू-हळू होते. कुष्ठरोग हा अनुवंशिकनाही. हा रोग कुष्ठ जंतुमुळे होणारा आहे.कुष्ठजंतू हे सुक्ष्मदर्शक यंत्राखाली लाल काड्यासारखे दिसतात. कुष्ठरोगाचा जंतू हा डॉ.हॅन्सन यांनी इ.स.१८७३ मध्ये शोधून काढला.

कुष्ठरोगावर आपल्याला काही प्रतिक्रिया व बहुविध औषधोपचार करता येतील.

कुष्ठरोग बाधित व्यक्तीला औषधोपचार निदानाच्या वेळी, औषधे घेत असताना किंवा औषधोपचार पूर्ण झाल्यावर देखील कुष्ठरोग प्रतिक्रिया होऊ शकते. बहुविध औषधोपचार हा कुष्ठरोगावरील खात्रीचा उपचार आहे.

कुष्ठरोगावरएकूणचारचार ठराविक उपचार पद्धती आहेत. पहिली म्हणजे पी.बी.(प्रौढांसाठी),दुसरी म्हणजे पी.बी.(लहान मुलांसाठी), तिसरी म्हणजेएम.बी.(प्रौढांसाठी) आणि चौथी एम.बी.(लहान मुलांसाठी) अशा चार ठराविक उपचार पद्धती आहेत.

या रोगावर ठराविक औषधोपचार करणे आवश्यक आहे. औषधोपचार केल्यावरच कुटुंबातील मुलांची तपासणी करावी. नाहीतर मुलांना लवकर संसर्ग होऊ शकतो. बहुविध औषधोपचार हा प्रभावी असून सर्व आरोग्य उपकेंद्र व प्राथमिक आरोग्यकेंद्रावर उपलब्ध आहेत. हा औषधोपचार विनामूल्य मिळतो. पुनर्लागण व विकृती टाळण्यासाठी बहुविध औषधोपचार हा संपूर्ण घेणे आवश्यक आहे

कुष्ठरोग म्हणताक्षणी आपल्याला आठवतात ते कुष्ठरोग्यांची सेवा करणारे आपले प्रिय बाबा आमटे. समाजसेवेचे व्रत स्वीकारलेल्या बाबा आमटे यांनी सर्वप्रथम जेव्हा कुष्ठरोगाने पीडित व्यक्ती रस्त्याच्या कडेला

पडलेला पाहिला तेव्हा ते हादरूनच गेले. माणूस कसला मासाचा एक लिबलिबित गोळा. माणूसपणाच्या सर्व खुणा नाहीशा झालेल्या अशा त्या रुग्णाला पाहिल्यानंतर बाबा आमटेंनी कुष्ठरोग्यांच्या सेवेचे व्रत स्वीकारले.

कुष्ठरोग्यांच्या सेवेचे हे व्रत निश्चितच सोपे नव्हते. या रोगाने पीडित व्यक्तीला स्वीकारायला कोणीही तयार नसत. अगदी रक्तामासाची नातीसुद्धा दूर होतात. अशा पीडित व्यक्तीला उपचाराबरोबरच मानसिक आधार देण्याचे काम बाबा आमटेंनी केले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कुष्ठरोग्यांच्या सेवेत घालवले. कुष्ठरोग्यांना आपलसं मानून त्यांची सेवा केली. त्यासाठी त्यांनी आनंदवन नावाच्या एका आश्रमाची स्थापनाही केली. या आश्रमाचे उद्घाटन हे आचार्य विनोबांच्या हस्ते २१ जून १९५१ रोजी करण्यात आले होते.

आजही समाजात कुष्ठरोगाच्या संसर्ग जडलेल्या व्यक्ती आपल्या आजुबाजूला सामान्य जीवन जगताना आपल्याला दिसून येतात. परंतु वेळीच निदान व उपचार न झाल्यास हा रोग बळावून कायमचे अपंगत्व येवू शकते. व एकंदरित सामाजिक स्वास्थ्यावर विपरितपरिणाम होण्याची शक्यता असते. यासाठीआवश्यकता आहे ती सामाजिक जागरुकता आणि जाणीव जागरूकतेची. याबाबतच्या गैरसमजूती व अज्ञान दूर केले गेले पाहिजे. कुष्ठरोगाला कायमचे हद्दपार करण्यासाठी प्रत्येकाने या रोगाचा शोध घेऊन योग्य तो औषधोपचार घ्यायला हवा. योग्यती खबरदारी घ्यायला हवी.

खरी जबाबदारी आहे ती म्हणजे रुग्णाच्या परिवाराची आणि समाजाची सुद्धा. रुग्णाला योग्य चिकित्सेकरिता प्रवृत्त करायला हवे. त्याचवेळी त्याला मानसिक आधार द्यायला हवा, समाजात त्याला मानाने जगता यायला हवे. यासाठी सामाजिक सामुहिक प्रयत्न व्हायला हवेत.

तरच आपण सगळेच समाजामध्ये सर्वसाधारण आणि सामान्य आयुष्य जगू शकतो. नाही का?

"कुष्ठरोग मुक्ततर,होतील मुले सशक्त".

संदर्भ:- निबंध पुस्तक

# जगण्याची कला

**विनायक अपराज**

**T.Y.B.Com.**

'डोळे भरून तुमची आठवण कुणीतरी काढतच ना?
उनउन दोन घास तुमच्यासाठी वाढतच ना?'

मंगेश पाडगावकरांची ही कविता जीवनाचे मर्म खऱ्या अर्थाने उलगडून दाखवते. मनुष्य जन्म एकदाच लाभतो असे म्हणतात, पण आपल्याला लाभलेला मनुष्य जन्म पुन्हा मिळणार नाही याचा बहुतेकांना विसर पडतो. म्हणूनच कित्येक लोक आपले जीवन चिंता करण्यात, संपवून कुढत बसण्यात घालवतात किंवा अपयशाने खचून ते संपवून टाकतात. निसर्ग मोठा जादूगार आहे. त्याचे आपण कधी निरीक्षण करतोका ? मला वाटते ते केले पाहिजे. तरच आपल्याला जीवन कसे जगावे याची दिशा मिळेल, निसर्ग माणसाला जगायला शिकवतो.

खळखळून वाहणारी नदी तिच्या वाटेत कितीतरी दगडधोंडे येतात, अडथळे येतात, त्या सर्वांना पार करीत ती सर्वांची तहान भागवते. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदाभेद कधीच करीत नाही. रस्त्याच्या कडेला उभी असलेली झाडे वाटसरूला सावली देण्यासाठीच जणू उभी असतात. प्रात:काल होताच दाही दिशा उजळून टाकणारा सूर्य दाहक पण तितकाच तेजस्वी! रात्र होताच शीतलता देणारा चंद्र हे निसर्गातील विविध घटक आपल्याला जीवन कसे जगावे याचा संदेश देतात. नदीची सतत वाहण्याचीवृत्ती, झाडांचीपरोपकारीवृत्ती, सूर्याची सतत माणसाला कार्य करण्यासाठी प्रेरणा देणारी वृत्ती, हे गुण आपल्यालाहीजोपासले पाहिजेत. निसर्ग आपल्याला खूप काही शिकवतो, मला असे वाटते. नुसते खा, प्या मजा करा हे जगण्याचे सूत्र नव्हे. हे सूत्र अंगिकारणे म्हणजे जगणे का?

जीवनाच्याअनेकव्याख्याथोरविचारवंतानीकेल्याआहेत. कुणीयाजीवनालारंगभूमीम्हटलेआहे, कुणीयालादोनघडीचाडावतरकुणीयालालढाईचम्हटलेआहे. उनसावलीच्या खेळासारखे आपले जीवन असते. त्यात अनेक चढ-उतार असतात. अनेक कवीसुद्धा आपल्या कवितांमध्ये जीवनाचे सुंदर वर्णन करतात. बालकवी तर म्हणतात, 'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे', तर रवींद्रनाथ टागोर म्हणतात की,'जीवन ही पाठशाळा आणि निसर्ग त्यातले पुस्तक आहे'. 'सुख पाहता जवापाडे दु:ख पर्वताएवढे'|| असे संत तुकाराम महाराज म्हणाले.ते पुढे असेही म्हणाले की, रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, हे सारे सांगण्याचा उद्देश काय? तर त्यांना ही जीवनरूपी नौका संघर्षमय वाटली, पण त्यातही त्यांना आनंद वाटतो.

जीवन हे नि:स्वार्थी असावे, कारण ते जर नि:स्वार्थी असेल तरच त्याला अर्थ येतो. प्रत्येक गोष्टीला अंत असतो तसा जीवनाला आहे. पण मी म्हणेन की, मनुष्याच्या जीवनाला अंत आहे परंतु त्याच्या नावाला अंत नाही. हो त्याचे नाव हे मागे राहतेच, पण लोकांनी ते चांगल्यासाठीच आपल्या मुखावर आणावं. अर्थात

ते माणसाने जीवन कसे जगले यावरच ते अवलंबून असते सर्व पक्ष्या-प्राण्यांशी प्रेमाने वागणारे आपण लोक एकमेकांशी मात्र वैऱ्यासारखेवागत असतो. लहान वयात आपण आपल्या आई-वडिलांच्या नावाने जगत असतो. म्हणून आपण जरा जरी गैरवर्तन केले की, लगेच लोक आपल्याला पाहून बोलतात की, हा अमुक एकाचा मुलगा, मुलगी. म्हणूनच आपण आपले वागणे सौजन्यपूर्ण ठेवले पाहिजे आपण वागतो ते चूक की, बरोबर? याचा विचार आपणच केला पाहिजे. परीक्षेत अपयश आलं की केली आत्महत्या, अन्य कशात अपयश आलं की केली आत्महत्या. हे जीवन इतके स्वस्त मुळीच नाही की आपण क्षणाचा विचार न करता संपवावं. त्या जीवनाचे महत्त्व जीवन संपवून टाकणाऱ्याला म्हणजेच स्वतःला कळत नसलं तरी नऊ महिने जिने बाळाला तिच्या उदरात वाढवलं तिला आपल्या मुलाच महत्त्व कळतं, तिच्यासाठी मूल म्हणजे तिचं काळीज!

जीवन कसे जगावे याबद्दल प्रत्येकाच्या कल्पना भिन्न असतात. प्रत्येकाच्या जीवनाला एक विशिष्ट ध्येय असते, ते असलेच पाहिजे.आपला भारत देश ध्येयवेड्यांनी भरलेला देश आहे. ध्येय कोणते? स्वातंत्र्य प्राप्तीचे! मला वाटते, असे ध्येयवेडे नसते तर भारताला स्वातंत्र्य मिळाले नसते. ध्येयहीन जीवन शीड नसलेल्या गलबताप्रमाणे असते. जीवन हे कलापूर्ण असावे. जसे आपण विविध गोष्टींचा आस्वाद घेतो, तसेच आपणाला दुःखाची जाणीव देखील असली पाहिजे. घरातून कामावर जाताना वाटेत एखादा अपघात झालेला असला आणि त्यात एखादा कुणीतरी ठार झाला असला तर आपणाला दुःख होते. तरतेथेच उपस्थित काहीजणांची प्रतिक्रिया उमटते मरायला हीच जागा मिळाली होती का? इच्छा असून पुढे जाता येत नाही.

घड्याळाच्याकाट्यावर नाचणारे आपले जीवन संवेदनशील राहिले आहे का? संवेदनाहीन याचा विचार आपण केला पाहिजे. पण हा विचार करेपर्यंत वेळ निघून गेलेली असते, आणि मग हुर हुर लागते अरे मी खरेच जीवन जगलो का? की नुसती घाई केली जीवन जगताना?

जीवन सुंदर आहे.म्हणूनच कवी मंगेश पाडगावकर आपल्या गीतात म्हणतात 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे'.

संदर्भ:- यु.पी.एस्.सी. संदर्भ पुस्तके

# प्लास्टिकचा निरोप

कु.सर्वेश दौलत राणे
११ वी कॉमर्स

नमस्कार! काय कसे आहात सगळे? प्लास्टिक वापरतांय ना? अहो वापरलंच पाहिजे....काय म्हणतां? नाही वापरत, मला नाही वापरत?अहो पण का? म्हणजे २३ जून पासून शासनाने सुरु केलेली प्लास्टिक बंदी खरोखरचं अंमलात आली की काय ? या सर्वांमुळे तुम्हां सर्वसामान्यांची संभ्रमावस्था वाढली की नक्की कुठलं प्लास्टिक ठेवायचं? कुठलं देऊन टाकायचं? कुठलंही प्लास्टिक वापरताना दिसल्यास खरचं दंड होणार आहे का? असे अनेक प्रश्न तुम्हां सर्वांच्या मनात निर्माण झाले असतीलच. अहो! तुमच्यातील काही लोकांनी दंडाच्या पावत्या सोशल मिडियावर शेअर करून माझ्या बंदीच्या विरोधात जनमत बनवायला सुरुवातदेखील केली होती.

माझ्यावापरामुळे पर्यावरणाला होणारे धोके, माझ्यापासूनतयारहोणाऱ्याबॅग्जतुम्हांसर्वांनाच माहिती आहेत. माझ्यामते, आजनिव्वळमाझ्या वापरामुळे होत नसेल, इतकं नुकसान केवळ माझ्यापासून तयार होणाऱ्या माझ्या बॅग्जच्या वापरामुळे होत आहे. माझ्याबॅग्ज (थैली किंवा पातळ पिशवी) तयार झाल्यानंतर ती नष्ट होण्यासाठी सुमारे हजार एक वर्ष लागतील.

जगातील सर्व प्रमुख समुद्र आज निरनिराळ्या आकाराच्या माझ्या पिशव्यांच्या ढिगांनी कोंदलेले आहेत. त्या समुद्रांमध्ये तर माझ्यापासून तयार झालेल्या पिशव्या नुसत्या तरंगतायत काहीतर तेथे या पिशव्यांच्या कचऱ्याची महाकाय बेटं निर्माण झालेली आहेत. या पिशव्यांमुळे जमिनीवरील व समुद्रातील प्राणी खाद्य म्हणून त्या पिशव्यांचे सेवन करतात. त्यामुळे त्यांच्या पोटात जंतूसंसर्ग निर्माण होऊन त्यांची पचनक्रिया बिघडते, आणि अखेर त्यांचा मृत्यू होतो आजजगातील समुद्रांमध्ये ९०% कचरा हा माझ्यापासून निर्माण झालेल्या वस्तू व पिशव्या यांचा आहे. हीच परिस्थिती जमिनीवरील असणाऱ्या कचऱ्याची आहे. हीच परिस्थिती तुम्ही सहज आजूबाजूच्या कचऱ्याच्या ढिगाकडे नजर टाका तर, माझ्या पिशव्या चघळणारी एखादी गाय वा कुत्रा नक्कीच दिसेल. हे प्राणी असेच दुर्दैवी असतात. अहो! तुम्हाला मी घातक आहे, हे कळत असल्यामुळे तुम्ही मला खात नाही; मात्र मला वापरण्याचे कार्य अद्यापही तुम्ही थांबवलेले नाही.

काही देशांमध्ये माझ्यावर आणि माझ्या पिशव्यांच्या वापरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. अलीकडेचआयर्लंडसारख्या देशांमध्ये माझ्यापिशव्यांच्यावापरावरTAX देखीलसुरु केला; म्हणजे काय? तर, माझ्यापिशव्या लोकांना वापरायच्याच असतील तर त्या TAX भरून वापराव्यात. कारण अनेक उद्योग तसेच संस्थांना माझ्या पिशव्यांची वेष्टन इ. करिता गरज असते. या TAX मुळे माझ्या पिशव्या वापरण्याची गरज आहे का? या दृष्टीने विचार करायला लोकांनी सुरुवात केली. आपण विनाकारण TAX का भरावा!

म्हणूनलोकांनी मग माझ्या पिशव्यांचा वापर कमी केला. या उपायांमुळे माझ्या पिशव्यांच्या वापरात घट झाली. यासारखी अनेक महत्त्वाची माझ्याविषयीची पावले अनेक देशांनी उचलली आहेत.

काही दिवसांपूर्वीच आपल्या भारत सरकारने माझ्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय योग्यच आहेअसे मला वाटते. आज आपल्याकडे छोटी छोटी गावं वशहरं पर्यावरणाचा नाश होऊ नये म्हणून माझा वापर कमी करत असताना दिसत आहेत. माझ्या जागी लोक तागाच्या, कागदाच्याव कापडी पिशव्यांच्या वापर करत असताना दिसत आहेत. या पिशव्यांना लोकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे; परंतु आता सध्या महाराष्ट्र शासनाने माझ्या उत्पादनावरसरसकट बंदी लादली आहे. त्यामुळे माझे उत्पादन कमी प्रमाणात होत आहे.

माझ्या मते, तुम्ही सर्वांनी आज एक साधा विचार करणे, गरजेच आहे. यापूर्वी माझ्या पिशव्यांचं आणि पॅकेजिंगच एवढं खूळ बोकाळलेल नव्हतं. मला तुम्ही सांगा, “मी नव्हतो तेव्हा, प्रगती होत नव्हती असंही नव्हतं.” परंतु मला सांगा आधीच्या पिढीने पर्यावरणस्नेही जीवनशैली अंगीकारली होती ना ! तेव्हा तर लोक दूध, तेल इ. सारखे द्रवपदार्थ आणण्यासाठी घरूनचं डबे किंवा बाटल्या न्यायचे. वाणसामान कागदाच्या पुड्यांमधून बांधून आणलं जायचं. बाजारहाट करताना, घराबाहेर पडताना स्वतःची कापडी पिशवी आवर्जून घेऊन जायचे. आधुनिकीकरणाच्या आणि इंन्स्टंटच्या जमान्यात ह्या गोष्टी आऊट डेटेड ठरवल्या गेल्याने वापरा आणि फेका (Use andThrow)ही स्वस्तातली वृत्ती वाढीला लागल्यामुळे वरदान असलेला मी (प्लास्टिक) भेसूरअसूर बनायला लागलो.

आजच्याकाळात माझा वापर पूर्णपणे टाळणे शक्य नाही. परंतु डोळसपणे केल्यासप्रदूषणाचेप्रमाण नक्कीच कमी होईल. तेव्हा या निमित्ताने मी प्लास्टिक तुम्हां सर्वांना आवाहन करतो की,माझा वापर योग्य तेथे करा व पर्यावरण वाचवा!

# पर्यावरण व मानव

साधनाअनिलवारीक

१२ वी सायन्स

स्वतःच्या मस्तकावर डोंगरदऱ्यांचा, नदीनाल्यांचा भार धारण करणाऱ्या..... समस्त प्राणीजातीचे पोषण करणाऱ्या..... उंचच उंच धबधब्यांना अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या...... असंख्य वन्यजीवांना आपल्या पंखाखाली आश्रय देणाऱ्या पर्यावरणाला माझा प्रणाम! सगळ्या प्राणीजगतावर, वनस्पती जगतावर सत्ता असतानाही त्यागी जीवन जगणारे पर्यावरण एखाद्या सत्पुरुषाप्रमाणे वाटते.

मुंगीपासून गरुडापर्यंत सर्वजण या धरतीची प्रकृती सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करतात, पण माणूस मात्र आपल्या बुद्धिमत्तेने आणि कार्यशक्तीने पर्यावरणाचा तोल बिघडून टाकतो आहे. मानवाचे हे बेजबाबदार जिणे एक दिवस जग निर्मनुष्य करून सोडेल असा धोका वाटत आहे. निसर्गाने माणसाला मुबलक दिलेली हवा आणि पाणी यांचा योग्य उपयोग करण्याऐवजी दुरुपयोगच करतो. तो भविष्याचा विचार करत नाही. अलिकडे तर शहरांतील माणूस मातीपासून दूर जात आहे वाढती वृक्षतोड मानवाच्या अस्तिवावरच आघात करत आहे. माणूस आपल्या सौंदर्याचा विचार करतो, परंतु वसुंधरेच्या सौंदर्याची थोडीही काळजी घेत नाही.

उपकारकर्त्या वृक्षांचाऱ्हास होत आहे. मानवाने बेसुमार जंगलतोड करूनवैराणवाळवंटेनिर्माण केली आहेत.'After man, the desert'मानवाचे पाऊल अन् वाळवंटाची चाहूल अशीच म्हण आजच्या काळात लागू पडते.

'सुजलाम् सुफलाम्मलयज शीतलाम् सस्यश्यामला' अशी आपली धरती! विविधतेने नटलेली, पाचूच्या बेटासारखी. स्वतःची शाळा शशीच्या समवेत असावी म्हणूनचरविंद्रनाथ टागोरांनीशांतिनिकेतनचीस्थापना वृक्षराजींच्या समवेत केली. संत तुकाराम महाराजांनी वृक्षांचे महत्त्व सांगताना म्हटले आहे, 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे' या सगळ्यातून एकच महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, मानवी जीवनासाठी पूरक व अत्यावश्यक असणारे 'हसरे पर्यावरण'राखायचे असेल तर त्यासाठी वनस्पतींची गरज आहे.

अन्न, वस्त्र, निवारा, जळण व्यवसाय इ. अनेक कारणांमुळे मानव वनस्पतींवर अवलंबून आहे. वनस्पती सूर्यप्रकाशामध्ये $CO_2$ घेतात व$O_2$ निर्माण करतात. प्राणवायू पुरविण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे. परंतु वनांचे अस्तित्व कमी होऊ लागले आहे, कारण माणसाच्या मनात स्वार्थ, पैशाचे प्रेम श्रेष्ठ ठरत आहे. शेती, कारखाने, वाहतूक मार्ग, वाढती लोकसंख्या, घरबांधणी यासाठी बेसुमार जंगलतोड होत आहे. तसेच वन्य प्राण्यांच्या जातीही नष्ट झाल्या आहेत. म्हणूनच प्रत्येक सजीवाला वनांचे अस्तित्व हवे आहे.

'नेमेचि येतो मग पावसाळा' या नियमांनुसार आमच्या देशात 'नेमेचि येतो वन्यपशू सप्ताह' मगत्यासप्ताहाच्या मागेपुढे या वन्यपशूंची चित्रे सर्वत्र झळकतात. नभोवाणी, दूरचित्रवाणी आणि वृत्तपत्रांतून या वन्यपशूंविषयीच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते. पण हे सारे चालते फक्त एक आठवडाभर.

वन्यपशू सप्ताह संपतो आणिमाणूसआपलेवयावनचरांचेमित्रत्वाचेनातेपारविसरतो. मानवप्राणी, पशू-पक्षी यांवर खरचं प्रेम करतो का? असे एक ना अनेक प्रश्न मलासतावतात कारण वर्तमानपत्रातून वाचण्यातयेते अमुक ठिकाणी बिबट्याचावावर ! बिबट्यानेमाणसावर हल्ला केला! वाघाची घुसखोरी! मगहेसगळे मानव त्या प्राण्यांच्या मागे कुऱ्हाडी, बंदुका, घेऊन जातात. पण हा विचार करत नाहीत की, हे प्राणी मानवी वस्तीत का घुसले? आहे की नाही गंमत? अरेरे!! गंमत नाही ही, दाहकवास्तवआहे, दाहकवास्तव! आजमाणूसडायनॉसॉरच्याअस्तित्वाचेसंशोधन करू लागला आहे. आज विविध दुर्मिळ वनस्पती नष्ट होऊ लागल्या आहेत. व त्यावर आधारलेल्या काही प्राण्यांच्या जाती देखील नष्ट झाल्या आहेत. कदाचित याच पद्धतीने आपलाहीनंबर नाही ना लागणार? आपण देखील पूर्णतःवनांवरच अवलंबून आहोत व तीच नष्ट करून आपलेअस्तित्वउरेल का? की, तोहीआपल्याशेजारीलपरग्रहवासियांसाठीडायनॉसॉरच्या अस्तित्वासारखा 'मानवाचेअस्तित्व' हासंशोधनाचाविषयठरेल?

"वरआभाळगडगडते, खालीधरती थरथरते,
अवती-भवतीप्रदुषणाचे, वादळभिरभिरते."

प्रदुषणाचे भयंकर स्वरूप आपल्या सर्वांनाच परिचयाचे आहे. प्रदुषणाने सर्व भूतलावच हादरवून सोडले आहे. प्रदुषणामुळे पृथ्वीचा संरक्षक थर'ओझोन' विरळ होत आहे. भविष्यांतील पिढ्यांवरही याचा भयानक परिणाम होऊ शकतो. प्रदूषण हा राक्षस एकांगी नाही, तर त्याला अनेक पैलू आहेत. 'लांडगा आला रे आला' या गोष्टीतला लांडगा जसा मेंढरांचा फडशा पाडतो, तसे हे प्रदूषण सर्व घटकांचे जीवन बेजार करत आहे. यांमुळे पर्यावरणाचा तोल ढासळत आहे.

सध्यामृदा प्रदुषणही जोरदार सुरु आहे. रासायनिक खतांचा वापर, जमिनीची धूप, पाण्याचा अतिवापर यांमुळे मृदा प्रदूषण होते. ज्या मातीत आपला जन्म होतो, त्याच मातीत आपला मृत्युही होतो. मातीमुळेच पृथ्वीवर जनजीवन आहे. माती नसती तर सजीव कोठून आला असता? याचमातीचे प्रदूषण करणेयोग्य आहे का? हे प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवे.

पाणी ही सजीवांसाठी अत्यंत महत्त्वाची निसर्ग देणगी आहे. पाणी म्हणजेच जीवन. अवघ्या सृष्टीचे जीवन पाण्यावर अवलंबून आहे. पाणी नसेल तर माणसाचे जीवन गतिमान होणार नाही. पण हेच पाणी जसे तारक आहे तसे मारक कोण करतं? याचा विचारच कोणीकरत नाही. आपण मनात आणलं तर हे चित्र होत तसं रंगीत व्हायला वेळ नाही लागणार. विकासाबरोबर पुन्हा आपली सृष्टीसुजलाम सुफलाम् करूशकतो.

"साऱ्याच कळ्यांना हक्क आहे फुलण्याचा
मातीमधला वतन वारसा आकाशावर कोरण्याचा"

पण कवी कुसुमाग्रजांनी सांगितलेला आदर्श प्रत्यक्षात येणे अशक्य आहे. सर्वांना विकासाची समान संधी लाभावयाची असेल तर मर्यादित लोकसंख्या असायला हवी. या लोकसंख्यावाढीच्या समस्येवर प्रभावी उपाय तरी कोणता? केवळ कायद्याने लोकसंख्यावाढ थोपवतायेणार नाही. लहान कुटुंबाचे महत्त्व सर्वांनी समजून घेतले पाहिजे 'कुटुंब लहान, सुख महान' हे प्रत्येकाला मनोमनी उमगले की, सर्व समस्यांचे मूळ, असलेला हा लोकसंख्यावाढीचा प्रश्न सुलभपणे सुटेल

वृक्षतोड, प्लॅस्टिकचा अतिवापर, रासायनिक खतांचा वापर, अनविकरणीय उर्जा साधनांचा वापर, या व अशा कितीतरी कारणांमुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. म्हणूनच यांवर उपाय करणे गरजेचे आहे.

"प्राणी जैसा सोचता है
वैसा बोलता है
जैसा बोलता है
वैसा करता है
और जैसा करता है
उसी तरह के फल भुगतता है|"

हीअथर्वा ऋषींची वाणी आहे. वृक्षांचे मानवी जीवनातील स्थान व पर्यावरणातील महत्त्व त्यांनी तत्त्वज्ञान स्वरुपात मांडले. वृक्षारोपण संवर्धन व संरक्षण हा एक साधा सोपा उपाय आहे. मोकळ्याठिकाणी वृक्षांचे रोपण करावे. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यांचे संवर्धन करावे. वनस्पतींचीसंख्यावाढली तर $CO_2$ चे प्रमाण कमी होऊन $O_2$ प्रमाण वाढले.

प्लॅस्टिक निर्मिती ही मानवी जीवनातील क्रांतीकारक घटना आहे. नाण्याला दोन बाजू असतात, त्याप्रमाणे प्लॅस्टिकमुळे मानवी गरजा भागवल्या जातात. पण ते कुजत नाही पॉलिबेंड मध्ये वापरलेलं प्लॅस्टिक रूपांतरित करून रस्ते बांधणीला त्याचा वापर होऊ शकतो.

आपण जाणतो की रासायनिकखते पर्यावरणास घातक आहेत. त्यांच्या अतिवापरामुळे जमीन नापीक होते. ती पाण्यात विरघळल्यास जलप्रदूषण होते.

म्हणूनच त्यांचा वापर टाळून सेंद्रिय खतांचा वापर वाढवला पाहिजे. जलप्रदुषण रोखण्यासाठी 'पाणीअडवा, पाणी जिरवा' यासारख्या उपाययोजना केल्या पाहिजेत. नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या उर्जेचा वापर वाढवला पाहिजे.

'वाणीपेक्षा कृती श्रेष्ठ' म्हणून हे सर्व उपाय फक्त बोलून चालणार नाहीत तर ते प्रत्यक्ष कृतीत उतरवले पाहिजेत. तरच आपली पृथ्वी पूर्वीसारखी हसणारी दिसेल!! मग कराल ना हे उपाय!!

मित्रांनो,बरेच उपाय आहेत की, ज्यामुळे आपण आपले पर्यावरण वाचवण्यात खारीचावाटाउचलूशकतो. फक्त बोलून किंवा व्याख्यानेदेऊनपर्यावरण वाचवता येणार नाही तर यात कृती फार महत्वाची आहे. वातावरण शास्त्रज्ञ लव्हलॉक यांच्यामते 'सर्वच गोष्टी मानवी दृष्टीकोनातून पाहिल्यामुळे आज मानव संकटाच्या खाईतलोटलाआहे' आजजगातीलपर्यावरण संशोधक, विचारवंत हे पर्यावरण संरक्षणासाठी कार्यरत आहेत. मानवी जीवनात आतापर्यंत अनेक भयंकर युद्धे झालीत. त्याचे परिणाम संपूर्ण जगाने पाहिले आहेत.जपान सारख्या देशाने ते भोगलेही आहेत. मानव चंद्रावर गेला व परत आला म्हणजे सर्व मानव जात चंद्रावर जाऊन परत आली नाही. आजही काही लोक अज्ञानी आहेत. तर काहींनी अज्ञानीपणाचं सोंग घेतलं आहे. 'चार भिंतींच विश्व' हेच सर्वसामान्य मानवासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरण संरक्षण हेच मानवी जीवनाचे भविष्य आहे.

निसर्ग हा खूप शक्तिशाली आहे. निसर्गामुळेच असंख्य कवी, संगीतकार, चित्रकार वविचारवंतनिर्माणझाले आहेत. अशा या निसर्गाचे रक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

आता विचार कसला करताय दोस्तांनो! मग चला तर आपले पर्यावरण वाचवायला!

**"Live and Let Live".**

# माझो बाप

माझोबापअसोचहा,
तुमच्याबापासारखो!
जीवनाचोतोहातहा,
प्रेमळ माऊलीसारखो!

माझ्या बापानं केल्यान् काय?
ह्या सिध्द करूची गरज नाय!
माझ्यासाठी जा काय केल्यान्
ता कोणी सांगूची गरज नाय!

लांब असलो घरापासून तरी,
पोरांची ते्का काळजी असता
पोरांका प्रश्न पडलो की,
सोडवूक बापच पुढे असता!

बापह्यो असोच असता,
पोरांचा तो किती करता
येवढा केल्यान् तरी,
सगळ्यांका ता कमी असता,
कारणबापह्यो असोच असता,
करूनसवरून सगळा
तो नामानिराळो असता!

पूनम नवरतन विश्वकर्मा
११ वी कॉमर्स

# आई

आईतू जवळ असूनही,
वाटतं खूप दुरावा आहे
हाच माझ्या भावनांचा,
पहिला पुरावा आहे.

चांदण्या रात्रीतही,
आभाळमनीचं रिकामं आहे
तुझ्याविनामन खरचं
किती किती एकटं आहे!..

आजवर अनेकांनी,
केले जरी पृथःकरण
शब्दांतुनी मांडता येईल का,
आईचे अंत:करण?

आई ही आईच असते,
तिची सर कुणालाच येत नसते
दुरावली जरी कायमची तरी,
मायेच्या उबेने
संस्कारांच्या गंधाने,
घरभरून दरवळत असते
कारण आई ही आईच असते!

पूनम नवरतन विश्वकर्मा
११ वी कॉमर्स

# आम्ही मुली

आम्ही मुली, आम्ही मुली असतो
LOVELY आणिCUTE
चेहऱ्यालाFACE PACK लावला
कि आम्ही असतोMUTE...

फिरायला लागते आम्हाला
BIKE किंवा गाडी
शंभर दुकाने फिरल्यावर
पसंत पडतेएक साडी...

स्वयंपाक करतो झटपट
चविष्ट आणि खास
तयारव्हायला मात्र
लागतात चारतास...

दिवसभर खात असतो
केक आणि कोल्ड्रिंक्स
जेवायला बसलो की
करतो आम्ही DIETING...

बाहेर असतो आम्ही
साध्या आणि बिचाऱ्या
पण घरी काय करतो
ते आमच्या आईला विचारा...

करतो फिगर मेंटेन्ड
BOY FRIEND ला मात्र
आमच्या शॉपिंगच टेन्शन
अशीअसते आमची निराळी अदा
पण खरं सांगा! यावरच तुम्ही होता ना फिदा?

कु. कादंबरी कणेरकर

# जगणं किती सुंदर असतं....

जगणं किती सुंदर असतं
फुलासारखं रंगीत असतं.
पाण्यासारखं नितळ असतं
खरचं जगणं किती सुंदर असतं||धृ||

काहींना जगणं खूप कठीण असतं
कधी कधी जगणं नकोस वाटतं
पण जगायचं शेवटपर्यंत असतं
म्हणूनच जगणं सुंदर असतं||१||

जगताना संकटं येतात, नि जातातही
संकटांवरमात करण्याचं कर्तव्य असतं
त्यातून सहज तरुन जायचं असतं
खरचं जगणं खूप सुंदर असतं||२||

जगताना जग मोठं वाटतं
पण जगात जगणच कुणाला महाग वाटतं
ती माणसचं वेडी असतात असं वाटतं
खरचं जगणं किती सुंदर असतं||३||

जगताना आपल्यासाठी जगायच असतं
हसताना मात्र दुसऱ्यांसाठी हसायच असतं
आपलं हसू दुसऱ्यांसाठी अनमोल असतं
म्हणूनच जगणं सुंदर करायचं असतं||४||

जगताना अपेक्षाभंग कित्येकांचा होतो
अपेक्षाभंगामुळेच जगणं कठीण होतं
कठीण सारं सोपं करण्यातच आयुष्य जातं
म्हणून जगणं सुंदर करायचं असतं||५||

आयुष्य आपल्याला खूप काही शिकवते
कधी रडवते, कधी हसवते
कधी क्षणांत सारं बदलून टाकते
मग जगणंच हवेहवेसे वाटते......
म्हणून जगणं सुंदर करायचे असते||६||

समुद्राच्या एका लाटेने मनातील
किंतु परंतुना जायला वाट मिळते,
आणि पुन्हा मनाची पाटी कोरी असते
फक्त ‘सुंदर जगण्यासाठीच’
खरचं जगणं कितीसुंदर असतं....
खरचं जगणं कितीसुंदर असतं....||७||

**स्वरचित:- सुरभी सदाशिव ओगले**
**T.Y.B.Com.**

# गुलाम

विज्ञान आले, तंत्रज्ञान अवतरले
माणसाची झाली प्रगती,
सारे विश्वचीनजिक आले
सद्विचारांची झाली अधोगती.

तंत्रज्ञानामुळे जीवनात वेग आला
संगणक माणसाला प्रिय झाला
गणित चुटकीसरशी सोडवू लागला
पणमाणूस तो परका झाला.

यंत्रमानव विचारप्रक्रिया करण्याचा
धडा गिरवू लागला
माणूस माणसाला विसरला
अन् संगणकाचा गुलाम झाला.

**प्रणित दळवी**
**T.Y.B.Sc.I.T.**

# आयुष्य

आपलं आयुष्य जणू
प्रेमाची वाहती सरिता...
विधात्याने रचलेली
एक सुंदर कविता...

आपलं आयुष्य जणू
सुखाची लागलेली आस...
विधात्याने दिलेला
क्षणिक सुखाचा भास...

आपलं आयुष्य जणू
पाप-पुण्याचा मेळ...
विधात्याने मांडलेला
कटपुतळीचा खेळ...

आपलं आयुष्य जणू
सुख-दु:खाचं रान...
विधात्याच्या हातात
राहिलेलं कोरं पानं...

आपलं आयुष्य जणू
जन्माचं सुखद अस्तित्व...
विधात्याच्या मुठीतील
मृत्युचं कटू सत्य...

आपलं आयुष्य जणू
न सुटणारं कोडं...
विधात्याच्या मर्जीनं
उलगडतं थोडं थोडं...

**विनया विजय बावकर**

**T.Y.B.Sc.**

# पणविचार का करायचा त्या?

कोणाला तरी होतो आनंद
तर कोणाला तरी दु:ख
पण विचार का करायचा त्या
दुःखाचा_ _ _ _ _ _?

कोणालातरी होतो त्याच्या
या श्रीमंतीचा गर्व
पण विचार का करायचा त्या
गर्वाचा_ _ _ _ _?

कोणाला तरी नाही भेटत
त्यालाहवा तसा मित्र
पण विचार का करायचा त्या
भेटीचा_ _ _ _ _?

कोणाला तरी हवा असतो
एक असा मोठा दिवस
जो त्याचं आयुष्य पूर्ण
बदलूनच टाकेल असं
पण विचार का करायचा त्या
आयुष्याचा_ _ _ _ _?

कोणाला तरी हवा असतो
त्याचा मानाचा हक्क पण
त्याला तो मिळत नाही
पण विचार का करायचा त्या
हक्काचा_ _ _ _ _?

**स्वरचित:- कु. माधुरी संजय बोडेकर,**
**T.Y.B.Com.**

# नाती हरवली कुठं....?

नाती सांगून समजतनसतात
आठवणी ठरवून येत नसतात
हसणं म्हटलं तरीही
कारण लागतं आम्हाला
रडणं म्हटलं तरीही
कारण लागतं आम्हाला
रडणं म्हटलं तरीही
खांदा जवळ नाही आमच्या.......

तंत्रज्ञानाच्या जगातनाती कुठं हरवली
कळलचं नाही आम्हाला
आई-बाबा म्हणता म्हणता
त्यांचेमॉम-डॅडकधी झाले
समजलंच नाही आम्हाला
नात्याच्या बंधनातून कधी
मोकळी झाली ही पाखरे
आईच्या विसाव्यातून कुठे
हरवली ही पाखरे.......

तंत्रज्ञानाच्या बंधनातून
विसरू नका त्या नात्यांना
तंत्रज्ञानाच्या पाठी धावता-धावता
खांदाही नाही मिळणार रडायला......

**प्राची सि.देवगडकर**

**T.Y.B.Com.**

# पहीलं पान

पुस्तकाचं पहीलं पान नेहमीच आपल्याला सांगत असतं,
भारत माझा देश आहे,
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
होतात अनेक दंगली, जाळपोळी,
मारामाऱ्याअन् कत्तली,
राजकारणीमाणसांचेखेळले जातात डाव,
तरीही पहीलं पान सांगत असतं,
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
घडतात मुंबईसारखे बॉम्बस्फोट, दहशतवादी हल्ले,
गुजरातेतील गोध्रा हत्याकांड,
मालेगाव, जळगावसारखं वासनाकांड,
नरेंद्र दाभोळकरांसारखे खून,
निर्भया प्रकरणासारखे अमानुष अत्याचार,
स्त्री-भृण हत्या.....
तरीही पहीलं पान सांगत असतं,
आमच्या संस्कृतीचा आम्हाला अभिमान आहे.
भ्रष्टाचाराची कीड पोखरते सारा समाज,
अन् अडकतात अनेक नेते,
आदर्श सारख्या घोटाळ्यांमध्ये,
तरीही पहीलं पान सांगत असतं,
मी माझ्या देशाशी निष्ठेने राहीन.
सुन्न होऊन जातं भांबावलेलं मन,
अन् मग अचानक आठवतं
पुस्तकाचं पहीलंपान
गुरुजींनी कधी शिकवलेलच नसतं.

नितेश गोविंद कासले

# आई

माझी प्रेमळ छाया तू....
सावलीतला माझा आधार तू....

नात्यातील प्रत्येक बंध तू.....
प्रत्येक बंधातील गंध तू.....

शरीरातील माझ्या हृदय तू....
हृदयातील प्रत्येक स्पंदन तू....

आयुष्यातील माझ्या सुख तू....
सुखातील माझे हास्य तू.....

जीवनातील माझ्या आनंद तू.....
आनंदातील माझ्या सहवास तू....

झोपेतील माझं सत्य तू....
स्वप्नातील माझं सत्य तू....

देवाजवळील शतजन्माचं मागणं तू....
देवानं दिलेलं अनमोल देणं तू....!

**विनया विजय बावकर**
**T.Y.B.Sc.**

# आई-बाबा

पहिले दैवत माझे आई-बाबा
पांग तुमचे नाही फेडू शकणार,
तुमच्या परिश्रमाने झाले सुखी जीवन
कधीच नाही विसरणार तुमचे उपकार.
समुद्राचा केला कागद आणि
लाटांचीकेली शाई,
व्यक्तिमत्व नाही माझे एवढे
लिहू शकेन मी तुमची पुण्याई.
तुम्हीच गाभाऱ्यातील देव
नित्य नियमाने करू पूजा,
संस्काराचा ठसा मनावर कोरला
पूर्व जन्माचे फळ हे माझ्या
किती केलात जिवाची वणवण
भर उन्हात पायाला सोसले चटके,
नशिबाला पडलेले भोक
उबदार मायेने शिवले मनाचे ठोके.
काळजात सहन करता यातना
कागदाप्रमाणे आयुष्यच फाटले,
नियतीच्या संकटावर केली मात
उभा देह तुमच्या स्पर्शाने शहारले.
अनमोल जन्म दिला तुम्ही
परिश्रमाची झाली जाणीव,
अथांग मायेचा सागर तुमचा
कसलीच मनात राहिली नाही उणीव.

**अक्षता आनंद देवधर**

**T.Y.B.B.I.**

# आला श्रावण श्रावण

**कोमल रा.शेळके**

**S.Y.B.Sc.**

'वाट पहावी तर तुझीच श्रावणा,
चाहुल लागावी तर तुझीच श्रावणा,
क्षण जगावे तर तुझेच श्रावणा'

मानवाच्या आयुष्यात जसा एखादा अविस्मरणीय क्षण असतो. तसा हा श्रावण आहे. त्याचातो असा काळ ....! पण मनाला उभारी देऊन जातो. श्रावण हा शब्दच ऐकताना मनाला निर्मळ वाटते. या श्रावणातला सोमवार तर लोकांनाखूप प्रिय असतो. इतर दिवशी दिनक्रमानुसार घरच्या देव्हाऱ्यात जाऊन हात जोडले जातात, पण या दिवसांत तर खूपच श्रद्धा वाढलेली असते.प्रत्येकजण या हिरव्या गार निसर्गाच्या साथीने मनाला खूप सुख मानून घेत असतात त्या श्रावणाच्या वातावरणात रोज उत्साहाने माणूस जगत असतो. सार्वजनिकठिकाणी किंवा देवळांमध्ये भजन कीर्तन होत असते. टाळ, मृदुंगाचेसूर कानांना ऐकू येत असतात. शेतीच्या धांदलीत या दोन महिन्यात शेतकरी जिवाला सुख मिळवून घेतो. झाडं-झुडपं पण नेटाने वाढत असतात. वाऱ्याची एक झुळुक सुद्धा त्यांच्यासाठी मोठ सुख असतं पक्षी आनंदाने उडून आभाळाला शोभा देत असतात. परिसरात नजर टाकताच हिरव्या गार रानावर रंगीत पाना-फुलांवरफुलपाखरांचीगर्दीदिसते. त्यांना या फुलावरून त्या फुलावरबागडतानापाहीलं की मन चंचल होऊन जाते. क्षणातचअसे वाटते की, आपणही त्यांच्यातले व्हावे. मानवाप्रमाणे हा पूर्ण निसर्गही श्रावण महिना जगत असतो.

याश्रावणाच्या काळात लेकी-सुनांचे मन त्यांना आपल्या माहेरी ओढत असते. एकामागोमाग एक सण येतच असतात. नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी(श्रावणी) पौर्णिमा या सर्व सणांमध्ये श्रावण कधी संपतो हे समजतच नाही. या आनंदात कधी-कधी असे वाटते की हे सण आणि हा श्रावण कधीच न संपता असेच चालू रहावेत. लग्नाची वरात जशी जात असते, तशी लहान मुलं नागपंचमी दिवशी नागोबाला आणायला आणि सोडायला घाट वाजवत असतात. भावा-बहिणीच्या पवित्र नात्यालाटिकवून ठेवणारे रक्षाबंधन प्रत्येक घरा-घरात सुख, आनंद आणते. किती मोठ भांडण असले तरी याच दिवशी मिटते. साखरजशी पाण्यात विरघळून पाणी गोड व्हावे, तसे ते भांडण मिटून प्रेमात रुपांतर होते.

तरुणवर्ग तर उत्सुक झालेला असतो. थरावरथर लावून, दहीहंडी फोडून त्या दिवसाची मजा लुटत असतात. जसे प्रत्येक फळं, फूल आपल्या कालावधीतच उमलते, तसे तेरडा, बटमोगरा, हरणी, सोनचाफा, आनंदी, रानभेंडी ही फुले श्रावणातच जोमाने येतात. आणि परिसर रंगीनमय करतात. श्रावण जेव्हा संपत असतो. तेव्हा तो गणेश चतुर्थीचे आगमन करत असतो. या सणांचा क्रम तर सुरेख आहे, कारण श्रावणात महादेवाच्या नावाने लोक मनापासून उपवास आणि भक्ती करत असतात. अगदी नित्याने श्रावण सोमवार पाळत असतात. महादेव तर, गणेशाचे पिताश्री आहेत. आधी त्यांचे आगमन होते आणि मग चतुर्थीला पुत्राचे म्हणजेच गणपतीचे आगमन होते. यामुळेप्रत्येक घरातल्या माणसाच्या डोळ्यात जगण्याचा आनंद दिसत असतो.

# फुलपाखराची व्यथा

आई परि ती माया देते
तशी ती माझी वस्ती
त्या वस्तीचे आम्हीच राजे
आम्हां ना कुणाची भीती
सहयाद्रीच्या कुशीत राहता
जातो निघूनी आम्ही दूर
नसतो आमचा कुठेच ठिकाणा
हे विश्वची आमुचे घर
पाठीवर आमच्या रंग हजारो
दुनियेत आमची शान
जीवही आमचा हा इवलासा
थोडकेचजीवन.....
सुमनांचीती लहाळ पिऊनी
स्व-जीवन आम्ही तारतो.
काट्या-खुट्याच्या मार्गातुनी
जीवन मार्ग शोधतो.
आमचे जगणे तुमच्या ध्यानी
सदा राहो मानवा
अशा नीतीने जगून पाहा
मिळेल मार्ग जो हवा
मिळेल मार्ग जो हवा.

**वैष्णवी बबन कदम**
**T.Y.B.Com.**

# मित्रा...! तुला वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा...!

वेड्या मित्राची प्रिती मला कळली,
तुझ्यासारख्या दोस्ताची यारी कायम टिकून राहिली.
तुझ्यासारख्या मित्राची साथ मी कधीच नाही सोडणार
या यारीचा कधीच विसर नाही पडणार.

शेवटपर्यंत मैत्री यारा तूच आहेस टिकवणार,
तुझ्या मैत्रीचा रंग कधीच फिका नाही पडणार.
आज आहे तुझा वाढदिवस करणार आहेस साजरा,
कायम असाच आनंदी रहा चेहरा ठेव हसरा....!

सर्व सुखे तुला मिळावीत,
हीच ईश्वर चरणी प्रार्थना,
तुझ्यासारखामित्र मिळाला,
हाच जीवनाचा अर्थ ना....!

जीवनामध्ये गाठणार आहेस तू खूप मोठे शिखर,
आयुष्यात एकच नाते जप ठेव मोठ्यांचा आदर,
जे इतरांना फसवतील त्यांची कधीच करू नको कदर,
जिने तुला जन्म दिला तिचा कधी पडू देऊ नको विसर...!

तुझ्याकडून शिकले मी मैत्रीची भाषा,
आपली मैत्री कायम निभावशील,
हीच या वेड्या मैत्रीची अपेक्षा..!
मैत्री केली आहे मी तुझ्यावर,

किती वेळा सांगू
कायम माझी साथ दे,
आणखी काय मागू
शब्दांची जुळवणी करून

कविता रचली आहे मी तुझ्यावर,
चुकलं असेल काही तर
राग नको माझ्यावर
सर्वांना समजून घेशील.

आहे ही एकच इच्छा
तुला तुझ्या वाढदिवसाच्या
लाख लाख शुभेच्छा....!

गायत्री दिपक शिर्के
११ वी कॉमर्स

# ....आठवण....

आठवतो तुझा सहवास
जेव्हा आठवण तुझी येते,
त्या आठवणींत माझे मन
स्वतःलाच विसरून जाते...!

आठवण तुझी येताच कधी
गालावर हास्य उमटते
तर कधी हसता हसता
डोळ्यांत पाणी साठते...!

डोळे बंद करता तुझाच
चेहरा नजरेसमोर आणते,
उघड्या डोळ्यांनाही माझ्या
वेगळेच जग दाखवून जाते...!

गर्दीततुझी आठवण
एकांताचा स्पर्श देते,
अन्  एकांतात असताना मी
माझ्या सोबतीला राहते...!

तुझी आठवण सखे
मला नेहमीच साथ देते,
त्रास झाला मनाला तरी
फक्त तीच जवळची वाटते...!

**उत्कर्ष उत्तम दळवी**

**T.Y.B.Sc.**

# शब्द मात्र दूर राहिले

खूप दिवसांनतर पुन्हा लिहायला बसलेले,
कागद, पेन सर्व साहित्य घेतलेले,
अगदी मन ही भावनांनी गच्च भरलेले,
पण शब्द मात्र आज दूरच राहिलेले.

खूप काही होते आज लिहायचे,
ओठांवरचे होते कागदावर उतरवायचे,
डोळ्यांतले भाव होते शब्दात गुंतवायचे,
पण शब्द मात्र आज दूरच राहिलेले.

नेहमी शब्दरुपात भावना निर्मिते,
असेच काही आजही मांडायचे होते,
अनोखे असे काहीच नव्हते,
पण शब्द मात्र आज दूरच राहिलेले.

खूप दिवसांनतर पुन्हा लिहायला बसलेले,
लेखणीने मला, मी कागदाला पाहिलेले,
भावनांचे झरे डोळ्यांत साचलेले,
पण शब्द मात्र आज दूरच राहिलेले.

**पुजा शामसुंदर नारिंग्रेकर**
**S.Y.B.A.**

# आई

जीवनात वाट तू दाखवलीस,
आयुष्याची व्याख्या तू समजावलीस.
अनेक संकटांना सामोरी गेलीस,
अनेकदुखांवर मात केलीस.

तुझ्याचमुळे प्रखर तेज मिळते,
तुझ्याचमुळे हीनविदिशा सापडते.
कधी तू माझी सखी होतेस,
अन् तू मन माझे जाणतेस.

काही न सांगता तुला समजते,
नाही काहीही लपून तुझ्याविना राहते.
नाही मागता काही क्षणोक्षणी तू दिलेस,
अनेक मार्गही तूच दाखवतेस.

खरचं प्रश्नाशिवाय नाही उत्तराला अर्थ,
आई तुझ्याविना माझे जीवन आहे व्यर्थ.

**पुजाशामसुंदर नारिंग्रेकर**
**SY.B.A.**

# जुन्याआठवणी

पाऊल कधी का हे मागे पडते,
आठवणीतून का रमुनी जाते.
जीव होतो हा कासावीस;
त्या जुन्या आठवणीं संगे.
मग आठवण होते त्या आठवणींची,

भविष्याची राहते मग कोरी पाटी.
दोष कुणाचा असतो मग,
ना राहतो विश्वास, ना कधी कुणावर,
कधी वाटते, भूतकाळातले ते माझे जग भले,
कधी वाटते, त्याहून ते नरकच भले.
भावनांची होते मग ओढाताण
गहिवरून येते माझे मन,
द्वेष दाटून येतो त्यातून,

मग वाटते जीव घ्यावा त्या आठवणींचा,
त्या खोलातल्या मनातून.

**सृष्टी सुधाकर राणे.**
**S.Y.B.Sc.**

# तो आणि ती

त्याला ती फार आवडायची. तिचा तो निरागस चेहरा, सुंदर काळेभोर केस, कमनीय बांधा आणि गालावरचा तो एक तीळ.अगदी कोणीही तिच्यावर आकर्षिला जाईल अशी दिसायची.

तो तिच्या स्वभावावर इतका भाळला होता की, जणु त्याला वाटायचं तिला देवाने त्यांच्यासाठीच पृथ्वीवर पाठवले आहे तिचं ते मनमोकळेपणाने वागणं, बोलणं नेहमी आनंदी आणि प्रसन्न राहणं. हसताना तर एवढी सुंदर दिसायची की एखाद्या अप्सरेला सुद्धा लाजवेल, म्हणूनच त्याला ती फार आवडायची.

ती सोबत असली की, आयुष्यात जणू मोत्यांचाच पाऊस पडायचा. तिच्या सोबतचा प्रत्येक क्षण हा त्या मोत्यांप्रमाणे अमूल्य असल्यासारखा वाटायचा. त्यातील प्रत्येक मोती तो आपल्या मनात साठवून ठेवायचा. अगदी आयुष्यभरासाठी! एखाद्या वेळेस तिची आतूर मनाने वाट पाहण्याची सुद्धा त्याला वेगळीच ओढ असायची. तो वाट पाहत असताना तिने धावत येवून आपल्याला मिठीत घ्यावं. आणिप्रेमाच्या या अथांग सागरात तिच्या सोबतस्वतःला झोकून द्यावं. एका विलक्षण अनुभवासह या सर्व जगापासून दूर फक्त ती आणि तो. बाकी कोणीच नाही. सारं काही स्वप्न नगरीतल्या आयुष्यासारखं.

त्याला तिच्यासोबत फिरायला फार आवडायचं. तिच्यासोबत समुद्रकिनारी जायची त्याला भलतीचं ओढ असायची. अनवाणी पायाने चालताना तो वाळूचा झालेला स्पर्श म्हणजे एखादं मोरपीस अंगावरून फिरावं इतका सुखद भास. तिचा हात हातात पकडून तिनं खांद्यावर डोकं ठेवून दिलेली ती प्रेमाची ऊब...!

मनाच्या खूप खोलवर साठवत वाळूवर तासनतास एकमेकांच्या सहवासात निवांत बसून मावळत्या सूर्याकडे पाहण्यासारखं दुसरं सुखचं नाही, या जगात असं वाटायचं.

पण आता मावळणारा सूर्य पाहताना त्याच्या मनात असंख्य आठवणींच काहूर उठवून जातात भूतकाळाच्या त्या सुखद आणि दुःखद आठवणी मनात गोंधळ करून जातात. काहीतरी आहे जे रोज थोडं-थोडं आपल्यापासून दूर जातंय. काही तरी आहे जे आपण नाही थांबवू शकत याची जाणीव तो सूर्य करून देतो.

सूर्यमावळला की अंधारमय झालेल्या त्या किनाऱ्यावरील फेसाळणाऱ्या लाटा तिची आठवण करून देत असतात. ती त्याच्यापासून दूर गेल्याचा विचारचं दुःखी करून जातो. तरीही तो जड मनाने तिला विसरण्याचा प्रयत्न करतो आणि पुढच्या प्रवासाला लागतो. तिच्याशिवाय पुन्हा त्याच आठवणी नव्याने पाहण्यासाठी....नव्यानेअनुभवण्यासाठी....!

**चेतन प्रकाश तिर्लोटकर.**

**T.Y.B.Com.**

# Rural Development in India

**Sayujya Mangesh Hindlekar**
**11 Arts**

The concept of rural development is quite comprehensive and extensive. G.Shah defines rural development as the development of rural areas, often rural development has ment the extension of irrigation facilities. Expansion of electricity, improvement in the techniques of cultivation, construction of school building and provision of educational facilities, health care etc.

This is considered to be a lop-sided view of understanding rural development. Of late rural development signifies a complex and long term process involving fundamental transformation of rural society both at social and economic levels. It represents planned programmes to improve the quallty of the life-style of the rurallties.

Components of Rural Development:-

Rural development entails some components. They are as follows.

1. Rural development seeks to transform all the sectors of rural economy. The primary sector, the secondary sector and the tertiary sector.

2. It brings about significant improvement in the socioeconomic conditions of the scheduled castes, scheduled tribes, the landless agricultural labourers and the marginal and small fucmers.

Essential Aspects of Rural Development:-

The essential aspects of rual development are as follows:-

1. Agricultural development constitutes the crucial aspect of rural development. It is possible through the use of better seeds, adequate fertilisers, manures and pesticides, adequate supply of water and effective implementation of land reform measures.

2. By effective changes in the social- economic institutions. Rural development seeks to change the socio- economic structure of the rural community.

3. The effectiveness of the rural development programmes necessitates political non-interference. The persons associated with these programmes should begiven adequate freedom to carry out their plans and programmes with undivided attention.

4. The success of the rural development programmes depends on the co-operative orientation and attitude among the ruralities. The functioning of the co-operative societies goes a long way in improving the conditions of the vulnerable sections of the rural set-up.

5. Rural development programmes demand the active participation of the ruralites. While formulating these programmes the opinions. Attitudes drives and interests of rural people

should be taken into account. Further, dedicated and committed village leaders should come forward to guide the masses for bringing about rural development.

Integrated Rural Development:-

It is claimed that the concept of Integrated Rural Development was originally propounded by the world Bank. In India the concept was put forward in the year 1976 at the All India science congress C.Subramanyam, the then finance Minister of India. He viewed integrated rural development as systematic, scientific & integrated use of all our natural resources and as a part of this process eriabling every person to engage himself in a productive and socially useful occupation and earn an income that would meet at least the basic needs. He holds the view that the use of natural resources is possible only through the application of science and technology, results in the fulfilment of basic social needs. G.Parthasarathy refers to four ‘routes’ in the context of integrated rural development:-

I] the institutional route of Gunnar Mxrdal

II] the New Economics route

III] the neo Marxian route and

IV] The Gandhian route V.K.R.V Rao defines integrated rural development as the optimum utilization of the natural and human resources of given rural area for the enrichment of the quality of life of the population..

The concept of integrated rural development addresses itself to various rural problems like widespread poverty, unemployment, illiteracy, exploitation, inequitable, exploitation, inequitable distribution of land poor health conditions etc. It signifies that various facets of rural development are integrally connected.

It is a holistic concept rather than a sequential one K. Om Prakash and G.satyanarayan rightly observe that integrated rural development embraces all the activities of enrichment and betterment of the overall quallty of rural life through appropricate development of man power, resources, infrastructural facilities and provisions of minimum needs and livehood. It has far-reahing for the life of the ruralites.

# टेबलटेनिसचे जमदग्नी सर !

कु. अखिलेश महेश मोंडकर
११ कॉमर्स

२०१४ मे महिन्याची सकाळ, ओरसमधील टेबलटेनिसच्या हॉलमध्ये साऱ्यांच्याच नजरा आम्हां दोघांवर स्थिर झाल्या होत्या. मी व माझा कुडाळमधील प्रतिस्पर्धी. आमचे गुण सारखे म्हणजे ९ होते.रंगात आलेल्या या अटीतटीच्या सामन्याचा निकाल पाहण्यासाठी साऱ्यांचेच श्वास रोखले गेले होते. तो क्षण माझ्यासाठी फारच मोलाचा होता. मी क्षणभर डोळे मिटले. सरांचा मास्टर स्ट्रोक आठवला व विशेष (चॉप) टेक्निक अवलंबली आणि मॅच सुरु झाली.... आणि निकाल समोर होता मी विजयी झालो. माझ्या त्या “चॉप टेक्निक” साठी म्हणजेच त्या विशेष कौशल्यासाठी मला विशेष असे पारितोषिकही मिळाले, पण त्याचे खरे श्रेय माझ्या गुरुजींचे होते.

माझ्या सरांची ओळख ही अनमोल आहे. माझ्या सरांचे संपूर्ण नाव श्री. मोहन च. जमदग्नी असे होते. माझे सर खरेतर चिपळूणचे. पण त्यांनी २००९ पासून देवगड येथील स्नेहसंवर्धक हॉलमध्ये टेबलटेनिस ॲकॅडमी चालू केली. आणि तेथीलच जवळ असलेल्या रुममध्ये आपली रहायची व्यवस्था केली. तशी त्यांची जन्मतारीख मला माहीत नाही, पण त्यांच्या व्यक्तिमत्वावरून त्यांचे वय हे ७० ते ७५ वर्ष असावे असे वाटते. सरांचे शिक्षण हे सिव्हिल इंजिनिअरींग व उत्कृष्ट टेबल टेनिस पटू होते.ते चिपळूण येथीलच प्रायव्हेट कन्स्ट्रक्शन कंपनीत गेली ३५ वर्ष काम करत होते आणि तेथून ते निवृत्त झाले होते

सर नेहमी सर्व मुलांना आज शिकविलेला नवीन खेळातील प्रकार चार दिवस सराव करून घेत आणि पाचव्या दिवशी त्याची मॅच एका मोठ्या मुलांबरोबर लावली जात असे. त्यामुळे दोघांचीही प्रॅक्टीस होत असे. अशा या सरावामुळे टुर्नामेंटला न घाबरता मुले खेळत असतं. समजा जर कोणताही मुलगा खेळताना “चॉप शॉट” मारायला चुकलातर सर नेहमी हाताच्या मनगटांवर मारायचे. त्यामुळे सरांच्या या धाकाला सर्व मुले घाबरत असतं.

सरांचा मारणे व ओरडणे हा प्रमुख गुणधर्म होता सर दर शनिवारी एक ते दोन तास व्यसनमुक्तीचे धडे व नवनवीन टेबलटेनिसपटूंची माहिती देत असतं. सर नेहमी मुलांना ‘एकातरी टेबल टेनिसपटूंना तुम्ही तुमचे लक्ष बनवाव तुम्हांला या खेळाचे महत्त्व कळेल.’ असे सांगत असतं. हे सरांचे वाक्य माझ्या कानात आजही रुंजी घालत आहे. मागील ५ ते ६ वर्षामध्ये मला अनेक अनुभव आले, जसे की, या खेळातर्फे मी टुर्नामेंटसाठी ओरस, कणकवली, कुडाळ या ठिकाणी जात असे तेव्हा एक तरी मेडल मी जिंकून आणत असे. त्यामुळे प्रत्येकवेळी टुर्नामेंटची बातमी व माझे फोटो वर्तमानपत्रात येत असे. त्यामुळे लोक मला सारखे प्रश्नच-प्रश्न विचारत असतं; असं की, हा खेळ तू कोठे शिकलास ? हाखेळ तर आम्हाला माहितीपण नाही ?

त्यावेळी मला अभिमान वाटत आसे. प्रामुख्यानेटेबल टेनिस हा खेळ चीन या देशाचा राष्ट्रीय खेळ आहे. आणि हा खेळ मी शिकलो आहे हे माझ्यासाठी व समाजातील लोकांसाठी अभिमानाचीगोष्ट आहे.

जेव्हासरांनी पहिल्यांदा हा खेळ शिकण्यासाठी कोण उत्सुक आहे का? असे विचारले त्यावेळचा मी आताचा मी यामध्ये खूपच फरक आहे. पण त्यावेळचे माझे टेबलटेनिस शिकण्याचे ध्येयमला आलेल्या जमदग्नी सरांच्या रूपाने पूर्ण करता आले. सरांच्या कडक शिस्तीमुळे मी माझ्या खेळावर व हातावर ‘कमांड’ करू शकलो. मी इयत्ता ७ वीत असताना शेवटची टुर्नामेंटही जामसंडे येथे खेळलो होतो. त्यानंतर सरांचे शरीर साथ देत नव्हते. म्हणून सरांनी २०१५ या वर्षात टेबल टेनिस ॲकॅडमी बंद केली. पण त्या ठिकाणी घडलेल्या सर्व आठवणी मी माझ्या मनात जतन करून ठेवल्या आहेत.

त्यावेळी सर देवगड सोडून चिपळूणला गेले. जाताना त्यांनी बहुमुल्य संदेश दिला तो असा होता की, “तुम्ही खेळत असताना तुमच्या खेळात हातावर व डोळ्यांवर कमांड ठेवली पाहिजे. तेव्हाच तुमचा खेळ उत्तम होईल.” हा उत्तम व बहुमुल्य संदेश देवून सर प्रवासाला निघून गेले तरी माझ्या मनात अजूनही हा बहुमुल्य संदेश घट्ट रुतून बसलाआहे.

# सोशल मिडिया

**कु. दिक्षिता संजय चांदोस्कर**
**12M.C.V.C. (MLT)**

आम्ही वर्षानुवर्ष एकमेकांना पत्र लिहून संपर्कात राहणारी माणसं होतो. कधी टेलिग्राम आला, तार आली असं कुणी म्हणालं तरी छातीत धस्स् व्हायचं. काहीतरी वाईट बातमी असणार अशी शंकेची पाल मनात चुकचुकायची आज मोबाईलवर क्षणाक्षणाला मेसेज येतात. काही अर्जंट नसतं, काही कौतुक वाटत नाही.काळ एवढा बदललाय. एकेकाळी घरी आलेलं एखाद पत्र अधाश्यासारखे फोडून वाचणारे आम्ही. आज मेसेजसुद्धा लगेच उघडून वाचावा वाटत नाही. काय कारण असेल? खूप बोलतोय का आपण एकमेकांशी?खूप जास्त संपर्कात आहोत का आपण एकमेकांच्या?

असं काही नाही. ऑर्कुट, मार्क झुकेरबर्ग तरुण होते. आहेत ते मित्र एकत्र यावेत. जगभर नवे मित्र बनावेत. याउद्देशाने त्यांनी सोशल मिडियावर क्रांती केली. पण आपण त्यांचं काय केलं? आपण मित्र जोडतोय का? आपण एकमेकांशी कुठे बोलतोय? आपण एकमेकांवर बोलतोय. बोलतोय म्हणजे फक्त गरळ ओकतोय. टिका करतोय, द्वेष करतोय. खरं तर सोशल मिडिया जगातल्या उत्तम गोष्टी समजावून घेण्याचं माध्यम आहे, पण आपण आमचंच सगळं उत्तम आहे आणि तुम्ही ते शिका असा अट्टाहास करत असतो.
सोशल मिडिया हे लोकांकडे असलेलंज्ञान शेअर करण्याची जागा आहे. या जागेवर जो तो लोकांना ज्ञान वाटायला बसलेला आहे. पण आपल्या देशात आपण माणसं दुखावण्यासाठी याचा जास्त वापर करतो. काही देशात सोशल मिडियाने हुकुमशाही उधळून लावण्यात मोठा हातभार लावला आपण मात्र सोशल मिडियाच्या माध्यमातून स्वतःच हुकूम गाजवायला लागलोय कुणी काय खावं, कुणी काय करावं, हे सांगायला लागलोय. आपण जीएसटीवरदेखील बोलतोय.काश्मीरवरही सल्ले देतो, डोकलामवरबोललो. पण आपण आपल्या घरातल्यांशी मात्र काहीच बोलत नाही. फेसबुकवर सकाळ-संध्याकाळ जगाला शहाणपणा शिकवणाऱ्या, पोस्ट टाकणाऱ्या माणसाची बायको शेजारच्या दारात कचरा टाकते. आपल्याला प्रश्न पडतो. हा विद्वान आधी आपल्या बायकोला का शिकवत नाही? रोज लोकांना सुविचार पाठवणारी माणसं विकृतवाटायला लागलीत. या लोकांमुळे आता सुविचारसुद्धा 'सु' विचार वाटत नाही. शीविचार वाटतो. सकाळी०७.००वाजताउठून आपण फ्रेश मूडमध्ये व्यायाम करायचा विचार करत असतो, त्याचवेळी एक दिडशहाणा आपल्याला 'जिममध्ये पैसे देऊन ओझं उचलण्यापेक्षा जमेल तेवढं देशाचं ओझं उचला' असा सुविचार पाठवतो. व्यायामाचा सगळा मूडच जातो आपला.

मुळात देश ओझं असतो का? एखादा सण असेल तर शुभेच्छांचा मारा एवढा होतो की, 'सण नको पण शुभेच्छा आवर' अशी वेळ येते.

एखादामोठा माणूस आजारी असेल तर एक वेगळीच भीती निर्माण झालीय या देशात. तो माणूस जिवंत असतानाच तो गेल्याची बातमी देण्याची लोकांना घाई होते. मागे कुणाच्या अपघाताची अफवा पसरवायची विकृती सुरु झाली होती. अशा अफवा पसरवणारी माणसं अपघातानं जन्माला आलेली असतात. बहुतेक रात्री बेरात्री बायकांच्या वेण्या कापणारे लोक हेच असतील. एखादी घटना घडली की ती नीट समजून न घेता त्यावर आपलं मत मांडून मोकळं होण्याची तर फॅशनच आलीय. निवडणूकीत मतदानाचा हक्क करोडो रुपयांच्या जाहिराती करून सांगावा लागतो,

पणसोशलमिडियावरमतमांडायचाहक्कमात्रलावूनजातात/बजावतात. लोक घरात आज कुठंची भाजी करायची या गोष्टीतपण ज्याचं मत कुणी विचारत नाहीत ते भारत-चीन प्रश्नात काय करायला पाहिजे हे सांगतात तेव्हा हसू येतं. बापाच्या बनियनला पडलेली शंभर छिद्र दिसत नाहीत पोराला, पण अभिनेत्रीनं कुठले कपडे घालावेत हे सोशल मिडियावरसांगत बसतो. जगभरचीमाणसं एकत्र येतील असं वाटलं होतं, पण जातीपातीची माणसं येताहेत. सगळंच वाईट घडतय असं नाही. चांगल्या गोष्टीपण होतात. मात्र त्यांचं प्रमाण कमी आहे. सोशल मिडिया प्रेम वाढवेल असं वाटलं होतं, पण द्वेषच जास्त वाढतोय.

सोशल मिडिया तुझ्यामुळे जग जवळ येईल असं वाटलं होतं. मात्र गावसुद्धा दूर होत चाललंय माणसांमध्ये गट पडत चाललेत. तुझ्या माध्यमातून फुकट शहाणपणा शिकवणारे खूप भेटतात, पण माणूसकी टिकणारे शोधतोय आम्ही!

# अंजिठालेण्यांच्या गवाक्षातून

कु. चेतन पोपट राऊत
११ कॉमर्स A

आजवर मी अनेकदा सहलीचा आनंद लुटला आहे. दरवर्षी आमची कौटुंबिक सहल असतेच; शिवाय इयत्ता पाचवीत असल्यापासून मी दरवर्षी शाळेतल्या सहलीला गेलो आहे. मात्र इतक्या सहलींपैकी इयत्ता पाचवीमधील सहल सर्वात अविस्मरणीय आहे. पाचवीतील सहल आयुष्यात विसरणार नाही. आमच्या निसर्गप्रेमी अशा मा.श्री. गांगुर्डे सरांनी ही सहल आयोजित केली होती. ही सहल सरांनी अजिंठा, औरंगाबादयेथे काढली. अजिंठा या शहराचे वैशिष्ट्य म्हणजे अजिंठाच्या १००कि.मी.वर पसरलेली लेणी अशी माहिती आम्हाला आमच्या शिक्षकांनी सांगितली होती. ती लेणी आम्हाला प्रत्यक्षात बघायला मिळणार हे ऐकल्यावरखूप आनंद झाला.

जेव्हा आम्ही अजिंठा परिसरात पोहोचलो तेव्हा त्यांच्या प्रथम दर्शनानेच आम्ही स्तब्ध झालो. आम्हाला अजिंठा लेण्यांची माहिती देण्यात आली. ती माहिती अशी की, अजिंठा लेणी ही औरंगाबाद जिल्ह्यात इ.स. पूर्व २रे शतक ते इ. स. ४ थ्या शतकाच्या प्रदीर्घ काळात या लेण्यांची उभारणी झाली.

अजिंठ्यातील चित्रे ही प्रामुख्यानेबुद्धांच्या जीवनावर आधारित कथांचे चित्रण करतात. भारताच्या महाराष्ट्र राज्यातील प्राचीन अजिंठा-वेरूळची लेणी ही वाकाटक, चालुक्य आणि राष्ट्रकुट काळात निर्माण झाली. ही लेणी त्यांच्यातील स्थापत्यकला, शिल्पकला व चित्रकलेसाठी जगप्रसिद्ध आहेत.

आम्ही जेव्हा लेणी बघायला सुरुवात केली. तेव्हा अजिंठा लेण्यांत आम्ही गौतम बुद्धांच्या विविध भावमुद्रा तसेच बौद्ध तत्वज्ञानाला चित्रशिल्प रुपात व्यक्त करणाऱ्या शिल्पकलेच्या अद्‌वितीय आविष्कारपाहायला मिळाला. अशी ही अजिंठा लेणी देशांतील पर्यटकांसोबतच प्रामुख्याने विदेशी पर्यटकांच्या सर्वाधिक पसंतीचे पर्यटन स्थळ आहे.

लेण्यांच्या परिसरात फिरताना ते कोरीवकाम, ती चित्रकला पाहून आम्हाला खूपच कौतुक वाटले इतक्या त्या कलावंतांनी केलेले आविष्कार अवर्णनीय आहेत. चित्रांचे नैसर्गिक रंग तर आजही टिकून आहेत. आपण पेन हरवू नये म्हणून त्यावरसुद्धा आपले नाव लिहून ठेवतो पण या कलावंतांचे श्रेष्ठत्व म्हणजे इतका मोठा कलेचा ठेवा निर्माण करणाऱ्या एकाही कलावंताचे नाव कोठेही कोरलेले किंवा लिहिलेले नाही. त्या अनाम कलावंताना माझा सलाम!

आमच्या अकरावी मराठीच्या पुस्तकातील ‘अजिंठा’ पाठ वाचताना माझ्या या सहलीच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला, मी तेव्हा फक्त पाचवीत होतो परंतु आजही अजिंठा सहलीच्या आठवणी नेहमीच ताज्या व  कायम राहतील.

# नागपूर भ्रमंती....

धनश्री अशोक जाधव
12 Science B

‘बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्रदेश हा’

विविधतेने नटलेल्या भारतातील आपले महाराष्ट्र राज्य किती सुंदर आहे! मला तर वाटतं भारतातील सर्वात सुंदर राज्य आहे! सह्याद्रीच्या उंचच उंच पर्वत रांगा, समुद्र किनारा, वनराई, प्राणी-पक्षी संपदा, नद्यांची विपुलता सारे आहे आपल्याकडे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यातीलच एक म्हणजे नागपूर!

महाराष्ट्र राज्याची उपराजधानी नागपूर हे शहर अनेक गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. अशाऐतिहासिक शहराची भ्रमंती करण्यासाठी नाताळच्या सुट्टीमध्ये आम्ही कुटुंबीय गेलो होतो. नागपूर शहर आजपर्यत ऐकून होतो. पण प्रत्यक्षात जायला मिळतंय याचा आनंद गगनात मावेना.

महाराष्ट्र राज्याचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपूर या उपराजधानी शहरामध्ये भरविले जाते. अशा या शहरामध्ये प्रत्यक्ष प्रवास कोल्हापूर ते नागपूर रेल्वेने केला. दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता नागपूर रेल्वेस्टेशनला पोहोचलो. त्याठिकाणी आमच्या नातेवाईकांनी आमचे स्वागत केले. नागपूरदर्शनाची सुरुवातच विधानभवन दर्शनाने झाली. नुकतच हिवाळी अधिवेशन संपलं होतं. विधानसभा व विधानपरिषद ही दोन्ही सभागृहे व त्या सभागृहांचे कामकाज कसे चालतेहे समजून घेतले, विधानभवन आजपर्यंत टि.व्ही.वर पाहिले होते ते प्रत्यक्षातपाहिल्याचा आनंद द्विगुणीत झाला.

नागपूरला जाण्याचा मुख्य उद्देश म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली लाखो अनुयायांसमवेत बौध्द धम्माचा स्वीकार केला. त्या पवित्र ऐतिहासिक दिक्षाभूमीला सायंकाळी गेलो. त्याऐतिहासिक पवित्र स्तुपामध्ये प्रवेश करताक्षणी खूपच छान; प्रसन्न वाटलं. आम्हीसर्वजण ५ मिनिटे ध्यानस्त बसलो. तथागत भगवान गौतम बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केलं. या ऐतिहासिक परिसराची वैशिष्ट्ये माहीत करून घेतली. त्याठिकाणीफोटो काढले. काही साहित्य, पुस्तके, फोटोफ्रेम्स खरेदी केले. हिवाळा असल्याने खूपच थंडी होती.

तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध नागलोक येथे तथागत गौतमबुद्धांचा ५६ फुटांचा भव्य पूर्णाकृती पुतळा पाहिला. त्या ठिकाणची वैशिष्ट्ये जाणून घेतली. तद्नंतर प्रसिध्द कामटी येथील ड्रॅगन पॅलेस येथे जावून त्याची महती जाणून घेतली. तेथील परिसर अत्यंत सुंदर व नयनरम्य होता. चिंचोली येथील शांतीवन वस्तुसंग्रहालयाला भेट दिली. या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध प्रकारचे साहित्य, कपडे,

टाईपरायटर पाहून खूपच छान वाटले हे साहित्य पाहिल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष पाहिल्याची अनुभुती आली. या ऐतिहासिक वास्तूला पाहून मन एकदम भरून आले.

भारताचे केंद्रबिंदू झिरोडिग्रीपॉईंट पाहून खूपच आनंद झाला. या ठिकाणावरून दिल्ली, चेन्नई, कोलकाता, मुंबई हे मार्ग जाण्याचे ठिकाण पाहिले. २३ नोव्हेंबर १९९४ या दिवशी विविध मागण्यांसाठी विधानभवनावर गोवारी आदिवासी समाजाचा भव्य मोर्चा गेला. त्या मोर्चेकऱ्यांवर बेछूट गोळीबार करण्यात आला होता. यात ५०० च्या वर आदिवासी लोक जखमी झाले तर ११४ मृत्यूमुखी पडले होते. या आदिवासी समाजाच्या हत्याकांडाची आठवण म्हणून एक स्तंभ उभारण्यात आला आहे. त्या स्तंभाला भेट देऊन त्यांना अभिवादन केलं.

नागपूर शहर ज्या फळासाठी प्रसिद्ध आहे. ते फळ म्हणजे संत्री. या फळाची चव घेण्यासाठी आम्ही संत्रामार्केटला भेट दिली. तिथे आम्ही संत्री, संत्रा बर्फी, संत्रा केक, चॉकलेट्स, पेढा असे नानाविध प्रकारचे खाद्यपदार्थ विकतघेतले.

खरचं या नागपूर शहराच्या आठवणी आजही स्मरणात आहेत. अशा या ऐतिहासिक उपराजधानी शहराला पुन्हापुन्हा भेट द्याविशी वाटते. खरचं मी या शहराला पुन्हा भेट देणारच आहे. तुम्हीसुद्धा याऐतिहासिक शहराला अवश्य भेट द्या.

# अशी आमुची मैत्री

**कु. पूजा अशोक काळे**
**12 Science**

आपले चुकते पाऊल जो फिरवितो आणि ढळणारा तोल जो सावरतो त्यालाच 'मित्र' असे म्हणतात. अशाच मित्रांमधील त्या पवित्र नात्याला 'मैत्री' म्हटले जाते. आपल्याला माहीतच असेल, मैत्रीमध्ये जेवढी ताकत असेल तेवढी कोणत्याच नात्यात नाही. कारणमैत्रीवरती कोणतीच बंधने नसतात.

मैत्री ही हृदयाच्या मखमली पेटीत जपून ठेवण्यासारखी अनमोल गोष्ट आहे. देव ज्यांना रक्ताच्या नात्याने जोडायला विसरतो. त्यांना मित्र म्हणतात, असे म्हटले जाते. अशी अनमोल मैत्री जिच्यासोबत मी अनुभवली ती म्हणजे 'प्रणाली'. प्रणाली सोबतचे सुंदर क्षण व्यक्त करताना मला खूप आनंद होत आहे.

इयत्ता अकरावीत असताना विद्यार्थी संख्या वाढल्याने वर्गात गैरसोय होत होती. म्हणून वर्णानुक्रम लावून काही मुलांना दुसऱ्या वर्गात पाठविण्यात आले त्यावेळी माझी जिवलग मैत्रीण 'मानसी' मला सोडून दुसऱ्या वर्गात गेली. माझे महाविद्यालय श्रीमती. न.शां.पंतवालावलकर ज्युनिअर कॉलेज, देवगड हे त्यावेळी माझ्यासाठी पूर्णतः अपरिचित होते. कोणाशीच फारशी ओळख नव्हती. अशा त्या गडबडलेल्या अवस्थेत मला प्रणाली भेटली. परंतु त्यावेळी आमची फक्त तोंडओळख झाली होती. त्यामुळे तिचा स्वभाव मला त्यावर्षी फारसा उमगला नव्हता.

आमची ओळख बारावी इयत्तेमध्ये मात्र चांगलीच झाली. आता आमच्यात खूप छान मैत्री झाली होती. प्रत्येकगोष्टआम्हीएकमेकींसमोर व्यक्तकरत होतो. काही दिवसातच आम्ही एकत्र येत असल्याने वर्गातही एकत्र बसायला लागलो. आता तर आम्हाला एकमेकींची खूप सवय झाली आहे.

तोंडावर कौतुक करणारे सगळेच असतात, पण त्याबरोबर आपल्या चुकांची जाणीव करून देणारे खूप कमी असतात. ही जाणीव करून देणारी अशी आमुची मैत्री आहे, असे मला वाटते. प्रणालीने तिच्या अनेक रूपांनी माझ्या मनातील मैत्रीचा एक रिता कप्पा पूर्णतः भरून टाकलाय. ती कधी माझी आईसारखी काळजी घेते. तर कधी माझ्या हातून चूक झाल्यावर कठोर शब्दांच्या फटकाऱ्याने मला जागे करते. आपल्या बोलण्यातून मैत्रीचा ऊबदार ओलावा देणारी प्रणाली मला भावते. प्रणाली नकला खूप छान करते. तिच्यातल्या विनोदी स्वभावाने सारे वातावरण हास्यमय करून टाकते. तिच्या या कलेला वाव मिळावा, अशी मी मनापासून इच्छा व्यक्त करते.

प्रणाली नेहमी म्हणते, 'माझ्या चुका मला दाखवून देत जा'. त्याशिवाय मला समजणार नाही. खरचं, आम्ही आमचे विचार स्पष्टपणे मांडतो तेही कोणताही राग न बाळगता. याच अनुषंगाने एक किस्सा सांगायला मला खूप आवडेल. एकदा बसमधून येताना माझा ड्रेस थोडासा फाटला. त्यावेळी मी खूप नाराज झाले. प्रणाली माझ्या सोबतच होती. त्याचवेळी परिस्थितीने गांजलेल्या एका फाटके कपडे घातलेल्या मुलीकडे

बोट दाखवत ती म्हणाली, ‘ ही मुलगी अशा अवस्थेतही खूप आनंदी आहे तुझा एवढासाड्रेस फाटला म्हणून वाईट वाटून घ्यायची काहीच गरज नाही!’ खरचं, त्यावेळी मला जाणवलं, जिच्याशी आपण मैत्री केली आहे. तो एक दिव्य हिरा आहे. जो आपल्या विचारांनी इतरांनाही चमकवेल.

मी अशी आशा बाळगते, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात मला प्रणालीची साथ लाभेल. मला जगातील चागल्या-वाईट गोष्टींची ओळख करून देण्यात तिचा मोठा वाटा आहे. एकमेकींना अंधारलेल्या दुनियेतून प्रकाशाच्या तेजोमय विश्वात घेऊन जाणारी अशी आमुची मैत्री माझ्या जीवनाला कलाटणी देणारी अतुलनीय भेट आहे.

# निमित्त

**कु. तन्वी संजय गोगटे**
**12 Science**

एका वाचक स्पर्धेच्या निमित्ताने मी वाचलेल्या पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त करायचे होते. त्यासाठी मी वाचलेले पुस्तक, त्याचे लेखक, लेखकाने त्यात मांडलेला विषय, पुस्तकाचा आशय, ते पुस्तक मला आवडण्याचे कारण, त्यातून मिळणारा संदेश, लेखकाची भाषाशैली, लेखकाचे वेगळेपण याविषयी लिहायला घेतले होते आणि त्यासाठी मी निवडले होते व पु. काळे यांचे 'निमित्त' हे पुस्तक.

स्पर्धा पार पडली. माझे मनोगतही झाले. पण या कृतीने माझ्या मनात वेगळचं विचारचक्र सुरु झालं. अरे खरचं आज आपण या स्पर्धेच्या निमित्ताने वाचलेल्या पुस्तकाविषयी अधिक विस्तृत विचार केला हा विचार करायलाही स्पर्धेचं'निमित्त' घडलं. म्हणजे माणसाला त्याच्या जीवनात काही करण्यासाठी कोणते ना कोणते 'निमित्त' लागतेच. नाही का?

मानवीजीवनात अनेक घटना घडतात. कृती होत असतात. यामागेही काही ना काही 'निमित्त' असेलं का? अरे हो की कोणत्याही कामासाठी असो वा कार्यक्रमासाठी असो काहीतरी 'निमित्त' हवेत. म्हणूनच की काय मनुष्य आपलं जगणंसुंदर करण्यासाठी आपल्या जीवनात निमित्ताच्या बागा फुलवतो. तसं पाहिलं तर'निमित्त' शिवाय काहीच घडत नाही. निमित्ताने मात्र बरचं काही घडत असतं. म्हणूनच आयुष्य सुंदर करण्यासाठी कोणतं ना कोणतं निमित्त लागतचं.

म्हणूनच की काय मनुष्य सण, उत्सव, व्रतवैकल्ये यांचं निमित्त करून आनंदाचे क्षण अनुभवण्याचा प्रयत्न करतो. अगदी दसरा-दिवाळीचा सण असो नाहीतर थाटामाटात साजरा होणारा 'गणेशोत्सव' असो. सामाजिक, धार्मिक, सलोख्याबरोबरच त्यातील आनंद मिळवण्यासाठी हे सणांचे आयोजन असते. नोकरी उद्योगाच्या निमित्ताने आपल्या घरापासून-नातेवाईकांपासून दूर असणारा माणूस या सण-उत्सवांच्या'निमित्ताने' एकत्र येतो. आपल्या माणसांना भेटतो. त्यांच्या सुख-दु:खाशी एकरूप होतो आणि नवी उर्जा घेऊन तो कामाच्या ठिकाणी परततो. माणसाला नवी उर्जा मिळण्याचे हे 'निमित्त' असतं.

एखादा शैक्षणिक उपक्रम किंवा सामाजिक कार्य असो, श्रमदान अथवा सेवा कार्य असो ते'निमित्तानेच' घडते. अगदी भक्तीमार्गाची वाट चालण्यासाठीही मनुष्य निमित्त शोधतो.

या विचारचक्राने लक्षात आणून दिलं आपण अनेक पुस्तकं वाचतो. पण वाचलेल्या एखाद्या पुस्तकाविषयी जेव्हा बोलायचं असतं तेव्हा त्या पुस्तकाविषयी विचार, त्याचा गभितार्थ, त्या पुस्तकाचं बाह्य रूप, अंतरंग अशी वैशिष्ट्ये जाणून घेण्याच्या दृष्टीने त्याकडे पाहतो. आणि मग त्या पुस्तकाकडे पाहण्याची दृष्टी मिळते. त्यासाठीही'निमित्त' होतेच. मला या 'निमित्त' चं आकर्षण वाटलं. 'निमित्तांची' विविधता

जाणून घ्यावीशी वाटली. अर्थात हे घडलेही एका स्पर्धेच्या 'निमित्ताने'. काही गोष्टी मिळवायला किंवा चुकीमुकीलाही 'निमित्त' पुरतं. कोणा कवीने म्हटलं आहे.

"एकनिमिष चुकतंहुकतं

उभ्या जन्माच्या चुकामुकीला

तेवढं एक'निमित्त' पुरतं..."

पण निमित्ताने बरचं काही साध्य होतं आणि म्हणूनच माणूस'निमित्ता'च्या शोधात असतो. प्रत्येक घटनेमागे काहीतरी 'निमित्त' असतं.

हा लेख सुद्धा 'रसराज' निमित्त....!

# स्पर्धेचे युग

नेहा कांदळगांवकर

एकविसावे शतक स्पर्धेचे युग म्हणूनच ओळखले जाते. या धक्काबुक्कीच्या जीवनात आणि या सिमेंटच्या जंगलात लोक अडकलेलेआहेत. विज्ञानाच्या वाढत्या सुविधांमुळे माणसाला साध्या साध्या चांगल्या गोष्टींचा विसर पडत चालला आहे. आता बघा ना, असे म्हणतात की पूर्वी भारतातून सोन्याचा धूर निघत होता. म्हणजे त्या काळी आपला देश किती समृद्ध संपन्न आणि श्रीमंत होता याची फक्त कल्पनाच केलेली बरी.

पण जसजसा काळ पुढे जाऊ लागला तसतसे विज्ञान अधिक प्रगत होऊ लागले, पैशाच्या हव्यासापायी खेड्यातील लोकांचे लोंढेच्या लोंढे शहराकडे जाऊ लागले. मातीच्या घराऐवजी सिमेंट-कॉक्रेटची जंगलेच्या जंगले निर्माण होऊ लागली.

त्यासाठी मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड होऊ लागली त्यामुळे आज त्याचे अनेक दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागलेत.झाडे नसतील तर आपले जीवन अशक्य आहे. ती नसतील तर जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होते या धुपेमुळे माती वाहून जाऊन नदी व मोठमोठी धरणे तलाव मातीने भरतात. शासनाचा लाखोंचा खर्च वाया जाऊन त्यापासून लोकांना काहीही फायदा मिळणार नाही. सध्या प्राणवायूसाठी दवाखान्यात पैसे खर्च करावे लागतात. पण त्याच्याऐवजी मोकळ्या हवेत फिरून अनेक आजार बरे करता येतात.

आज मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड चालू आहे आणि होतही राहील.....पण त्यामागचे परिणाम जाणून न घेता मानवाने हे कृत्य केले आहे. पर्यावरणाचे चक्र यामुळेच बिघडले आहे. त्यामुळेमहापूर, रोगराई, दुष्काळ हे दुष्परिणाम जाणवतात. मला पूर्ण जाणीव आहे की मीच उद्याचा सुजाण नागरिक आहे. त्यामुळे सर्व काही माझ्याच हातात आहे. आज शेतकरी आधुनिकीकरणाकडे वळत आहे. याचे उदाहरण म्हणजेच पूर्वीच्या शेतकऱ्याला गांडूळ खत, शेण खत इ. खताशिवाय दुसरे काहीच माहीत नव्हते. या शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा चांगला भाव मिळत नाही. आता रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. त्यामुळे जमिनी नापीक होतात.

आज सामान्यमाणसाचे हे स्वप्न आहे की, माझा एक मोठा बंगला असावा. त्याच्या पुढे अलिशान गाडी असावी. यापायी त्याने स्वतःचे शेत विकले.खेड्यातले आपले तेटुमदार घर विकले, शहरातखुराड्यात येऊन तो राहिला. याचाच परिणाम होऊन अन्नधान्यांची टंचाई भासू लागली.या पर्यावरणाचे संतुलनच बिघडून गेले. ही काळी माती पावसाच्या थेंबाथेंबासाठी चातक पक्षासारखी वाट बघत राहिली. अनेक लोकांचे संसार दाबून श्रीमंताच्या इमारती उभ्या राहतात. पण त्यासाठी लागणारे सिमेंट हे मातीपासूनच बनवले जाते. आज आपल्या देशाला लोकसंख्येचा प्रश्न फारमोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. आपल्या देशाची लोकसंख्या आज १०० कोटीच्याही

पुढे गेली आहे .या वाढत्यालोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. नाहीतर पुन्हा त्यांच्या जागेचा, अन्नधान्याचा प्रश्न उद्भवतो. त्यामुळे पुन्हा वृक्षतोड करावी लागल्यामुळे तेच प्रश्न पुन्हा उद्भवतात म्हणून मुळातच लोकसंख्या वाढू न देणे हे गरजेचे आहे. ही वसुंधरा आज या बोझ्यानेवाकत आहे. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी' या तुकारामांच्या वचनाची खरी गरज आहे.

संदर्भ:- Internet

# सुवर्णस्मृती

**कृपा ठाकूर,**
**11 Commerce**

आपल्या निस्पृह दातृत्वाने आणि त्यागमय समाजसेवेमुळे या मुणगे भूमीला पावन करणारे करुणा कल्पतरू कै.शांताराम कृष्णाजीपंतवालावलकर अर्थात बापूंच्या आठवणी लक्षावधींच्या हृदयावर कोरल्या गेल्या आहेत. तशा त्या समस्त मुणगेवासीयांच्या सुद्धा कारण त्यांनी लावलेलं श्री.भगवती हायस्कूलच्या रूपातील छोट्या रोपट्याचं आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

समाजाचा विकास घडवून आणायचा असेल तर ज्ञानाच्या मंदिरांची उभारणी होणे आवश्यक आहे हे त्यांनी जाणले. त्यांनी देवगड येथील आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज तसेच अध्यापक महाविद्यालय स्थापनेकरिता सक्रियपुढाकार घेतला. समाजसेवा आणि शिक्षणप्रसार हे ब्रीद जोपासून श्री.भगवती मातेच्या आशीर्वादाने व भविष्यातील पिढीचे भवितव्य ओळखून स्व.शांताराम कृष्णाजी उर्फ बापुसाहेब पंतवालावलकर यांनी शिक्षणाचा गंगोत्रीचा उगम मुणगे गावाच्याकाळ्या कातळावर केला. या शिक्षणाच्या गंगेच्या उगमानंतर तिचे पात्र हळूहळू वाढत गेले आणि मागील वर्षी म्हणजेच सन २०१६-१७ मध्ये शिक्षणाच्या गंगोत्रीला ५० वर्षे पूर्ण होऊन त्याचा प्रवाह विस्तारत गेला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात मुणगे गावात कारिवणेवाडीत पंतवालावलकर कुटुंबियांचे एक घराणे आजही वास्तव्य करून आहे. कै.शांताराम कृष्णाजी पंतवालावलकर म्हणजेच आमचे बापू याच घराण्यातील. बापूंचा जन्म दि. ०४ जानेवारी १९०७ रोजी देवगड येथे झाला. बापूंचे बालपण आणि शिक्षण मालवण येथे झाले. त्यानंतर उद्योगधंदा करण्याच्या कारणास्तव बापू मुंबईस गेले. नेवाळकरघराण्यातील नलिनीताई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. या भाग्यलक्ष्मीने श्री.बापूंना त्यांच्या सर्व कार्यात शेवटपर्यंत साथ दिली.

१९६१ साली कोकणात झालेल्या वादळात मुणगे गावांतील वाघोळी येथील सातवीपर्यंत असलेली जुनी शाळा जमीनदोस्त झाली. त्यानंतर शाळेचे वर्ग श्री.भगवती शेजारी असलेल्या धर्मशाळेत किंवा श्री.हिर्लेकर यांच्या माडीवर भरविण्यात येत होते. त्याकाळात गावचे सांस्कृतिक आणि शैक्षणिक नेतृत्व गावातील प्राथमिक शिक्षकच करीत असत. गावातील शिक्षक मंडळीनी गावातील नागरिकांनी शाळागृह बांधण्याचे प्रयत्न सुरु केले. परंतु पाचवी ते सातवी पर्यंतचे वर्ग बसू शकतील अशी वास्तू बांधण्यासाठी फंड उभा करणे फारच कठीण होते. मुणगे गावातील ग्रामस्थ फक्त श्री. भगवती देवीची यात्रा आणि इतर देवकार्याच्या वेळीच एकत्र जमत असत. सामाजिक कार्यासाठी गावचे लोक कधी एकत्र आले नव्हते. अशावेळी शाळागृहाच्या आर्थिक मदतीसाठी शिक्षक मंडळींनी व नागरिकांनी कोल्हापूरला श्री.बापूसाहेब पंतवालावलकरयांच्याकडेजाण्याचे ठरले. मध्यस्थीसाठीमुणगे गावचे कोल्हापूर रहिवाशीश्री. तात्यासाहेब व श्री.बापूंची श्री देवी भगवती आणि त्यांचे गुरु

श्री.बालअवधूत महाराज यांच्यावर अतीव निष्ठा होती, श्रद्धा होती. त्यांच्या साक्षात्कारानेच मुणगे गावचा भाग्योदय होण्याचा दृष्टांत श्री.बापूंना झाला असावा.

बापूंनी श्री.देवी भगवतीच्या नावाने शिक्षणसंस्था स्थापन केली. प्रथम हायस्कूलची इमारत बांधण्याचा प्रस्ताव मुंबईतील मुणगे गावच्या ग्रामस्थांपुढे ठेवला संपूर्ण मुणगेवासियांमध्ये एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले. त्यांनी बापूंच्या शब्दाला मान दिला; हायस्कूलची इमारत बांधण्यासाठी लागणारी जमीन गावच्या मुणगेकर व सावंत कुटुंबियांकडून मिळाली. मुणगे गावातील ग्रामस्थांच्या श्रमदानाने व बापूंच्या आर्थिक मदतीने, आशीर्वादाने हायस्कूलच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले.

स्व.शांताराम कृष्णाजी उर्फ बापूसाहेब पंतवालावलकर यांनी सन १९६१ साली श्री भगवती एज्युकेशन सोसायटीया संस्थेची स्थापना करून मुणगे गावातील तमाम विद्यार्थ्यांना इ.१० वी पर्यंत शिक्षणाची कवाडे उघडी केली. दहावीनंतरच्यापुढील शिक्षणासाठी याच मुणगे हायस्कूलमध्ये सन २००९-१० मध्ये व्यावसायिक शिक्षण देणारे (एम.सी.व्ही.सी) कनिष्ठ महाविद्यालय सुरुकरण्यात आले. शाळेच्या वर्ग खोल्यांमध्ये सुरुकरण्यात आलेले वर्ग कायमस्वरूपीया ठिकाणी ठेवणेशक्यनसल्याने याच हायस्कूलचे माजी विद्यार्थी श्री.सुरेश बांदेकर यांनी केलेल्या पंचवीसलाखरु. देणगीच्या मदतीने व अनेकदेणगीदारांच्या मदतीने ज्युनिअर कॉलेजची स्थापना २०१५ मध्ये झाली.

संदर्भ:- स्मरणिकासुवर्णस्मृती

# नातं नाळेचं

**प्रा.अविनाश वि. बापट**

अरे देवा!या गडबडीत आणि कुणाचा हा मेसेज आला...काहीशा त्राग्याने तिने पर्सला हात घालून आतील सेलफोन काढला. पटापट बटणं दाबून तिने स्क्रीन पाहिली.

Read E-mail urgently तिच्या पप्पांनी भारतातून-मुंबईतून तो मेसेज पाठवला होता, पण ती संध्याकाळी घरी जाईपर्यंत ते E-mail वाचूशकणार नव्हती, कारण एकदा या रिसर्च सेंटरमध्ये शिरलं की प्रायव्हेट गोष्टी बंद! घरी गेल्याशिवाय ते पत्र पहाणं केवळ अशक्य होतं.

रिसर्च सेंटरमध्ये शिरताना ती विचार करत होती. काय बरं असावं अर्जंट एवढं? गेली सात वर्षे ती एकदाही भारतात गेली नव्हती. अगदी काही महिन्यांपूर्वी तिच्या सख्ख्या लहान भावाचं लग्न झालं त्यावेळी तिने E-Mailवरून अक्षता टाकल्या होत्या.

पंधरा दिवसांपूर्वी संशोधन जाहीर झाल्यावर तिला पहिला अभिनंदनाचा फोन तिच्या आई पप्पा व भावाचा होता.

“Congratulation ! Now Indian doors are opened for you”

सात वर्षे... आपण केवढा काळ भारतात गेलो नाही! तिने आपली जीभ चावली. इंग्लंडला आल्यावर पहिली चार वर्षे ती आपल्या आई-वडिलांना पाहू शकत नव्हती, मात्र त्यांचा आवाज ऐकून आनंद व्हायचा, पण पुढे-पुढे विज्ञान वेगाने प्रगत झालं आणि गेली तीन वर्षे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा पडद्यावर ती भेटू- बोलू शकत होती. जणू प्रत्यक्ष भेटीचा आनंद लुटत होती. हे सारं संपून आता ती भारतात जाऊन आई-वडिलांच्या मिठीत शिरायला आतुरली होती.

-असेलका वहिनीची स्वीट न्यूज?

-झालं असेल का भावाचं प्रमोशन?

-का आजारी आहे कुणी? पण ती इकडे आल्यावर तिच्या आई-वडिलांनी स्पष्टच सांगितलं होतं की,आजरासंबंधात आम्ही तुला काही कळवणारनाही. उगीचचिंता नको.

एनी वे, संध्याकाळी घरी गेल्या-गेल्या वडिलांनी पाठवलेला Emailवाचायचा ठरवून तिने रिसर्चची वेबसाईट उघडली. मेसेज वाचू लागली.

‘दुर्मिळ जातीचं संगोपन, जतन,रक्षण हे सारं शक्य’.

-निकामी मेंदूपेशी, स्वादुपिंडयकृत यांच्या पेशी बदलून रोग्याला नवीन जीवन देणं शक्य!

-उपचारपद्धती सामान्यांना परवडणारी.

- मानवीप्रथिनाचं औषधोपचारासाठीउत्पादन.

भारतातून व इतर धार्मिक देशातून काही अभिप्राय मजेशीर होते.

-ब्रम्हदेवाच्या विश्वनिर्मितीला चॅलेंज!

-अनैतिक गोष्टी करायला विज्ञानाचा परवाना!

-पती-पत्नी नातं नष्ट होईल!

- रामायण - महाभारत व अन्य भारतीय पुराणातील एका थेंबा
पासून शंभर राक्षस तयार किंवा एका वीर्यबिंदू
पासून १०० मुलगे या गोष्टी खोट्या व भाकडकथा ठरणार नाहीत!

-स्टेम सेल जेवढं फायद्याचं तेवढंच ते दुधारी व खतरनाक शस्त्र ठरेल

काहींनी अगदी विचारपूर्वक आपली मते दिली होती.

-स्टेम सेल्समुळे मानवी जीवनात रोग, मृत्यू यांचे भय संपेल.

-माणूसउन्मत होईल, कारण अमर्त्य असेल.

एक मजेशीर अभिपाय एका जगत् सुंदरीनं पाठवला होता. तो असा.....

-स्टेम सेल्समुळे टक्कल नष्ट होईल व त्वचारोपणाने तो अधिक सुंदर होईल.

या संशोधनामुळे काही डॉक्टर लोकांचे अभिप्राय मात्र बोलके होते.

-हृदयविकार व मधुमेह या यमाच्या एक नंबरच्या पकड वॉरंटांना कुचकामी ठरवता येईल.

-अंधत्व, पुरुषातील वंध्यत्व ते अगदी सांधेदुखी नष्ट होईल

-अल्झायमर, मस्कुलरडिस्ट्रफी आजार व मोटार न्युरोन आजार कमी करता येतील.

-कर्करोग व अनुवांशिक रोगांची कारण- मीमांसा होऊ शकेल.

- स्टेम सेल त्या - त्या पेशंटचे असलेले रोपण अस्वीकार प्रश्न संपेल.

काही विचारपूर्वक अभिप्राय तिला अंतर्मुख करणारे होते

-गरीब लवकर मरेल श्रीमंत अधिक जगेल.

-मानव जातीनं मृत्यूवर मात केली तरी तो मनावर अधिकार गाजवू शकेल का?

वाचकांच्या या प्रश्नांनी, ती अस्वस्थ बनली व भूतकाळात शिरली.

डॉ.हेन्स स्टलिनजे मॉल्युकूलर बायोलॉजी इन्स्टिट्यूट ऑफ लंडनचे प्रमुख वैज्ञानिक होते. आठ दिवसांपूर्वी गाय व मानव यांच्या संकरातून निर्माण झालेला भृण स्टेम सेल (प्रमुख पेशी) संशोधनासाठी वापरण्यात यावा याचे जोरदार समर्थन त्यांनी व त्यांच्या दोन भारतीय सहशास्त्रज्ञांनी करून जगात खळबळ उडवली होती.

या बातमीसंबंधीच्या प्रतिक्रिया जगातील सर्व वृत्तपत्रातून येत होत्या.डॉ. हेन्सबरोबर काम केलेले दोन भारतीय शास्त्रज्ञ डॉ. राधेय पांडे आणि त्यांची पत्नी डॉ. राणी पांडे यांचेही गेल्या सहा-सात वर्षातील अथक परिश्रम सार्थकी आले होते.

गेली सहा-सात वर्षेडॉ. राणी पांडे या संशोधनात इतके व्यस्त होते की ते भारतात एकदही येऊ शकले नव्हते.

भारतातून सात वर्षापूर्वी पोस्ट ग्रॅज्युएट झाल्यावर राधेय व राणी यांनी एका वृत्तपत्रात एक जाहिरात वाचली. काय होती ती जाहिरात? मॉल्युकूलर बायोलॉजीमधून शिक्षण पूर्ण केलेल्या भारतीय बुद्धीवंतांना चॅलेजींग क्षेत्रात प्रवेश करण्याची सुसंधी. लंडनमधील डॉ. हेन्स स्टेनलिन या प्रमुख शास्त्रज्ञांच्या हाताखाली त्यांच्याबरोबर रेण्विय जीवशास्त्र (Molecular Biology) यात संशोधन शक्य. फक्त सहा लोकांना मुलाखतीला बोलावले होते. मुलाखत दिल्ली येथे स्वतः डॉ.हेन्स स्टेनलिन व इतर वैज्ञानिक घेणार होतेत्यातून निवडलेले डॉ. राधेय व डॉ. राणी हे दोघे मुंबईचे होते.

भारताच्या आणि लंडनच्या वृत्तपत्रातून  या दोघांचे फोटो त्यावेळी झळकले होते. डॉ.हेन्स प्रमुख असलेली ही ब्रिटनमधील संशोधनकार्याला वाहून घेतलेली विज्ञान संस्था. या दोघांचा सर्व खर्चकरून एक भलं मोठ्या रकमेचं पॅकेज देणार होती...दिलं होतं.

एकाच फ्लाईटने दोघं लंडनला निघाली. त्यावेळी आपलं दोघांचं लग्न होईल असं त्या दोघांच्या मनातही नव्हतं. किंबहुना डॉ. राणी विमानतळावर पोहोचल्यावरसुद्धा तिच्या आईच्या गळयात मिठी मारून रडताना डॉ. राधेयाला सांगत होती की, मी ही ऑफर रद्द करते!'

"पण का? व्हॉट ए फुलीश थिंकींग!" या डॉ. राधेयच्या ओरडण्याने तिने आपले आसू पुसत म्हटलं होतं, "डॉ. हेन्स व त्यांच्या निवड मंडळानं आमची निवड केल्यावर एक गोष्ट सतत बजावली होती. ती विसरलास काय?" राणीनं त्याच्या नजरेत पहात विचारलं.

"विसरेन कसा? माझ्याही घरातून मला ती अट ऐकून विरोध झाला नाही असं राणी तुला वाटतं का? ती अट आपण पालन करू असं लिहून दिल्यावरच आपला व्हिसा पासपोर्ट सर्व ताब्यात आलं ना?" राधेयनं तिच्या डोळ्यांत पाहात म्हटलं.

"सांगती काळीज कापणारी आणि आपण स्वीकारलेली अट..पुन्हा एकदा" राणी म्हणाली.

"पण का परत-परत उजळणी करून त्याचा काय फायदा?" डॉ.राधेय म्हणाला.

" माझी आई म्हणते की लंडनहून भारतात आणल्यावर स्वातंत्र्यवीरवि.दा.सावरकरांनाकाळेपाणी... जन्मठेपेवरपाठवतआहे... काळेपाणीचम्हण ना!"

"हेबघराणीस्वातंत्र्यवीरसावरकरांशीआपलीतुलनाचहोऊशकतनाही आणिकरणं हे ही खुळेपणाचं आहे, पणतू म्हणतेस म्हणून परत एकदा ती अट सांगतो..."

तिच्या आईनं व डॉ. राणीनंकान टवकारले. डॉ. राधेय याने आपली बॅग उघडून डॉ.हेन्स यांनी दिलेलं पत्र वाचू लागला.

डॉ. राधेय...

"ब्रिटन सरकारच्या अखत्यारीत असणाऱ्या व मॉल्युकूलर बायोलॉजी संबंधात अत्यंत गुप्त व भविष्यात संपूर्ण जगातखळबळ माजवणाऱ्या एका रिसर्च प्रोजेक्ट (संशोधन प्रकल्प) साठी आपली निवड झाली आहे. आपलं सर्व लॅबवर्क हे इन कॅमेरा चालेल व इतरवेळीही आपणांवर ब्रिटीश गुप्तहेर खात्याचं बारीक लक्ष असणार आहे. संशोधन हे पूर्णतः ब्रिटीश सरकारचं असून ते जगापुढे मांडलं जाईपर्यंत त्यातील कुठचाही भाग आपण

कुठल्याही प्रकारे एक्स्पोज (उघडा) करायचा नाही. सदरचा प्रोजेक्ट किती वर्षे चालेल हे सांगू शकत नाही. पण सदर प्रोजेक्ट पूर्ण होईपर्यंत कुठल्याही परिस्थितीत भारतात जाता येणार नाही. संशोधनातील अंतिम सत्य जगासमोर मांडले गेल्यावर आपण आपल्या इच्छेनुसार कुठेही जाऊ शकता. गद्दारी केली तर आपण भारतात जाऊ शकाल, पण... पण... ती डेडबॉडी असेल!" पत्र संपलं होतं.

"म्हणूनच मी याला काळं पाणी म्हटलं." राणीची आई म्हणाली.

"की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेत!"

हसत हसत राणी म्हणाली आणि प्रवाशांना एरीओड्रमकडे धावपट्टीवर चालण्याची सूचना मिळाली.

विमानात शिरतांना एका विचित्र अवस्थेत ती आपल्या सीटकडे गेली. हवाईसुंदरी सर्वांना आपापल्या जागा दाखवत होती. काहीजण हिंदी व इंग्रजीतून सूचना करत होत्या. तिच्या अगदी शेजारचीच सीट राधेयला मिळाली होती. आता तिच्या जीवात जीव आला होता.

त्यादिवशी रिसर्च केंद्रात आलेले सर्व ई-मेल व संदेश, अभिप्राय उतरून घेऊन त्यावर चर्चा डॉ. हेन्स स्टेनलिन या शास्त्रज्ञांबरोबर करेपर्यंत रात्रीचे ८ वाजले होते. गेटमधून बाहेर पडून कार स्टार्ट करत केंव्हा एकदा खोलीवर जाऊन कॉम्प्युटर ऑन करून वडिलांचं ई-मेल वाचते असं तिला झालं होतं

काही वर्षापूर्वी असाच अर्जंट कॉल करून तिने वडिलांचा अभिप्रायमागवून घेतला होता. त्यावेळी तिनं वडिलांना सांगितलं होतं की आपलं राधेय पांडेवर व त्याचं माझ्यावर प्रेम आहे. आम्ही लग्न करू का? कारण इंग्लंडला येऊन फक्त दोन वर्ष झाली होती आणि अजून पाचसहा वर्षांचा काळ एकाकी घालवणं अशक्य होतं. तेव्हा आपल्या हक्काचं माणूस की जे एकमेकांना धीर, आधार व प्रेम देईल यासाठी दोघेही आतुर होती आणिलग्नबंधनात अडकणार होती. तत्पूर्वी डॉ. हेन्स स्टेनलिन  यांना विचारून पहावं म्हणून त्यांनी त्यांना विचारलं. "अतिशय सुंदर! यू आर मेड फॉर इच अदर! फक्त एकच अट की रिसर्च पूर्ण होईपर्यंत बाळाची आई व्हायची घाई करायची नाही. टेक केअर ऑफ इट!" असं डॉ. हेन्स म्हणाले होते.

घराचंदार उघडताच तिने प्रथम काय केलं असेल तर वडिलांचं ई-मेल वाचू लागली. ई-मेल वाचताच ती ३ फूट उंच उडालीच. ज्या संशोधनाचा त्यांनी गेली सात वर्षे पाठपुरावा केला होता. त्याची प्रचिती घेण्याची वेळ तिच्या भावजयीवर (स्नेहावर) आली होती. १५ दिवसांवर तिच्या स्नेहाचं बाळंतपण भारतात होणार होतं, पण तत्पूर्वी डॉक्टरांच्या ध्यानात एक गोष्ट आली की होणारं बाळ निरोगी असलं तरी त्याच्या आईला म्हणजे स्नेहाला ल्युकेमिया(रक्ताचा आजार) झाला असून भारतात तरी यावरच संशोधन नाही.

राणी पांडेनं तडक पहिला सेलफोन लावला तो डॉ. हेन्स स्टेनलिन जे मॉल्युकूलर बायोलॉजी इन्स्टिट्यूट लंडनचे प्रमुख वैज्ञानिक व त्या दोघांचे गाईड होते. त्या तिघांच्या रिसर्चवर आधारित पेशंट म्हणजे स्नेहा. तिलाआपण केलेल्या नवीन रिसर्चवर आधारित पेशंट म्हणजे स्नेहा. तिला आपण केलेल्या नवीन रिसर्चनुसार वाचवता येईल याची तिला खात्री होती. किंबहुना इतर अनोळखी लोकांवर प्रयोग करून नव्हे तर त्याची अंमलबजावणी (application) करून साऱ्या जगाला व घरच्यांना ती सांगणार होती की, "यू कान्ट बिलीव्ह!"

सर्व ऐकून घेतल्यावर डॉ. हेन्स स्टेनलिन तिला जे म्हणाले त्याने ती अधिकच मोहरून गेली.
“यु गो टू इंडिया इमिजिएटली ॲन्ड ब्रिंगदॅट कपल. शी विल डेफीनेटली सर्व्हाव! बिफोर डिलेव्हरी यु रिच हिअर !”

तिने रात्री नवरा राधेय येताच सर्व परिस्थिती समजावली. त्याने तिलाच भारतात जाऊन स्नेहा व तिच्या भावाला आणण्याची आज्ञा केली. तसे डिलेव्हरीला फार नव्हे पण पंधरा दिवस होते. उगीच रिस्क नको म्हणून तिने ताबडतोब सर्व प्लॅन पप्पांना फोनवर सांगितला व ३-४ दिवसांतच अर्जंट तिघांच विमान बुकींग करण्याचं सांगून टाकलं. दुसऱ्या दिवशी ती सात वर्षांनी भारतात जाणार होती. सात वर्षे... तिने सुस्कारा टाकला.

तिने राधेयला भारतातचालण्याचा आग्रह केला, पण तितकासा तो डॉ. स्टेनलिनला पटणारा नव्हता. आता त्या दोघांना भारतात जायचं बंधन नसलं डॉ. राणी पांडे गेल्याने अर्धा भार त्याच्या कामात वाढला होता व डॉ.हेन्स तशी अजूनतरी दोघांना एकदम परवानगी देणारे नव्हते. तिचा आनंद भारत देश... मातृभाषआणि माता-पित्यांच्या दर्शनासाठी... आई-वडिलांच्या मिठीत शिरण्यासाठी आतुरला होता.“ तू उद्या मुंबईत आईच्या मिठीत असशील पण आज तरी माझ्या मिठीत रात्र घालवं.” त्याने तिच्या गालावर चापटी मारली. ल्युकेमिया... तिने दीर्घ श्वास टाकला. वहिनीच्या नशिबी काय आहे देवजाणे.” राणी म्हणाली.
“तिचं नशीब चांगलं आहे. म्हणूनच आपल्या नवजात बाळाच्या नाळेतील स्टेमसेल्स रिसर्च जाहीर व्हायला... डॉ. हेन्ससारखे सर्वतोपरी मदत करणारे गाईड मिळायला लक फॅक्टर महत्त्वाचा ठरतो बघ राणी !” त्यानं समजावत तिच्या पाठीवरून हात फिरवला.
“पप्पा त्या दोघांना डिलेव्हरीपूर्वी भारतातून इकडे लंडनला यायला परवानगी देतील ना ?” तिने चिंता व्यक्त केली. “शी मस्ट काम बिफोर हर डिलेव्हरी!”
राधेय पांडेनं तिला बजावलं.
“ओकेबाबा!” तिने मान हलवली.
“स्टेम सेल्स थेरपीने पेशंट वाचतो का पहायचंय... नव्हे वाचवायचाय.”
ती म्हणाली.
“काय गं तुझे पप्पा सायन्स ग्रॅज्युएट आहेत का?”
“का बरं? मी हा संशोधनाचा भाग त्यांना मातृभाषेत समजावीन. तू नाही का आता माझ्या सहवासात उत्तम मराठी शिकलास.”
“मग स्टेमसेल्सची रंगीत तालीम सांगा पाहू...तू काय तिथे बडबडशील देव जाणे!”
“ऐक हं... नवजात बालकाच्या नाळेतून काढलेल्या रक्तात मोठ्या प्रमाणात स्टेम सेल्सच्या पेशी आढळून येतात.”
“स्टेम सेल्स म्हणजे?..आधी सांग त्यांना...त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक असणार?”
“डॉ. हेन्सचा शिष्य शोभशील बरं का!”

“मग काय आहेच!”

“स्टेम सेल्स म्हणजे मूलपेशी. या मूलपेशी गर्भात किंवा नाळेच्या रक्तात मिळू शकतात. या पेशीत नवनिर्मितीची प्रचंड ताकद असते. याचा उपयोग करून नवीन पेशी तयार करणे,अवयवांची झीज भरून काढणे यासाठी उपयोग करून घेता येतो. त्याला‘स्टेम सेल्स थेरपी’ म्हणतात. हे संशोधन अगदी अलिकडचे म्हणजे १५ दिवसांपूर्वीचे आपण तिघांनी केलेले संशोधन केले आहे.

आणि त्यावरचा सप्रमाण सिद्ध होणारा पेशंट स्नेहा वहिनी ! त्याने थोडीशी राणीची बऱ्यापैकी ताणली.

“आणखीया पेशींच वैशिष्ट्य सांग.”

“स्टेम सेल्स या स्पेशल पेशी नाहीत. मात्र त्या विशिष्ट प्रकारच्या स्पेशल पेशी निर्माण करू शकतात.”

“हे बघ राणी मानवी शरीरात दोन स्टेम पेशी आढळतात.

१) गर्भावस्थेतील २) पूर्ण वाढ झालेल्या अवस्थेमधील.”

“अरे लंडनमधील एकतरी हॉस्पिटल आपण भेट द्यायचं शिल्लक ठेवलं काय?” राणी.

“नाही तू नव्हे मी म्हणा!” त्यानं बजावलं.

“हॉस्पिटलात असंख्य जीव जन्माला येतात आणि त्यांची नाळ कापून फेकली जाते किंवा आपोआप बेंबीतून ७ -८ दिवसांत गळते. या नाळेतील रक्त काढून ते साठवले जाऊ शकते आणि तुझ्या स्नेहा वहिनीची नशिबाची टेस्ट चालू होते!” राधेय म्हणाला.

“वार पडण्याअगोदर आणि नंतर त्यातील रक्त गोळा केलं जातं. प्रत्येक एका कार्डमधून (नाळ) १०० मिली रक्त गोळा होतं. या रक्तात पुरेशा प्रमाणात स्टेम सेल्स असतात. हे द्रवरूप नायट्रोजन वायूत उणे १९६ सेल्सियस तापमानात साठवून ठेवतात. हे रक्त कमीत कमी १० वर्षेही टिकू शकते.

“हा झाला तांत्रिक भाग. पण हे रक्त भविष्यात त्याचं बाळाला किंवा बाळाच्या जवळच्या म्हणजे आई-वडील, भाऊ.... बहीण... या नातेवाईकांत वापरल्या तरी त्या रिजेक्ट करत नाहीत.”

“कारणआहे ठाऊक!” राणीनं खिल्ली उडवली.

“नाळेतील स्टेम सेल्स या बोनमॅरोपेक्षा कमी इम्युनोजेनिक असतात आणि सुस्थितीतील या स्टेम सेल्स होणाऱ्या बाळाच्या नाळेतून काढून स्नेहाला टोचणार व ल्युकेमिया सारखा रक्ताचाकॅन्सर आटोक्यात आलाच समज.”

“अगं राणी, हे सगळं पप्पांना ऐकवलं तर त्यांचं डोकं गरगरेल.”

“अरे त्यांचंच काय पण आपलंही डोकं गरगरेल.” एवढं विज्ञान पुढे जातंय आणि आम्ही दोघं साक्षीदार आहोत याचा मला खूप अभिमान आहे. राधेय?”

राणीनं विचारलं.

“आणि मला पण!” राधेय उत्तरला.

“किती काळ स्नेहाला इकडं रहावं लागेल काही अंदाज?”

“वर्ष...दोन वर्ष...कदाचित कायम!”

“कायम?”

“अगंमीथट्टाकेली...कायमकशाला?  माझ्या मते वर्ष दोन वर्षात ल्युकेमिया आटोक्यात आला  की आपण सगळ्यांनी एकच गोष्ट करायची.”

“कोणतीरे?”  राणीनंविचारलं.

“चलेजाव!  छोडोइंग्लंड!”  राधेय.

“म्हणजेतूहीकंटाळलासम्हणकी!”

“होय!  नाळेचं  नातं  महत्त्वाचंअसतं.  जिथे आपली नाळपुरली आहे तो देश
आपला!”

चार दिवसांनी स्नेहा वहिनी व भावाला घेऊन डॉ.राणीआली; विमानतळावर उतरतांनाच तिच्या पोटात किंचित दुखत होतं, त्यामुळे राणीच्या रूमवर न जाता डॉ. हेन्स यांनी तडक ‘मॉल्युकूलर बायोलॉजी इन्स्टिट्यूट ऑफ लंडन’ येथे येण्याचा सल्ला दिला.

तिथे हॉस्पिटल सुविधा व नामांकित असे गायनॅक डॉक्टर हजर होतेच. पुत्ररत्न लाभ झाला.

बाळाच्या नाळेच्या स्टेम सेल्स जोरदार उपयोजन (Application) स्नेहांवर चालू झाले. दोन महिन्यांची रूमवर राणीकडे जाण्याची अनुमती मिळाली होती, कारण लस टोचणीचे डोसअॅडजस्ट करून दिले गेले होते. स्नेहाचा ल्युकेमिया हा अगदी प्राथमिक अवस्थेत होता. मधून-मधून ती रिसर्च लॅबमध्ये जाई.

राणीच्या भावानं भारतात जाऊन त्याच्या आई-वडिलांना लंडनला पाठवायचं ठरलं, कारण त्यालाही दोन महिने रजा घेऊन झाली होती. कामावरहजर होणे भाग होते व स्नेहाची सेवा !

वर्ष गेले होते. स्नेहा अधिकाधिक बरी होत होती. तसं सुट्टीच्या दिवशी प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या जात होत्या. स्टेम सेल्स थेरपीचा उत्तम परिणाम दिसून आला होता.

आणि एक दिवस डॉ.राणी आणि डॉ.राधेय यांनी भारतात जाण्याची परवानगी डॉ. हेन्सकडे मागितली. “माझ्या पश्चात तू या रिसर्च सेंटरचं काम पहावं. मुख्य वैज्ञानिक व्हावं अशी माझी इच्छा होती, पण... पण... तुमच्या इच्छेनुसार होईल.” त्यांनी फारसा विरोध केला नाही.

...आणि त्या साऱ्यांनी भारतात परत जाण्याचा दिवस उजाडला. लंडन विमानतळावर वेटींग रुमच्या बाहेर डॉ. हेन्स स्टेनलिन हे शास्त्रज्ञ स्वत: आणि बरेच रिसर्च सेंटरचे व इतर स्नेही जमले होते. साऱ्यांच्या डोळ्यात वियोग दिसत होता...अश्रू मोकळे करत होते. प्रत्येकजण मिठीत शिरून रडत होता.

प्रवाशांना वेटींग रूम सोडायची परवानगी मिळताच डॉ. हेन्सयांनाही अश्रू अनावर झाले. डॉ.राधेय पांडेला मिठी मारत ते म्हणाले, “आजपर्यंत गेलीआठ-नऊ वर्षात महत्त्वाच्या रिसर्चसीडी तू हजारांनी बनविल्या असतील. स्टेम सेल्स आणि नाळ यासंबंधी तू बनवून दिलेल्या सर्व सीडी माझ्या ताब्यात असल्यातरी आज मी त्यातील काही सीडी तुला भेट देत आहे व बरोबर माझं मनोगत व्यक्त करणारं पत्र आहे. मात्र तू ते भारतात गेल्यावरच वाच. त्यांनी डॉ. राधेय पांडेला घट्ट प्रेमालिंगन दिलं. सारेच जण निरोपाचे हात हलवत होते. भारलेल्या वातावरणात शब्दही फुटत नव्हते.

भारतात पोहोचताच प्रथम डॉ. राणी व डॉ. राधेय यांनी काय केलं असेल तर डॉ. हेन्सचं पत्र उघडून वाचलं. डॉ. हेन्स शास्त्रज्ञ व माणूस म्हणून अतिशय आदर्श होते. एखाद्या विषयावर त्यांची पकड जबरदस्त होती. पत्राचा मराठी अनुवाद इंग्रजीपेक्षा अधिक लोभस वाटेल.

प्रिय...

डॉ. राधेय आणि राणी पांडे

आठ वर्षापूर्वी तुमची माझ्याकडून निवड झाली. त्यावेळी मी तुम्हाला दिलेलं पत्र अजूनही आपणाकडे असेल तर ते पहिलं जाळा व मगच माझं मनोगत वाचा.

भारतीय शास्त्रज्ञ आणि संगणक नव्हे तर सारेच भारतीय प्रचंड बुद्धिमान आणि विनम्र असतात हे गेली आठ-नऊ वर्षे मी आपणांस जवळून पहात होतो. तुम्ही दोघांनी तन-मन आणि सर्वस्व अर्पून मला स्टेम सेल्सवरील रिसर्चला केलेली साथ मी आयुष्यभर विसरू शकत नाही. आपणांसारखे विश्वासू व प्रेमळ व्यक्ती मिळणे हे एखाद्याच्या भाग्यातच लागते. आज मी ६५ वर्षाचा आहे. माझ्या वैयक्तिक जीवनाबद्दल मला आपण कधीही विचारलं नाहीत हा आपला मनाचा मोठेपणा !

वास्तविक तुम्हाला या रिसर्च इन्स्टिट्यूटचं प्रमुख पद देत असतांनाहीआपण आपल्या देशाचं नातं हे आपल्या नाळेशी घट्ट असल्याचा दावा केला यावरून तुम्हा भारतीयांच्या स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधी, स्वा. वि. दा. सावरकर यांच्यासारखी माणसं कशी जन्मली यांचं कोडं वाटतनाही.

वैज्ञानिकदृष्टीनं नाळेचं नातं काही असलं तरी ते प्रथमतः प्रेमाचं असायला हवं म्हणून तुम्हाला सांगतो की दहा - पंधरा वर्षापूर्वी माझ्या रिसर्च वेडापायी पत्नीनं घटस्फोट घेतला. मुलांनीही आईकडे राहणेच पसंत केलं, परंतु तुम्हांकडून प्रेरणा घेऊन मी त्यांच्याशी माझी नाळ जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे, तसे प्रयत्न सुरु झालेले आहेत व रिस्पॉन्सही मिळत आहे.

तुम्हांस जातांना मी अतिमहत्त्वाच्या रिसर्चसंबंधीच्या सीडी भेट दिल्या आहेत. योग्य वापर करालच याची खात्री आहे. शेवटी ज्ञानाचा वापर मानवजातीसाठीच करायचा असतो!तुम्हा दोघांची बेंगलोरच्या रिसर्च सेंटरवर निवड झाली आहेच.तुमचं अभिनंदन!

वयोमानानुसार मला भारतात येणं शक्य होईल असं वाटत नाही , परंतु इकडे लंडनला आल्यावर भेटल्याशिवाय कधीच जाऊ नका. रिसर्च अडचणी ई-मेलवर कळवल्यात तर मी सदैव आपल्या मदतीला आहेच. कारण स्टेम सेल्सच्या रिसर्च माध्यमातून तुमचं व माझं नातही नाळेच्या रक्तासारखं आहे....नाही का ?

डॉ.राणीनं आता केव्हाही बाळाची आई व्हावं हीच सदिच्छा !

तुमचाच

सर डॉ.हेन्स स्टेनलिन

लंडन

# मालवणी मेवो

**प्रा. अविनाश वि. बापट.**

देवदिवाळीक हिंदळ्याच्याकाळभैरव जत्रेत
तुका पहिल्यांदाआवशी वांगडा बघलंय्
तेव्हातू काट्यार बसलं हुतस्
नजरा नजर झाली- - नी- -
तूखयतरी मनात भरलंस्
पुषी पौर्णिमेक मुणग्याच्या जत्रेत
महिन्या भरॉन तुका परत बघलय्
डोळयाक डोळो भिडवून तू वायच हसलंस्
तू मेवो-मिठाईच्यो पुडयो बांधत व्हतस्
ऊन जाळत होतो तरीव् तू
सुरंगीच्या हारासाऱ्या वाटलंस
महाशिवरात्रेक कुणकेश्वराच्या जत्रेत
पिवळ्या साडयेत तू गल्ल्यार–
खाजा,मेव्याक तुज्या दुकानार
गिराईकांची झुंबड उडालली
मियाव् खिसो चाचपॉन-
-अर्ध्या किल्याची पुडी उचल्लय्
आयेची नजार चूकवान
माझी नोट तू परतकेलंस
आपल्या हातान माजे पिशयेत पुडी घालताना

तू माज्या कानाक् लागलंस्-

"ह्यो मालवणी मेवो आवडलो तुमका?"

तेव्हा मातर जेत्रेतल्या खाज्या-मेव्याचा ढीगात

तूच गमूक लागलंस्

तूम्हणजे मालवणी मेवो

मालवणी मेवो म्हंजे तूच वाटलंस !

मुंबई विद्यापीठात S.Y.B.A. या वर्गाच्या अभ्यास क्रमात लागलेली मालवणी कविता

# नामो कुळकार

**प्रा. अविनाश वि.बापट.**

शिगम्यापासून वाथर करून
नामो कुळकार जमीन जाळी
तीस डालगी पानपतेरी अन्
शंभार कवळांची हुदेव होळी

शेतीपूर्वीच बैल गमावणां
अवजतनेनं तर कधी रोगांनी
हेड्याकडे मगे तंगडा तोड
प्रथा कुळकराची आसा जुनी

मिरगा बरोबर तरवो पेरणा
गांवठी बियाणी,रोपएककाडी
नांगर,जू,जगाल खरेदीक
नामो लाकांच्यो उपसी बावडी!

पेंड पोता उधारीवर वाण्याच्या
कर्ज रोख्यार खत खरीदणां
सण एकच गणपती पुजूचो
ऋण ह्यातभर फेडत रव्हाणां!

टाटा-बिर्ला होंवचेबेत निलके
इरीरी-पापारी,हिओ मंत्रावर

स्वप्न ट्रक्टरान नांगरणीचा
मळणी,झोडनीकरीन यंत्रावर!

रोगाची लागण नि पावसाची दडी
भात पिकलां तर जेमतेम खंडी
पोट जाळूक व्हया म्हणूननामो
मोठ्यांचे बागेत आंबे राखुक गडी!

झाडां लावल्यान् हापूस आंब्यांची
अनुदान घेवून सरकारी
अर्धे निघले बोटे,अर्धीपायर
दुःख पचयात हसण्यावारी !

नाय रंगलो जरीजीवनविडो
वागणूक त्येची साधून तोल
नशिबनाम्याचा मिरगकिडो
जसो मखमली पण मोतीमोल !

मुंबई विद्यापीठात S.Y.B.A. या वर्गाच्या अभ्यास क्रमात लागलेली मालवणी कविता

# मालवणिका

## (मालवणी बोलीभाषेतील चारोळ्या)

**प्रा. अविनाश वि. बापट.**

## मेसेज

तुजो व्हॉट्सअॅप वरलो मेसेजइलो तेव्हा
दिसाचो प्रहर मावळतीक गेल्ललो
मेसेजची मनातील फुगडी संपली तेव्हा
फाटफटीचो संधीप्रकाश डुचमळत इल्ललो!

**माजो कडेलोट**

तु भेटलंस नी मी
नवस चटकन बोलान् गेलाय्
लगीना नंतर कळला माका
माजो कडेलोट मियाच केलंय!

**हाणा पायताणां !**

तुजा गाणां माजा गाणां
ज्यांका वाटता रडगाणा
त्यांकाधरून हाणा
दोन कोल्हापूरी पायताणां !

**चोरून भेटणा**

सांजचा तुका चोरून भेटताना
मिणमिणते दिवे बेगीन लागत्तं्
फेसाळणारी लाट फुटल्यार
निघताना डोळे भरॉन येत्तं्

## पांवस

तुका बघलंय कि सतारिक
मल्हार  रागाचो कैफ चढता
माज्या अंगणात पांवस मगे
थुई- थुई- थुई- नाच करता!

## लाकूड

ढोरागत आयुष्य माजा
घोवाच्या दावणीक बांधला गेला
आणि काय सांगा तुमका हो
चुलीतला लाकूड चुलीत जळला!

## नयी नवरी

नयी नयी मी नवरीइलंय
रीती रीवाज पाळन् जाले
घोव मुबैक ठेवन गेलो
सासून् माजे आंवसे-बापूस काढले !

## भास

तुज्या केसातलो सुको वळेसर
मन गाभाऱ्यात गंध दखवळता
माहेरक तू गेलस तरीव्
अवती भोवती तुजो भास दाटता!

## कालवाकालव

तुज्या गंधातली जादू माजा
मन सैरभैर करून जाता
पारवो आठवणींचो मगे
काळजात माज्या कालवाकालव करता!

## ह्यली मानसां

कोकणाच्या मानसांक ह्यला मातीचा इमान
सल वेदनांची त्याका जरी जाळत असली
जीव ओवाळणा म्हणजे दुसरा-तिसरान्हय
माणूसकी जपणारी फक्त माणसांच ह्यली !

# जेथे जातो तेथे,तू माझा सांगाती ||

**प्रा. पल्लवी मराठे**
**फिजिक्स विभाग**

हा अभंग लिहिणारे तुकाराम महाराज आणि विठ्ठल याचं नातं सर्वश्रुत आहे. संत तुकाराम महाराज असोत किंवा बाकीचे श्रेष्ठ संत असोत, या सर्वांसाठी विठ्ठलच सर्वकाही. जे मिळतं ते सर्व विठ्ठलच देतो, जे घडतं ते विठ्ठलच घडवतो, जे जातं ते विठ्ठलच नेतो याच श्रद्धेने आणि विश्वासाने या संत मंडळीनी महाराष्ट्रातल्या अनेक पिढ्या भक्ती मार्गावर चालविल्या. हा विठ्ठलच या संत मंडळीसाठी सांगाती होता.

पण आजच्या पिढीची सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत साधना सुरु असतेती मोबाईलची. अशी साधना करणारे हे आधुनिक संतच जणू. या साधनेचे प्रकारही किती वेगवेगळे प्रात:कालची साधना, सायंकाळची साधना, उत्तररात्रीची साधना वेळेप्रमाणे यांची साधनाही बदलते. काही मंडळी तर या मोबाईलमधेच ग्रूप करून कीर्तन-प्रवचन असे कार्यक्रम पण करतात. मोबाईल हा देव असता तर एव्हाना तो सर्वांना पावलाच असता. एका अर्थी त्याने त्याची अनुभूती द्यायला सुरुवातही केली आहे तरीही अनुभवी भक्त संप्रदाय आणखी आणखी त्याच्या भक्ती रसात बुडालेले दिसतात. परमोच्च आनंद किंवा स्वत:च्या अस्तित्वाचा विसर ह्या शब्दांचे अर्थही किती सहज केलेत या मोबाईलने. दिवसेंदिवस मोबाईलचे अनुयायी वाढत आहेत. एक दिवस या सर्वांना मोक्षाचा मार्ग दाखवणार हा मोबाईल.

हरियाणा मध्ये एका चौथीतल्या मुलाने आई बाबांनी मोबाईल काढून घेतला म्हणून हाताची नस कापून घेतली, सेल्फी काढताना अनेकांनी प्राण गमावले, नागपूरला वेणा तलावात नौकाविहार करताना FB लाइव्हच्या नादात बोट उलटल्याने आठ जणांना जलसमाधी मिळाली. अशीउदाहरणं किंवा मोबाईलच्या अतिवापरामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम वारंवार लोकांसमोर येऊनही त्याचा काहीही परिणाम होताना दिसत नाही. आपल्या मुलांनाही त्यांच्या लहानपणापासूनच आपण कौतुकाने हातात मोबाईल देतो. पण तोच त्यांच्यासाठी किती घातक आहे याचा विचारही करत नाही. मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम बघितले तर पुढे पुढे डॉक्टर पथ्याच्या लिस्ट मध्ये मोबाईल फोनचा उल्लेख करतील किंवा देवळात जाताना पादत्राणे येथे काढावीत. बरोबर मोबाईलही काढून ठेवावा,असेही फलक लावावे लागतील. आज ग्रुपमध्ये भरभरून बोलणाऱ्या मुलांना उभं राहून बोलायची वेळ आली तर शब्द फुटत नाहीत ही शोकांतिका आहे. Fantum phoneम्हणजेएखाद्याला सतत वाटत राहतं की मला फोन येतोय, मेसेज आलाय या आजाराला बळी पडलेले बरेच तरुण सारखा मोबाईल चेक करत राहतात. निसर्गाच्या सानिध्यात हिंडण फिरणं असतं. पण त्याचबरोबर मोबाईलवर फोटो काढणं सोशल साईट वर व्हिडीओ अपलोड करणंही असतं. निसर्ग सौंदर्य डोळ्यांत टिपून घेण्यात मिळणारा आनंद लांबचं राहतो.

मोबाईल हातात नसेल तर माणूस कासावीस होतो. मोबाईल विसरून घराबाहेर पडलेला माणूस आलोय

असं वागताना दिसतो. पूर्वी प्रवासाला कुणी जात असेल तर पाणी घेतलस का सोबत?किंवाडबा घेतलास का? असे प्रश्न विचारले जात. आता मोबाईल घेतला ना ? आणि त्यानंतर ....... चार्जर..? असे प्रश्न ऐकू येतात. मोबाईल गरजेचा आहे हे खरच आहे. मोबाईल नसला तर अडचण होईल हेही खरं, पणमोबाईलनसलातरपृथ्वीफिरायचीथांबेलकी काय असा गोळा येतो काहींच्या पोटात. पूर्वीमान खाली घालून चालणाऱ्याकडे सहानभूतीने बघितलं जाई किंवा खाली मुंडी पाताळ धुंडी असा समज करून घेतला जाई. आता खाली मुंडीfacebook, whatsapp धुंडी ही एकच अनुभुती येते.

लहानपणीकोंबड्या दाणे टिपताना बघणं हा विरंगुळा असायचा. हल्ली स्क्रीन वर टाईप करणारे अंगठे दिसले की कोंबड्याची आठवण होते. कोंबड्यांच्या मानेची होते तशीच लयबद्ध हालचाल अंगठ्यांची होते. भरपूर दाणे एकाच ठिकाणी मिळाले की कोंबड्या कशा टप टप टप हालचाल करतात असं वाटतं. दाणे मिळाले नाही की त्यांच्या शोधासाठी जशा कोंबड्यांच्या माना गोल गोल चहू बाजूंनी फिरतात तसाच काय टाईप करावं हा विचार करताना अंगठे गोल गोल फिरताना दिसतात. अंगठ्यांची फ्लेक्झीबिलीटी एवढी उपयोगी येईल असा विचारत्या निर्मात्याने तरीकेला असेल का ? कोंबड्याजशाकचऱ्यातून आपल्या पोटाला काय हवंय ते शोधतात, तसच सोशल मिडियाच्याअनेक निरुपयोगी कचऱ्यातून आपण आपली मूल्य शोधतोय. आणि आम्ही वाईटातून चांगलं शोधतो अशीवरबढाईमारून त्याचं समर्थनही करतो.

मोबाईल एक संसर्गजन्य मानसिक आजार घोषित होईल लवकरच असं वाटू लागलंय. कसं ते बघा, डोळे आलेल्याच्या डोळ्यांकडे पाहिलं की आपल्यालाहीडोळे येतात अशी एक अंधश्रद्धा आहे आपल्याकडे. तसच मोबाईल वर बिझी असलेला माणूस पाहिला की बघणाऱ्याला लगेच मळमळू लागतं आणि तोही लगेच मोबाईल पाहू लागतो किंवास्क्रीन वर बोटे मोडू लागतो. माणसालाएखाद्यागोष्टींचा विरह सहन होत नाही किंवा ती गोष्ट नसेल तर कासावीस व्हायला होतं म्हणजेचत्या माणसाला त्या गोष्टीचं व्यसनजडलंअसं म्हणतात. मोबाईलच व्यसनच म्हणावं लागेल. लग्नठरवतानामुलाला किंवा मुलीला मोबाईलचं व्यसननाहीयेना असेहीप्रश्न विचारले गेले नाही म्हणजे मिळवलं.

बरं झालं पूर्वीच्या काळी मोबाईल नव्हते, नाहीतर आपल्याला स्वातंत्र्य मिळालंच नसतं, एवढे गड किल्ले बांधून झाले नसते, एवढे शोधही लागले नसते. मग फोटो कोणाचे काढले असते?आणि १५ ऑगस्टला whatsapp status कसले ठेवले असते ? आज दिवसभर मोबाईलला चिकटून असणारे लोक व्यायामाचं महत्त्व सांगणारे मेसेज खेळाचं महत्त्व कळेनासं झालंय. लोकांमध्ये मिसळणे, बोलणे नसल्यामुळे मुलं एकलकोंडी झाली आहेत.

FB वर लाईक मिळाले किंवा आपलंstatusकिती जणांनी बघितलं ह्या गोष्टींवर आपला मोठेपणा ठरत नसतो. टिळक, आगरकर, शिवाजी महाराज, आंबेडकर हे मोबाईल नसतानाही मोठे झाले. आजही त्यांचे विचार आपणwhatsapp वरूनशेअर करतो. त्यामुळे मोठं होणं, अनेक लोकांपर्यंत पोहोचणं, त्यांच्या वाहवा

मिळवणं हे मोबाईल शिवायही होऊ शकतं. यासाठी अनेक थोर लोकांची उदाहरणं देता येतील. आज आपली पाळी आहे. तेव्हा ज्याचं त्यानं ठरवायचं आहे,येत्या काळात आपला सांगाती कोण असेल?

# बँकांचाउगम आणि विकास

कोणत्याही व्यक्तीचे, समाजाचे आणि देशाच्या आर्थिक विकासाचे प्रतिबिंब त्या देशाच्याविकसितझालेल्याबँकव्यवसायातदिसूनयेते. अर्थातआजजेबँकांचेविकसितरूपदिसतआहे तेएकदमअस्तित्वातआलेलेनाही. आजबँकाजीवेगवेगळ्याप्रकारचीकामेकरतात, तीकामेकरण्याचीगरजनिर्माणझालीआणिगरजेनुसारबँकांचाविकासहोऊलागला.

बँकहाशब्दलॅटिन शब्दापासून आलेला असून, लॅटिन भाषेतील बँकस (Boncus)ह्या शब्दावरून निर्माण झाला आहे असे म्हणतात. पोर्तुगीज भाषेतही हा शब्द प्रचलित आहे.सर्व भाषांमध्ये या शब्दाचा अर्थ 'बँक' (Bench) असाच आहे. मध्ययुगामध्ये वेगवेगळ्या देशांच्या चलनाची अदलाबदल करणे, मोड देणे किंवा घेणे ही कामे मुख्यत: 'ज्यू' लोक करीत असत. हे सर्व सावकार बाजारात एक बाक टाकून त्या बाकावर आपल्याकडे असलेल्या नाण्यांचा ढीग रचून ठेवीत. हे सर्व आर्थिक व्यवहार सावकार आणि गरजू व्यक्ती एका बेंचवर बसून करत त्यामुळे या व्यवहाराला 'बँकिंग' व व्यवहार करण्याच्या जागेला 'बँक' असे नाव पडले. जेव्हा एखाद्या बँकरला म्हणजे सावकाराला लोकांची देणी देता येत नसत तेव्हा त्याचा बाक'erupt' करण्यात येत असे. म्हणजे मोडून-उधळून टाकण्यात येत असे. त्यावरून दिवाळे निघालेल्या व्यक्तीला 'ब्रॅक्रप्ट' असा शब्द वापरण्यात येऊ लागला. अशा प्रकारे बाक ह्या शब्दावरून बँक हा शब्द रूढ झाला असावा असे वाटते.

इ.स. २००० वर्षे बॅबिलोनमधील लोक त्यांचे दागिने पैसे इत्यादी मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिराचा वापर करत . मंदिरातील पैसे सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पुजाऱ्यांची असे. इफेसस आणि डेल्फोसारखी प्रसिध्द मंदिरे ग्रीक बँकिंग संस्था म्हणून ओळखली जात असत.अशा प्रकारे इजिप्त, ग्रीस आणिबॅबिलोनियामध्ये बँका व बँकांचे व्यवहार सुरु झाले होते. ग्रीसमध्येदेवळांचेपुजारीलोकांकडूनठेवीस्वीकारत आणि नाममात्र व्याज आकारून कर्जेही देत असत. ग्रीसमधील अथेन्स हे शहर अतिशय भरभराटीला आलेले शहर होते. तेथील बँकाही खूप भरभराटीला आल्या होत्या. याव्यतिरिक्त खाजगी क्षेत्रातही बँका होत्या. त्या प्रामुख्याने सावकारी स्वरूपाचा व्यवहार करत. लोकांच्या ठेवी स्वीकारणे, कर्जे देणे, व्याज आकारणे, ठेवीदारांना हुंड्या देणे, हुंड्या वटविणे इत्यादी कामे करीत असत. रोमन साम्राज्यातील काही बँकांकडे कर गोळा करण्याचे कामही सोपविण्यात आले होते. एकप्रकारे आधुनिक काळातील मध्यवर्ती बँकेचे काम ह्या बँका करीत होत्या.

बहुतेकसर्वच देशांच्या बँका कशा सुरु झाल्या याचाइतिहास पाहिला तर असे दिसते की, सोन्या-चांदीचे दागिने तयार करणारे सोनार व सराफ यांनी प्रथम बँक सदृश्य काम करावयास सुरुवात केली. इंग्लंडमधील सोनारापाशी भक्कम तिजोऱ्या असत. कारण सर्व लोक आपल्याकडील सोन्या-चांदीची नाणी आणि मौल्यवान वस्तू सुरक्षित राहाव्यात म्हणून त्यांच्याकडे नेऊन ठेवीत. अशा प्रकारे त्यांच्याकडे ठेवलेल्या ठेवीबद्दल ते लोकांना पोच पावती देत. तसेच लहान मोठे व्यापारीसुद्धा आपल्याकडील रोकड रक्कम त्यांच्या हवाली करीत.

या ठेवींची त्यांना रीतसर पोचपावती मिळत असे. अशा प्रकारे ठेवी सुरक्षित ठेवणे आणि ठेवीदारांनी मागणी करताच त्या परत करणे ह्या कामासाठी हे सावकार ठेवीदारांकडून काही सेवा शुल्क घेत होते. काही दिवसांनी सावकारांनी ठेवीदारांना दिलेल्या पावत्या हेच एकप्रकारे चलन म्हणून वापरण्यात येऊ लागले. कारण त्यांच्याकडे असलेल्या पैशांचा तो एकप्रकारे पुरावाच ठरू लागला, म्हणजेच आधुनिक काळातील चलनी नोटांचे काम या पोचपावत्या करू लागल्या.

या सर्व सोनार सावकारांना अनुभवाने असे आढळून आले की, त्यांच्याकडे लोकांनी ठेव म्हणून ठेवलेला पैसा ते लोक काही एकाच वेळी परत मागत नाहीत हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी तोच पैसा ज्यांना कर्जाची आवश्यकता होती अशा लोकांना कर्जाऊ द्यायला सुरुवात केली. अर्थात यापासून त्यांना चांगलाच फायदा होऊ लागला. अनुभवानेत्यांच्या लक्षात आले की, सर्वच्या सर्व ठेवी रोकड स्वरुपात ठेवण्याची आवश्यकता नाही. त्यांपैकी बराच पैसा कर्जे देण्यासाठी वापरता येईल. आधुनिक बँक व्यवसायाची बिजे अशा प्रकारे या सावकारीत सापडतात. या सावकारांच्या लक्षात आले की, त्यांच्याकडे जितक्या ठेवी जास्त तितका सावकारी करण्यासाठी अधिक पैसा उपलब्ध होईल म्हणून त्यांनी ठेवींवर व्याज द्यायला सुरुवात केली आपल्याकडे ठेवी ठेवणाऱ्यांना ते खाते वह्या (पासबुक) देऊ लागले.

इ.स. १६९४ साली ‘बँक ऑफ इंग्लंड’ या बँकेची स्थापना लंडनमधील काही सावकारांनी एकत्र येऊन केली. या बँकेला सरकारला कर्जे पुरविण्याच्या मोबदल्यात काही सवलती देण्यात आल्या होत्या. जसे की, १७०८ साली या बँके व्यतिरिक्त अन्य बँकांना कागदी चलन काढावयास सरकारने बंदी केली. कारण तोपर्यंत लंडनच्या परिसरात अनेक बँका स्थापन झाल्या होत्या. १६८८ साली झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे इग्लंडची व्यापारउदीमातील भरभराट अतिशय झपाट्याने घडून आली. त्यामुळे याकाळात बँक आणि त्यांचे कार्यक्षेत्र यांची अतिशय झपाट्याने प्रगती झाली. यानंतरच्या काळात आधुनिक बँकांसाठी आवश्यक त्या सर्व सोयी व सवलती अस्तित्वात आल्या आणि स्थिरावल्या. इ.स. १७७१ साली वटणावळ गृहे (Clearing Houses)स्थापन करण्यात आली. १८३३ साली बँक ऑफ इंग्लंडने काढलेले कागदी चलन हे कायदेशीर चलन (Legal Tender) ठरविण्यात आले. एकोणिसाव्या शतकात संयुक्त भांडवली तत्त्वावर अनेक बँका स्थापन करण्यात आल्या. तसेच मर्यादित जबाबदारीच्या(Limited by Liability)बँका स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली अशा प्रकारे लंडन मधील लोंबार्डी स्ट्रिट येथील‘ज्यू’ सावकारांना इंग्लंडमधील आधुनिक बँकेचे पूर्वज समजले जाते.

भारतात वैदिक काळापासून बँक व्यवसाय सुरु होतायाचे पुरावे वेगवेगळ्या ग्रंथांच्या संदर्भाद्वारे मिळतात. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात तर सुरक्षित कर्जावर व्याज दर निश्चित करून दिलेला आढळतो. भारतात इ. स. पूर्व ५०० वर्षापासून सावकार आणि सावकारी यांचे अस्तित्व होते हे लक्षात येते. कलकत्त्यापासून काश्मीरपर्यंत ज्यांच्या हुंड्या चालत अशा मोठ्या पेढ्या अस्तित्वात होत्या आधुनिक काळातील बँकांची सर्व कामे ह्या पेढ्या करत होत्या. ह्या पेढ्या त्या काळच्या लोकांनाच नव्हे तर राजांना आणि संस्थानिकांनाही कर्जे देत होत्या.

अठराव्या शतकामध्ये भारतात आलेल्या इंग्रजांना व्यापार व्यवसाय वाढविण्यासाठीमदत करण्याकडे तसेच त्यांचे पैसे सुरक्षित ठेऊन गरजेनुसारउपयोग करता यावा म्हणून मोठ्या प्रमाणात अभिकर्ता गृहांची (Agency Houses)स्थापना करण्यात आली. या अभिकर्ता गृहांची कार्यपद्धती इंग्लंडमधील व्यापारी बँकांच्या पद्धतीवर आधारीत होती. या इंग्रजांनी भारतातील सावकार आणि सराफी पेढ्यांऐवजी अभिकर्तागृहांमध्ये आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यास सुरुवात केली अशा प्रकारे इंग्रजांनी बँकिंग व्यवसाय हा पूरक व्यवसाय म्हणून करणे, कागदीचलनाची निर्मिती करणे, तसेच ठेवींवर १८ ते २० टक्के व्याज देणे इत्यादी कार्य अभिकर्तागृहाचे होते. या अभिकर्तागृहांकडून मोठे व्यापारी, मळेवाले, नीळ कारखाने इत्यादींना मोठ्या प्रमाणात कर्ज दिले जात होते. १९२९-३२ या काळात अभिकर्तागृहांची आर्थिक स्थिती सट्टेबाजी आणि इतर कारणामुळे डबघाईला आली. १८३३ मध्ये ईस्ट इंडियाकंपनीकडून व्यापार अधिकार काढून घेण्यात आला वफक्तसरकारी जबाबदारी सोपविण्यात आल्यामुळे अभिकर्तागृहांना आपला व्यवसाय बंद करावा लागला.

भारतीयबँकांचाउगम आणि विकास विचारात घेता असे लक्षात येते की, भारतातील बँकांची प्रगती ही १८५७ नंतरच मोठ्या प्रमाणात झाली. १८०६ साली स्थापन झालेल्या 'बँक ऑफ बेंगाल' या बँकेला 'इलाखा बँक' (प्रेसीडेन्सी बँक) दर्जाप्राप्त झाल्यामुळे चलन निर्गमनाचा अधिकार १८२३ पासून प्राप्त झाला. मुंबई आणि मद्रास येथे स्थापन झालेल्या इलाखा बँकामध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवण्यात आले होते. याच काळात भारतात बँक विषयक कार्य करण्यासाठी विविध प्रकारच्या बँका स्थापन झाल्या आणि काळाच्या ओघात बुडाल्याही. १८६० साली संयुक्त भांडवली संस्थाना 'मर्यादित जबाबदारीच्या' तत्त्वावर बँका स्थापन करण्याची परवानगी देण्यात आल्यानंतर अनेक बँका स्थापन झाल्या. भारतीय लोकांनी १८८१ मध्ये स्थापन केलेली 'औंध कमर्शियल बँक ' ही पहिली संयुक्त भांडवली भारतीय बँक समजण्यात येते. १८९४ साली लाला हरिकिशन लाल यांच्या प्रयत्नामुळे 'पंजाब नॅशनल कंपनीची' स्थापना झाली. १९०४ साली सुरु झालेल्या स्वदेशी चळवळीमुळे भारतीय बँकांच्या स्थापनेला प्रोत्साहन मिळाले. १९०५ ते १९१३ या कालावधीत अनेक बँका स्थापन झाल्या. अनेक व्यापारी बँकांची स्थापना याच कालखंडातील असल्याचे निदर्शनास येते. १९१३ पासून बँका बुडण्याचे प्रमाण वाढल्यामुळे बँकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँकेची स्थापना करावी असा विचार सुरु झाला. १९२६ साली हिल्टन यंग करन्सी कमिशनने भारतात 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची' स्थापना करण्यात आली.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला परंतु भारताची फाळणी झाल्यामुळे अनेक बँकांच्या आर्थिक स्थितीवरफाळणीचा परिणाम झाला, त्यामुळे अनेक बँका बुडाल्या. बँक व्यवसायाच्या कार्यातसुसूत्रताआणि समन्वय यावाम्हणून १९४९ साली 'बँकिंग कंपनी ॲक्ट' मंजूर करण्यात आला. रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण ही याच वेळेस झाले. १९४९ च्या कायद्यानुसार रिझर्व्हबँकेचे, संयुक्तभांडवलीबँकांशीअसलेलेसंबंधनिश्चितकरण्यातआले. १९५९ च्या कायद्यानुसार रिझर्व्ह बँकेला बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य आणि जबाबदारी प्राप्त झाली.

१९२० च्या कायद्यानुसार प्रेसिडेन्सी बँकेचे विलिनीकरण करून'इम्पेरिअल बँकऑफ इंडिया' अस्तित्वात आली. १९५५ साली इम्पेरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून 'स्टेट बँक ऑफ इंडियाचा' समूह अस्तित्वात आला. १९६१ साली बँकिंग कायद्यात दुरुस्ती करून रिझर्व्ह बँकेला सरकारच्या परवानगीने बँकांचे सक्तीने विलिनीकरण करण्याचा अधिकार प्राप्त झाला. १९६१-६४ या कालावधीत १४८ बँकांचे एकत्रिकरण झाले. देशाच्या आर्थिक सामाजिक विकासासाठी, तसेच वित्तीय साधनांचा वापर आणि विकेंद्रीकरण व्हावे या दोन हेतूंनी १९ जुलै १९७० साली भारतातील १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा दुसरा टप्पा १५ एप्रिल १९८० रोजी पूर्ण करण्यात आला, यावेळी २०० कोटींपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या सहा व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले.

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे देशातील १५ टक्क्यांपेक्षा अधिक बँक व्यवसाय सरकारच्या मालकीचे झाले. राष्ट्रीयीकरणानंतर बँक व्यवसायाची चौफेर प्रगती होत आहे. बँकांना मिळणाऱ्या नफ्याचा उपयोग राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठीकेला जात आहे. अशा प्रकारेदेशातील बँका ह्यादेशाच्या आर्थिक प्रगतीचा आधारस्तंभ ठरत आहेत.

प्रा. रश्मी रमेश हिर्लेकर
डिपार्टमेंट ऑफ बँकिंग अॅण्ड इंश्युरन्स

संदर्भ :-

१) बँक व्यवसाय व बँका - डॉ. रा.का.बर्वे

२) बँक व्यवसायाची मुलतत्त्वे- डॉ. गंगाधर कायंदे-पाटील

३) भारतीय बँकिंग व्यवस्था - डॉ. गंगाधर कायंदे-पाटील

# शोषण

**डॉ. सुरवसे एल् . एस् .**

**फिजिक्स विभाग**

गर्भात वाढणाऱ्या,
जीवाच्या संगोपनातही शोषण आहे|.

जगात येण्याच्या,
पहिल्या श्वासातही शोषण आहे|.

जन्मा आलास,
तुझ्या पाळण्याच्या विधितही शोषण आहे |.

झालास तरुण तू,
तुझ्या लग्नविधीतही शोषण आहे |.

होशील देशबांधव तू,
देशातील धर्माचरणातही शोषण आहे |.

उद्विग्न होऊन जाशील,
साधू-भोंदुंच्या मागे, त्यांच्या तंत्र-मंत्रातही शोषण आहे |.

थकशील, बागडशील
विसावशील कुण्या पारिच्या झेंड्याखाली, झेंड्याखालूनहीशोषण आहे |.

झेंड्यासाठी झिजून जर्जर, खोक्काड म्हातारा होशील,
तुझ्या खोक्काड शरीराच्या आजारपणातही शोषण आहे |.

तू मरशील, तेव्हा तुला उचललं जाईल मसणवट्याकडे,
तेव्हा तुझ्या खोक्काड मुडद्यात, हिजडा समाज निरखून पहातोय,
काही शोषणायोग्य आहे काय ? तुला आणलं जाईल मसणवट्यात,
अंत्यविधीसाठी, तर तुझ्या अंत्यविधीतही शोषण आहे |.